
सोलापूर तरुण भारत
आसमंत

**शत्रूला कसे दगे द्यावे, रणांगणात चर्चा न करता कर्म करावे, शत्रूचा विश्वासघात कसा करावा, वेळप्रसंगी धर्मरक्षणासाठी आप्तस्वकीयांविरुद्ध तलवार कशी उचलावी, हे पुन्हा एकदा सांगणारे योगेश्वर श्रीकृष्ण ठरले. आणि सुलतानांच्या अत्याचारी गडद काळोखात हिंदूंना विजिगीषा, पराक्रम, नवचैतन्य, नवनवोन्मेषशालिनी स्फूर्ती देणारा शिवराज्याभिषेक दिन येणाऱ्या असंख्य पिढ्यांसाठी हिंदुसाम्राज्यदिन ठरला!**



# हिंदूंचे प्रेरणास्थान शिवराज्याभिषेक दिन!

प्रासंगिक **डॉ. सुमंत दत्ता टेकाडे**

रायगड हजारोंच्या गर्दीने गजबजून गेलेला होता. विद्वान, महापंडित, राजे- रजवाडे यांचे स्वागत सोहळे झडत होते. गडावर विलक्षण लगबग होती. पूर्वेला सूर्योदय होण्याच्या मार्गावर होता. राजसभा अद्भुत तेजाने तळपते होती. सर्वांच्या नजरा ठीक समोरच्या बाजूला खिळल्या होत्या. अष्टप्रधान आपापल्या जागी उभे होते. गागाभट्टांनी सिंहासनावर छत्र धरले वे उच्च,धीरगंभीर स्वरात राजबिरुदावली उद्घोषित झाली. ''महाराजे प्रौढ प्रतापपुरंधर क्षत्रिय कुलवतंसे सिंहासनाधीश्वर महाराजाधिराज राजो शिवछत्रपती की जय, राजा शिवछत्रपती की जय, राजा शिवछत्रपती की जय.'' सारी राजसभा जयजयकाराने दणाणून गेली. हजारो बुलंद कंठांतून झालेला केवढा प्रचंड जयघोष असेल तो. कर्णे, नौबती, ढोल, ताशे, नगारे धडधडू लागले. स्वराज्यातल्या सर्व गडांवरून एकाच वेळी तोफांचा गगनभेदी दणदणाट सुरू झाला. रायगडाचे बाहू फुरफुरले, स्वराज्याचे रोमांच उभे राहिले अन् तिकडे सुलतान, फिरंगे टोपीकर अशा शत्रूंच्या राजधान्या हादरल्या. या दणदणाटाने त्यांच्या कानठळ्या बसल्या, मती गुंग झाली, नजर सैरभैर झाली, दाही दिशा बधिर झाल्या, पायाखालची भूमी दुभंगली. विलक्षण दिवस, अद्भुत क्षण, हिंदुस्थानच्या इतिहासातील देदीप्यमान पर्व. एतद्देशीयांना अभिमान वाटावा व शत्रूला धडकी भरावी असा हो सोहळा म्हणजे शिवराज्याभिषेक दिन! पण, अर्थात भारतवर्षाच्या नशिबात हा दिवस इतक्या सहजासहजी आला नव्हता. इ. स. ७११ च्या मोहम्मद बिन कासिमच्या घुसखोरीपासून सुरू झालेली इस्लामी आक्रमकांची परंपरा लगातार बळावत असताना हिंदुस्थानच्या अक्षरशः चिंधड्या उडाल्या. एक एक सामर्थ्यशाली साम्राज्य कोसळत गेले. सिंध, पंजाब, काश्मीर, राजपूताना, माळवा, विजयनगर, वारंगळ, दौलताबाद अशा सिंहासनांच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडाल्या.



सुलतानी आक्रमणाची रीतच निराळी होती. प्रस्थापिते पायदळाच्या उलट त्यांचा सारा जोर जलदे घोडदळावर होता. आपले राजे पारंपरिक शस्त्रांवर निर्भर होते, तर सुलतान तत्कालीन आधुनिक शास्त्रांचा वापर करत होते. आपण अजूनही प्रत्येक युद्ध धर्माने करत होतो, तर ते धर्मयुद्ध करण्यास तयार होते. इथे शत्रूची तलवार पडली तर उचलून देणे, नि:शस्त्र व्यक्तीवर आघात न करणे, पाठीमागून वार न करणे ही नीतिमत्ता जोपासली जात असताना, सुलतान मात्र उघड अनितीने युद्ध करीत. दिलेले वचन मोडणे, नि:शस्त्रावर आघात करणे, विश्वासघात, पाठीवर वार, हेच सुलतानांच्या अंगवळणी पडलेले होते. पण, आम्ही शतकानुशतके यातून काहीही शिकते नव्हतो.

वास्तविक, शत्रूशी कसे वागले पाहिजे, त्याला खोटी वचने कशी द्यावी, त्याला कसे बुडवावे, इत्यादी अनेक विषयांवर आपल्या शास्त्रांमध्ये सविस्तर मार्गदर्शक तत्त्वे सांगण्यात आलेली आहेत. पण, त्याचेही वाचन दुरापास्त व्हावे किंवा ते दुर्बोध वाटावे इतके आपले अध:पतन झाले होते. 'सेक्युलर' शब्दाचा अर्थही ने जाणणारे आजचे तथाकथित स्वयंघोषित विद्वान, इस्लामी आक्रमणे केवळे आर्थिक हेतूने झाली होती, असा केविलवाणा उद्घोष करताना दिसतात. पण, चौथा वर्ग उत्तीर्ण झालेल्या सामान्य वाचकाने इतिहास उघडून पाहिला, तर त्यालाही ते धडधडीत सत्य दिसायला वेळ लागणार नाही. इस्लामी आक्रमण केवळ आर्थिक नसून भौगोलिक, राजनैतिक, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक अशा राष्ट्राच्या सर्व अंगांना निर्णायक रीत्या प्रभावित करणारे होते. सतराव्या शतकात आसेतु हिमाचल संपूर्ण हिंदुस्थान परकीय शक्तींच्या अधीन होता. मोगलांचे जबरदस्त साम्राज्य पश्चिमेला पेशावर ते पूर्वेला कलकत्त्यापर्यंत व औरंगाबादपासून कश्मीरपर्यंत दक्षिणोत्तर अव्याहतपणे सुरू होते. दक्षिणेत बहामनी साम्राज्याची शकले होऊन पाच सुलतानशाह्या निर्माण झाल्या होत्या व त्यातही आता दोन बलशाली साम्राज्य उरली होती. ती म्हणजे गोवळकोंड्याची कुतुबशाही व विजापूरची आदिलशाही. युरोपियन इंग्रज, पोर्तुगीज, फ्रेंच हेसुद्धा होतेच. सतराव्या शतकापावेतो सारे हिंदुभूमी यवनाक्रांत झाली होती. महंद घोरीने सोनाथावर हल्ला केला असताना तेथील पुजारी म्हणाले की, सोन्याच्या राशी देतो, पण मूर्ती फोडू नका. यावर घोरीने उत्तर दिले की, लोकांनी मला बुतफरोश म्हणण्यापेक्षा बुतशिकन म्हटलेल आवडेल. वर्षानुवर्षे संयमाने निर्माण केलेली हजारो मंदिरे फोडून टाकण्यात आली. काशी विश्वेश्वर फुटला. जबरदस्तीच्या धर्मांतरणाने कळस गाठला. जवळपास सर्वच सुलतान क्रूर व लहरी होते.

बल्बनने तर दिल्लीमध्ये एक लाख लोक ठार मारून टाकलेले होते. अल्लाउद्दीन खिलजीची दहशत तर महाराष्ट्र कधी उभ्या आयुष्यात विसरू शकणारे नाही इतकी भयानक होती. मोहम्मद तुगलकने लहर आली म्हणून अख्खी राजधानी दिल्लीवरून दौलताबादला स्थानांतरित केली होती. मोरोक्कोहून आलेला इब्नबतूता याने याचे उल्लेख केलेले आहेत. या सर्वांनंतर हिंदूंचा कर्दनकाळ तूरलंग भारतावर येऊन थडकला.

१३९८ मध्ये त्याने हिंदुस्थानावर स्वारी केली. त्याचे आत्मचरित्र उपलब्ध आहे मुलफुतात- ए- तीमुरी. यात तो म्हणतो की, या काफर हिंदूंची देवळे पाडावी, संपत्ती लुटावी व यांची प्रचंड कत्तल करून गाझीपद प्राप्त करावे, अशी इच्छा आहे. याने दिल्ली पाच दिवस सतते रक्ताने धुऊन काढली. यानंतर बाबरापासून मोगलांचे रक्तरंजित शासन सुरू झाले. भारताचे उरलेसुरले चैतन्य नष्ट झाले. इस्लामनुसार गादीवर बसणाऱ्या कुठल्याही सुलतानाचे एकच कर्तव्य असते व ते म्हणजे दार- उल- हर्ब (काफरांचा देश)चे दार- उल- इस्लामे (इस्लामचा देश)मध्ये रूपांतर करणे आणि त्यासाठी काफरांचे समूळ उच्चाटन करणे. कुठल्याही आक्रमणामध्ये पहिली धाड पडत असे ती स्त्रियांवर. गावातील सर्व स्त्रियांना बळजबरीने उचलून नेले जात असे. त्यातील नितांत सुंदर स्त्रिया स्वतः बादशहासाठी, त्यानंतर त्याच्या मंत्र्यांसाठी, त्यानंतर साधारण सरदारांसाठी वे उरलेल्या स्त्रिया सैनिकांमध्ये वाटून टाकण्यात येत असत. या महिलांचे उर्वरित संपूर्ण आयुष्य हे शब्दांत सांगू शकणार नाही इतके भयानक असे.

लोकांची आर्थिक परिस्थिती हलाखीची होती. मुळातच नापिकी, त्यात अठराविश्वे दारिद्र्य, यातच होणारे सुलतानांचे अत्याचार, याने प्रजा पिळवटून निघत असे. दुष्काळामुळे पीक निघाले नाही तरी सुलतान आपला सारा सोडत नसत. त्यासाठी बळजबरीने लोकांची घरे लुटून नेली जात. जिझियासारख्या प्रचंड करांनी शेतकऱ्यांचे व सामान्य जनतेचे कंबरडे मोडले होते. ७० ते ८० टक्के उत्पन्न कराच्या स्वरूपात सरकारमध्ये जमा करावे लागत असे. विकृत धर्मांधतेला ऊत आलेला होता. दार- उल- इस्लाममध्ये रूपांतर करण्यासाठी म्हणून लोकांचे प्रचंड प्रमाणामध्ये बळजबरीने धर्मांतरण केले जात असे. इस्लामचा स्वीकार जो करणार नाही त्याला तलवारीला सामोरे जावे लागे. यावनी भाषेचा पगडा सामान्य जनमानसावर पडला होतो की, मातृभाषेचा पुरता ऱ्हास झाला होता. लोकांनी मुलांची नावेसुद्धा सुभानराव, रुस्तुराव, सुलतानराव, फर्जंद अशी ठेवायला सुरुवात केली होती. सामान्य माणूस दोन वेळेच्या जेवणासाठी धडपडत असताना धर्म, संस्कृती, संघटन हे सर्व मुद्दे त्यांच्या दृष्टिक्षेपातही नव्हते.

(पान ४ वर)

# 'बिचारा देश' ते 'आत्मनिर्भर भारत': मोदी सरकारची तपपूर्ती



**दि. २६ मे रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळाला १२ वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्ताने महाराष्ट्र प्रदेश भाजपच्यावतीने 'राष्ट्रनिर्माणाची तपपूर्ती' या विशेष संग्राह्य अंकाचा प्रकाशन सोहळा काल मुंबईत मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या सोहळ्यात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील सरकारच्या यशस्वी कारकिर्दीचा लेखाजोखा आपल्या भाषणातून सादर केला. गेल्या १२ वर्षांत भारतातील सर्वांगीण परिवर्तनाची यशोगाथा मांडणारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे हे संपूर्ण भाषण...**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची १२ वर्षांची कारकीर्द ही थक्क करणारी आहे. एखाद्या देशाची शक्ती, स्वाभिमान आणि आत्माभिमान जागृत करून मोठं परिवर्तन घडवलं जाऊ शकतं, हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जगाला दाखवून दिलं आहे. कधीकाळी 'बिचारा देश' अशी ओळख असलेल्या भारताची १२ वर्षांच्या काळात 'आत्मनिर्भर भारत' अशी ओळख पंतप्रधान नरेंद्र मोदींमुळे शय झाली. १२ वर्षांत पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केलेलं कार्य हे अफाट असून, ते खरंतर एका भाषणात मांडणं अवघड आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या काळात भारताची वाटचाल 'नवभारता'कडे झाली. सामाजिक क्षेत्रात नरेंद्र मोदींच्या काळात मोठे कार्यक्रम झाले. 'गरीब कल्याण'केंद्रित अजेंडा मोदींनी राबविला, त्यातून गेल्या दहा वर्षांत २५ कोटी भारतीय हे दारिद्र्यातून बाहेर आले आहेत.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या अहवालातून हे जगाने मान्य केलं. तसंच पंतप्रधान मोदींनी विविध क्षेत्रांत रचलेल्या भक्कम पायावर आता देश प्रगतिपथावरच जाणार आहे. अर्थव्यवस्थेच्या बाबतीत भारताने केलेली प्रगती ही थक्क करणारी आहे. देशाचा 'जीडीपी' २०१३-१४ साली १०३ लाख कोटींकडून ३५७ लाख कोटी इतका झाला, त्यात मोदींच्या कार्यकाळात तिप्पट वाढ झाली. 'युपीए'च्या सरकारमध्ये योजनांमधून, अनुदानावर भर होता. यातून अवलंबित्वाची अनुदानप्रणीत अर्थव्यवस्था उभी राहिली. याउलट, पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या कार्यकाळात गुंतवणुकीच्या माध्यमातून संधी आणि या संधींमधून अर्थव्यवस्थेचा विस्तार करण्यात आला. यातून तिजोरीत आलेल्या पैशांतून 'गरीब कल्याणा'चा अजेंडा राबवून गरिबांना त्यांच्या पायावर उभा करण्याचा 'अंत्योदया'चा प्रयोग करण्यात आला.

अर्थव्यवस्थेत भारत तिसर्या स्थानी जाण्यासाठी रणनीती आणि विकासाचा अजेंडा मोदींनी उभा केला. पायाभूत सोयीसुविधांच्या प्रकल्पातून दळणवळणाची व्यवस्था उभी केली. रस्ते, बंदरे, रेल्वे, विमानतळे यांची उभारणी करण्यात आली. त्यासोबतच 'गतिशक्ती'च्या माध्यमातून 'लॉजिस्टिक'चा खर्च कमी करण्याचे प्रयत्न पंतप्रधान मोदींच्या कार्यकाळात झाले. १६ टक्क्यांवरून हा खर्च आता ११ टक्क्यांवर आला आहे. हा खर्च आठ टक्के झाल्यानंतर भारतजगातील इतर संपन्न देशांशी स्पर्धा करू शकेल. यामुळे जगाच्या पुरवठा साखळीत भारत महत्त्वाची भूमिका बजावेल. काश्मीर, ईशान्य भारतासारख्या भागात तिथं नागरिकांनी रेल्वेही पाहिली नव्हती, तिथे नरेंद्र मोदी सरकारच्या काळात रेल्वे पोहोचली. सीमावर्ती भागात पायाभूत सोयीसुविधांचं जाळं उभं करून भारतीय सैन्यदलासाठी हालचालींचा वेळ कमी करण्यात आला. चीनसारख्या देशाशी सामना करण्यासाठी सैन्यदलाला मोठं बळ मिळालं आहे. जगामध्ये सामुद्रिक व्यापार ज्यांच्याकडे आहे, तेच जगावर राज्य करतात. हे ओळखून देशातील सर्वांत मोठं बंदर वाढवण बंदराच्या निर्मितीचे काम हाती घेण्यात आलं आहे. एकट्या वाढवण बंदरामुळे सामुद्रिक व्यापार देशाला ३० वर्षे पुढे नेणार आहे.

### 'जीएसटी'चा ऐतिहासिक निर्णय

पंतप्रधान मोदींच्या काळात लागू करण्यात आलेल्या 'जीएसटी'च्या निर्णयामुळे मोठा बदल घडून आला. 'जीएसटी'मुळे व्यापारातील अडथळे मोडून काढण्यात आले. 'युपीए'च्या सरकारला जे शय झालं नाही, ते नरेंद्र मोदींनी करून दाखवलं. 'जीएसटी'वर त्यांनी एकमत घडवून आणलं. 'जीएसटी'चं विधेयक राज्याच्या विधानसभेत मांडलं, त्यावेळी 'जीएसटी' स्वीकारू नये, असं विरोधकांचं म्हणणं होतं. महाराष्ट्र हे 'मॅन्युफॅक्चरिंग' राज्य आहे. सीमा तोडून व्यापार सुरू झाल्याने त्यातून राज्याला फायदाच होईल, हे त्यावेळी भाषणात सांगितलं होतं. २०१६ साली 'जीएसटी' आला, त्यावेळी राज्याचं संकलन ७५ कोटी होतं, ते गेल्यावर्षी दोन लाख ७५ हजार कोटी इतकं झालं आहे. 'जीएसटी'चं नेटवर्क हे क्रांतिकारी पाऊल पंतप्रधान मोदींच्या कार्यकाळात उचलण्यात आलं.

'वॅट'पेक्षा 'जीएसटी' भरणारे पाचपट वाढले. मात्र, 'जीएसटी'च्या नेटवर्कमुळे यात सुसूत्रता राहिली. 'जीएसटी'मुळे संपूर्ण देशाची एकच बाजारपेठ झाल्यामुळे मोठ्या प्रमाणात परदेशी गुंतवणूक देशात आली. त्याचाही फायदा महाराष्ट्राला झाला. देशात परदेशी गुंतवणूक पाच ते सातपट वाढली. मात्र, त्यातील ४० टक्के गुंतवणूक एकट्या महाराष्ट्रात होत आहे.

### 'डिजिटल इकोनॉमी'त भारताचं पाऊल

नरेंद्र मोदींच्या कार्यकाळात 'डिजिटल इकोनॉमी'त भारताने ठेवलेलं पाऊलही तितकंच महत्त्वाचं आहे. 'यूपीआय' हे 'डिजिटायझेशन'चे आश्चर्यच आहे. ज्या प्रकाराने भारताने 'पेमेंट गेटवे' सुरू केला, त्यानंतर आता जगातील २५ पेक्षा जास्त देश हे 'यूपीआय' 'पेमेंट गेटवे' म्हणून वापरत आहेत.

'डिजिटल इकोनॉमी'मुळे देशातील योजनांचा लाभ अखेरच्या घटकापर्यंत जाण्यासाठीही मोठा लाभ झाला. राजीव गांधी पंतप्रधान असताना ते म्हणाले होते, दिल्लीतून एक रुपया पाठवतो, तर १५ पैसे अखेरच्या माणसापर्यंत पोहोचतात. कारण, त्याकाळी आपल्याकडे असलेली वितरण पद्धत ही व्यक्तिकेंद्रित नव्हती, तर व्यवस्थाकेंद्रित होती. मोदींनी उभ्या केलेल्या 'यूपीआय' आणि 'जन-धन'सारख्या व्यवस्थेमुळे कोणत्याही योजनेचे पैसे थेट आता लाभार्थींपर्यंत पोहोचत आहेत. यामुळे देशातील जमिनीवरचा भ्रष्टाचार कमी करण्यात मोठं यश आलं.

### परराष्ट्र धोरण आणि संरक्षण

नवा भारत कोणाच्याही दबावात येत नाही. सध्याच्या काळात व्यापाराचा शस्त्र म्हणून वापर करण्यात येतो. भारतावर मध्यंतरीच्या काळात व्यापार अडथळे निर्माण करण्यात आले. मात्र, भारत 'याचक' म्हणून गेला नाही. या काळात भारताने सांगितले की, 'व्यापार करार होतील. पण, देशातील शेतकर्यांचं हित असेल तरच हे करार होतील,' अशी भूमिका घेण्यात आली. भारताने कणखर भूमिका घेतली. अमेरिकेशी करार झाला, तरी शेतकर्यांना त्यातून बाहेर ठेवण्यात येणार आहे. आज भारत महत्त्वाची बाजारपेठ आहे. त्यामुळे युरोपने भारताशी व्यापार करार केला. यामुळे अडथळ्यांविना भारताचा माल युरोपीय देशांच्या बाजारात जातो आहे. अनेक देशांसोबतच्या व्यापारातून आपल्या देशाची अधिक निर्यात होते आहे. त्याठिकाणी आपली परिस्थिती 'ट्रेड सरप्लस' आहे.

### कणखर भूमिका घेणारा भारत

प्रत्येक युद्धजन्य परिस्थितीत भारताने आपली भूमिका ठामपणे मांडली. कुणाचीही बाजू न घेता कणखर भूमिका घेतल्याने जगातील सर्व नेते भारतासोबत मैत्री ठेवण्यासाठी इच्छुक आहेत. अमेरिका, रशिया, युरोप, अगदी ज्यांची युद्धे सुरू आहेत, ते प्रत्येक देशहीभारताशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवत आहेत. त्यांना भारताबाबत विश्वास वाटतो. देशातील काही उद्योगपतींशी चर्चाझाली. त्यात ते म्हणाले की, भारत सध्या अशा ठिकाणी आहे की, आपण घेतलेल्या या भूमिकेमुळे युद्ध संपल्यानंतर होणाऱ्या आर्थिक भरभराटीत भारताचं महत्त्वाचं स्थान असेल.

### 'ऑपरेशन सिंदूर'मधून सामरिक ताकदीचं दर्शन

'ऑपरेशन सिंदूर'मधून भारताने सामरिक ताकद जगाला दाखवून दिली आहे. ते युद्ध केवळ पाकिस्तानशी नव्हतं, तर चीनशीही भारत शीतयुद्ध लढत होता.

(पान ६ वर)

राष्ट्ररक्षा **हेमंत महाजन**

# इंटरनेटवर इराणच्या 'टोल-ए-जंग' वसुलीचे सावट

**इराण आणि अमेरिकेतील संघर्षाने आधीच जागतिक अर्थव्यवस्थेचे कंबरडे मोडले आहे. त्यातच इराणने आता त्यांच्या समुद्री क्षेत्रातील इंटरनेटच्या केबल्ससाठी टोल आकारणी करण्याचा मानस व्यक्त केला आहे. इराणने व्यक्त केलेली इच्छा ही भविष्यातील धोक्याचा इशारा आहे. युद्धामध्ये इंटरनेटचा शस्त्र म्हणून दबावनिर्मितीसाठी उपयोग झाल्यास, जागतिक व्यवस्था आणि अर्थव्यवस्था यांवर होणारे परिणाम निश्चितच भयावह असतील. याच परिणामांचा घेतलेला मागोवा...**




समुद्राखाली टाकण्यात आलेल्या इंटरनेट केबल्सच्या ऑपरेटर्सकडून, इराणी सागरी क्षेत्रातील प्रवेशासाठी शुल्क आकारण्याचा प्रस्ताव इराण सरकारने मांडला. यामुळे 'इंटरनेट' या जागतिकीकरणाच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या सुविधेकडे सर्वांचेच लक्ष वेधले गेले. सध्या समुद्राखाली ५०० हून अधिक केबल्सचे जाळे विस्तारलेले असून, याच माध्यमातून जगातील ९५ टक्क्यांहून अधिक आंतरराष्ट्रीय डेटाची वाहतूक चालते. पश्चिम आशियातील लाल समुद्र, 'बाब- अल- मंदेब', होर्मुझची सामुद्रधुनी, सुएझ कालवा हे अरुंद सागरी मार्ग 'डिजिटल चोकपॉईंट्स' म्हणून कार्य करतानाच, युरोप, आशिया आणि आफ्रिकेतील आर्थिक केंद्रांनाही जोडतात. २०२४ मध्ये तांबड्या समुद्रातील समुद्री केबल्सशी संबंधित घटनांमुळे युरोप व आशियामधील सुमारे २५ टक्के इंटरनेट सेवेवर परिणाम झाला होता. यातूनच या केबल्सचे जगाच्या अर्थकारणासाठीचे महत्त्व अधोरेखित होते.

**डिजिटल पायाभूत सुविधा:** पूर्व महत्त्वाच्या पायाभूत सुविधांमध्ये तेलवाहिन्या, बंदरे किंवा वीज ग्रीड यांचा समावेश होत असे. मात्र, आता डेटा पायाभूत सुविधाही राष्ट्रीय आणि आर्थिक सुरक्षेच्या दृष्टीने तितक्याच महत्त्वाच्या झाल्या आहेत. समुद्राखाली असलेल्या या केबल्समधील मोठी समस्या म्हणजे, पायाभूत सुविधांचे केंद्रीकरण. अनेक केबल्स या समुद्रतळावर एकाच मार्गाने जातात आणि काही मोजक्याच सागरी 'चोकपॉईंट्स'मधून बाहेर पडतात. यातील एखाद्या केबलला हानी पोहोचल्यास, अनेक देशांमधील संपर्क व्यवस्थाच बाधित होऊ शकते.

**पुढील क्षेत्रांना अधिक फटका:** सध्या इंटरनेटच्या पारंपरिक व्यवस्थेला पर्यायी व्यवस्था उपलब्ध नसल्यामुळे आफ्रिका, पश्चिम आशिया आणि दक्षिण आशियातील विकसनशील देशांना त्याचा सर्वाधिक फटका बसण्याची शक्यता आहे. या फटक्यातून कोणत्याही आर्थिक बाजारपेठा सुरक्षित नाहीत. यामुळे जागतिक 'पेमेंट नेटवर्क्स' आणि आंतरराष्ट्रीय बँकिंग व्यवहार विस्कळीत होण्याचीही भीती आहे. यामुळे विमा, जहाज वाहतूक उद्योग आणि ऊर्जापुरवठा साखळ्यांनाही मोठ्याच अनिश्चिततेला सामोरे जावे लागेल. 'ड्रोन' चालवण्यापासून 'रसद' नियोजनापर्यंत, लष्करातील प्रत्येक यंत्रणा यामुळे प्रभावित होण्याची शक्यता बळावते. अशा पद्धतीचे संकट आल्यास, त्याचा जगावरती काय परिणाम होईल? भारतावर काय परिणाम होईल? भविष्यात समुद्रातून जाणाऱ्या इंधनाच्या पाईपलाईनवर काय परिणाम होईल? हे बघणे महत्त्वाचे ठरणार आहे.

**समुद्राखालील इंटरनेट केबल्स:** इंटरनेट आधुनिक जगाची जीवनवाहिनी असून, आजचे जग तेल, वायू, व्यापार मार्गांवर व डेटावर चालते. जगातील सुमारे ९५ टक्के आंतरराष्ट्रीय इंटरनेट आणि डेटा वाहतूक, समुद्राखालील फायबर-ऑप्टिक केबल्सद्वारेच होते. या केबल्समुळेच बँकिंग व्यवहार, भांडवली बाजार, लष्करी संवाद, उपग्रह नियंत्रण, समाजमाध्यम, 'क्लाऊड' सेवा, 'एआय' डेटा सेंटर्स, 'ई-कॉमर्स' आणि सरकारी संवाद सतत चालू राहतात. इराणने त्याच्या सागरी क्षेत्रातून जाणाऱ्या समुद्राखालील केबल्सवर शुल्क आकारण्याचा प्रस्ताव मांडल्याने, जगाला या असुरक्षिततेची जाणीव झाली.

**समुद्राखालील इंटरनेट केबल्सचे सामरिक महत्त्व :** समुद्राखालील केबल्स म्हणजे, जागतिक अर्थव्यवस्थेच्या रक्तवाहिन्या आहेत. यांच्याद्वारेच स्विफ्ट बँकिंग व्यवहार, शेअर बाजारातील रिअल टाईम ट्रेडिंग, गूगल, मायक्रोसॉफ्ट, मेझॉन यांचे क्लाऊड नेटवर्क, एआय सर्व्हर्सचे डेटा ट्रान्सफर, लष्करी संवादासाठीचे ड्रोन आणि 'सायबर ऑपरेशन्स'सह उपग्रहाचे डेटा व्यवस्थापन चालते.

**पश्चिम आशियातील डिजिटल चोकपॉईंट्स:** होर्मुझ, बाब- अल- मांडेब, सुएझ कालवा, लालसमुद्र हे मार्ग डेटा वाहतुकीची केंद्रे आहेत. या क्षेत्रातील पर्यायी मार्ग मर्यादित आहेत. युद्ध, दहशतवादी हल्ला, समुद्री चाचेगिरी किंवा ड्रोन हल्लयांमुळे या केबल्सला नुकसान होऊ शकते.

**इराणचे धोरण:** 'डेटा जिओपॉलिटिक्स' इराण आता इंधन आणि होर्मुझ सामुद्रधुनीवरच नियंत्रण ठेवण्याबरोबरच डेटा वाहतुकीवरही प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करत आहे. इराणला यातून मिळणारा लाभ पुढीलप्रमाणे

**आर्थिक उत्पन्न:** समुद्री क्षेत्रातून जाणाऱ्या केबल्सवर शुल्क लादल्याने आर्थिक लाभ.

**सामरिक दबाव:** अमेरिका आणि पश्चिम देशांवर दबावनिर्मिती करून धोरणात्मक लाभ मिळवणे.

**डिजिटल युद्धातील शस्त्र :** भविष्यात 'इंटरनेट कनेक्टिव्हिटी'ला युद्धातील शस्त्र म्हणून वापरणे शक्य.

**जगावर होणारे संभाव्य परिणाम:** इंटरनेट सेवा विस्कळीत झाल्यास त्याचे परिणाम जागतिक अर्थव्यवस्था विस्कळीत होण्याची शक्यता.

**शेअर बाजार :** भांडवली बाजारातील व्यवहार थांबू शकतात. परिणामी, भांडवली बाजारात घसरण होण्याची शक्यता असून, डॉलर्सचे व्यवहारही खोळंबतील.

**बँकिंग संकट:** स्विफ्ट नेटवर्क विस्कळीत झाल्यास आंतरराष्ट्रीय देयके थांबणे, क्रेडिट व्यवहारात अडथळा होण्याची शक्यता.

**ई-कॉमर्स:** मेझॉन, अलिबाबा, 'फ्लिपकार्ट'सारख्या कंपन्यांचे 'लॉजिस्टिक्स नेटवर्क'ही प्रभावित होईल.

**'क्लाऊड' आणि 'एआय' सेवा प्रभावित:** आज 'एआय डेटा सेंटर्स' अमेरिका, युरोप आणि आशियात जोडलेले आहेत. जर समुद्राखालील केबल्सना हानी पोहोचली, तर 'एआय मॉडेल्स'चा डेटा प्रवाहच मंदावेल. 'क्लाऊड' सेवा बंद पडून मायक्रोसॉफ्ट अझ्युर, एडब्ल्यूएस, गूगल क्लाऊड' यांच्यावरही परिणाम होईल.

**लष्करी परिणाम:** आधुनिक युद्ध 'डेटा'आधारित असून, ड्रोन चालवणे, उपग्रह नियंत्रण, मिसाईल ट्रॅकिंग, नौदल समन्वय, सायबर युद्ध हे सर्वच आज 'फायबर नेटवर्क'वरच अवलंबून आहे. त्यामुळे या 'फायबर'ला हानी पोहोचल्यास सैन्याच्या प्रतिक्रियेचा वेग मंदावेल, कमांड आणि कंट्रोलमध्ये अडथळे निर्माण होतील. त्याचबरोबर माहिती युद्धातही गोंधळसदृश्य परिस्थिती निर्माण होईल.

**भारतावर होणारे परिणाम:** भारत हा जगातील सर्वांत वेगाने वाढणारा डिजिटल देश असून, मुंबई, चेन्नई, कोची या शहरांमध्ये अनेक आंतरराष्ट्रीय 'केबल लॅण्डिंग स्टेशन' आहेत. त्यामुळे समुद्राखालील इंटरनेटच्या केबल्सला हानी पोहोचल्यास भारतावर होणाऱ्या परिणामांचाही विचार करावा लागेल.

**आर्थिक परिणाम:** भारताच्या 'यूपीआय', ऑनलाईन बँकिंग, 'डिजिटल पेमेंट स्टार्टअप इकोसिस्टम'वरच परिणाम होऊ शकतो. **उद्योगविश्वाला मोठा फटका:** भारताचा 'आयटी' आणि 'बीपीओ' उद्योग अमेरिकन आणि युरोपीय 'डेटा नेटवर्क'वर अवलंबून आहे. जर इंटरनेट सेवा प्रभावित झाल्यास सेवा वितरणात विलंब होईल.

**राष्ट्रीय सुरक्षेवरील परिणाम:** भारताचे नौदलाचे नेटवर्क उपग्रह, डेटा, सायबर कमांड, 'आयएसआर' प्रणाली, गुप्तचर पाळत ठेवणे, हे सर्वच प्रभावित होऊ शकते. भारतीय नौदलाला समुद्राखालील पायाभूत सुविधांचे संरक्षण, पाणबुडीविरोधी टेहळणी आणि समुद्रतळ युद्धक्षमतेचा विकास वाढवावा लागेल. समुद्रातील केबल्सवरचा धोका वाढल्यास त्यापुढील लक्ष्य तेल पाईपलाईन, गॅस पाईपलाईन, 'ऑफशोर एनज प्लॅटफॉर्म्स' असण्याची शक्यताही नाकारता येत नाही.

**नॉर्ड स्ट्रीम पाईपलाईन'चे नुकसान:** या घटनेने दाखवून दिले की, समुद्रातील सुविधाही सहजपणे लक्ष्य करणे शक्य असून, 'ग्रे झोन वॉरफेअर' मध्ये सध्या हेच सुरू आहे.

**भविष्यातील युद्ध:** भविष्यात पाणबुड्या, पाण्याखालील ड्रोन, 'एआय' घातपात प्रणाली, समुद्रतळ सेन्सर्स यांच्या माध्यमातून केबल्स तोडणे, पाईपलाईन उडवणे, 'सेन्सर नेटवर्क' नष्ट करणे, हेच युद्धाचे नवे स्वरूप असण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. अमेरिका, चीन, रशिया आणि 'नाटो' देश समुद्रतळ युद्धक्षमतेवर मोठी गुंतवणूक करत आहेत.

**आंतरराष्ट्रीय कायदा काय सांगतो?** संयुक्त राष्ट्रसंघाच्या UNCLOS अंतर्गत, समुद्राखालील केबल्सना काही प्रमाणात संरक्षण दिलेले आहे.

**(१) केबल टाकण्याचा अधिकार:** देशांना आंतरराष्ट्रीय समुद्रात केबल टाकण्याचा अधिकार आहे.

**२) जाणीवपूर्वक नुकसान बेकायदेशीर:** केबल्स तोडणे किंवा त्यांना नुकसान पोहोचवणे, आंतरराष्ट्रीय कायद्याचे उल्लंघन ठरू शकते.

**(३) किनारी देशांचे अधिकार:** इराणसारख्या देशांना पर्यावरणीय नियम, सुरक्षा नियम लागू करता येतात. मात्र, ते संपूर्णपणे इंटरनेटचा प्रवाह बाधित करू शकत नाहीत.

**कायदा जुना, युद्ध नवे** UNCLOS हा कायदा तयार झाला, तेव्हा 'एआय' अस्तित्वात नव्हते, डिजिटल अर्थव्यवस्था नव्हती, सायबर युद्धही नव्हते. आज 'डेटा' हे जगाचे नवीन इंधन आहे. डिजिटल पायाभूत सुविधा राष्ट्रीय सुरक्षेचा भाग झाल्या असल्यानेच, नवीन करारांची गरजही निर्माण झाली आहे.

**भारताने काय करावे?**

**बहुपर्यायी केबल नेटवर्क:** भारताने पर्यायी मार्ग म्हणून इंडो- पॅसिफिक केबल कॉरिडॉर, अंदमान आणि निकोबार आधारित नेटवर्कमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे.

**समुद्री सुरक्षा मजबूत करणे:** सैन्याद्वारे समुद्रतळाचे निरीक्षण, खोल समुद्रातील ड्रोन आणि सेन्सर्समधील गुंतवणूक वाढवावी लागेल.

**'डेटा' सार्वभौमत्व:** भारताने स्वदेशी 'क्लाऊड', सार्वभौम 'एआय' पायाभूत सुविधा, देशांतर्गत 'डेटा राऊटिंग'वर भर देणेही आवश्यक आहे.

---




# सिग्नलवर हरवलेलं बालपण...
# थांबलेल्या गाड्या, न थांबणारं शोषण

पोरकी पोरं **डॉ. तुषार सावरकर**

लाल सिग्नल लागतो. वाहनांच्या रांगा थांबतात. एसी गाड्यांच्या काचा बंद होतात आणि त्याच क्षणी काही लहान हात त्या काचांवर टकटक करू लागतात. कोणाच्या हातात फुलं असतात, कोणाच्या हातात बाळ असतं, तर कोणाच्या डोळ्यांत फक्त भूक असते. काही सेकंदांत हिरवा सिग्नल लागतो. गाड्या पुढे निघून जातात आणि ती मुलं पुन्हा पुढच्या वाहनाकडे धाव घेतात. शहरासाठी हा रोजचा देखावा असतो; प्रत्यक्षात आपल्या समाजाच्या सामूहिक अपयशाचं ते जिवंत चित्र असते. भारत डिजिटल अर्थव्यवस्था, स्मार्ट सिटी आणि जागतिक महासत्ता होण्याच्या दिशेने वाटचाल करीत असताना हजारो मुलं अजूनही सिग्नलवर उभी राहून नाण्यांची वाट पाहत आहेत. त्यांच्या हातात पुस्तकं नाहीत, शाळेची पिशवी नाही; आहे ती फक्त जगण्यासाठीची धडपड. ही मुलं भिक्षा मागत नाहीत, तर प्रत्यक्षात समाजाकडे अस्तित्वाची विनंती करीत असतात.

भारतातील भिक्षावृत्ती आणि रस्त्यावरची मुलं याविषयीची अधिकृत आकडेवारी अनेकदा अपुरी आणि विस्कळीत स्वरूपात उपलब्ध असते. तरी विविध अभ्यास आणि स्वयंसेवी संस्थांच्या अहवालांनुसार देशात लाखो मुले रस्त्यावरचं जीवन जगत आहेत. दिल्ली, मुंबई, कोलकाता, हैदराबाद, पुणे, बेंगळुरू यांसारख्या महानगरांमध्ये सिग्नलवर, रेल्वे स्थानकांवर, धार्मिक स्थळांजवळ आणि बाजारपेठांमध्ये भिक्षा मागणारी मुलं सहज दिसतात. 'सेव्ह द चिल्ड्रेन, रेल्वे चिल्ड्रेन इंडिया' आणि इतर संस्थांच्या अभ्यासांनुसार या मुलांपैकी मोठा वर्ग कुटुंबापासून विभक्त झालेला, स्थलांतरित, अत्यंत गरीब किंवा शोषणाच्या चक्रात अडकलेला असतो. या मुलांचं वास्तव अत्यंत कडोर असतं. अनेक मुलं दिवसभर उन्हात, पावसात, धुरात आणि धोकादायक वाहतुकीच्या मधोमध उभी असतात. त्यांना दिवसाला किती पैसे जमा करायचे याचं लक्ष्य दिलेलं असतं. काही वेळा ही भिक्षावृत्ती संघटित रॅकेटच्या नियंत्रणाखाली चालते. मुलांना मुद्दाम अपंग दाखवणं, औषध देऊन झोपवून मांडीवर घेऊन फिरणं किंवा भावनिक सहानुभूती निर्माण करण्यासाठी त्यांचा वापर करणं अशा अमानुष घटना वेळोवेळी समोर आल्या आहेत. काही प्रकरणांमध्ये मानवी तस्करी, बालशोषण आणि जबरदस्तीची भीक मागणी यांचाही संबंध उघड झाला आहे. या मुलांचं बालपण प्रत्यक्षात रस्त्यावरच संपत जातं. त्यांना खेळाचं मैदान नसतं, सुरक्षित घर नसतं, नियमित अन्न नसतं. दिवस संपल्यावर अनेक मुलं फुटपाथवर, पुलाखाली किंवा तात्पुरत्या झोपड्यांमध्ये झोपतात. त्यांच्यासाठी शहर म्हणजे संधीचं नव्हे, तर असुरक्षिततेचं प्रतीक बनतं. शिक्षणाच्या बाबतीत तर चित्र आणखी गंभीर आहे. सिग्नलवर भीक मागणाऱ्या मुलांपैकी मोठा वर्ग शाळाबाह्य असतो. काही मुलं कधीच शाळेत पोहोचत नाहीत, तर काही सुरुवातीला जातात; नंतर गरिबी, स्थलांतर, हिंसा किंवा कुटुंबीयांच्या दबावामुळे शिक्षण सोडतात. अनेक मुलांना स्वतःचं नाव लिहिता येत नाही. त्यांच्यासाठी शाळा ही वास्तव नसून दूरची कल्पना बनते. शिक्षणाचा हक्क कायदा अस्तित्वात असला, तरी सिग्नलवर उभ्या असलेल्या मुलांपर्यंत तो पोहोचत नाही, ही वस्तुस्थिती आहे. आरोग्याच्या दृष्टीनेही ही मुलं अत्यंत धोकादायक परिस्थितीत जगत असतात. प्रदूषण, कुपोषण, अस्वच्छता, अपुरी झोप आणि व्यसनांच्या संपर्कामुळे त्यांचं शारीरिक व मानसिक आरोग्य गंभीरपणे प्रभावित होतं. अनेक मुलं लहान वयातच तंबाखू, दारू, सोल्यूशन किंवा ड्रग्जच्या आहारी जातात. काही अभ्यासांमध्ये रस्त्यावर राहणाऱ्या मुलांमध्ये नैराश्य, भीती, हिंसक वर्तन आणि मानसिक आघाताचं प्रमाण अधिक असल्याचं नमूद करण्यात आलं आहे. या परिस्थितीत मुलींची अवस्था अधिकच भयावह असते. सिग्नलवर भीक मागणाऱ्या मुलींना लैंगिक शोषण, मानवी तस्करी, बालविवाह आणि हिंसेचा अधिक धोका असतो. अनेक मुली लहान भावंडांना सांभाळत रस्त्यावर उभ्या असतात. काही वेळा त्यांच्या शरीराचाच 'कमाईचं साधन' म्हणून वापर केला जातो. त्यामुळे त्यांचं बालपण केवळ गरिबीमुळे नव्हे, तर असुरक्षिततेच्या अनेक थरांमुळे हरवत जातं. समस्या इतकी मोठी असूनही समाजाची प्रतिक्रिया अनेकदा वरवरची असते. आपण सिग्नलवर थांबतो, एखादं नाणं देतो, क्षणभर दया वाटते आणि पुढे निघून जातो. (पान ६ वर)

---

कथा **हेमा नागपूरकर**

आयसीयूच्या बंदिस्त वातावरणात, यंत्रांच्या गराड्यात आणि गारव्यात गारठून गेलेय मी. पण मी कोण? आत्मा? नसावा! कारण आत्म्याला देहातून बाहेर येऊन मुक्तपणे फिरता येतं म्हणे! मी या अचेतन देहातच आहे. बंदिस्त. मग हे काय माझं देहातील मन असावं? बहुधा असंच असावं! शरीराच्या सर्व जाणिवा हरवल्या आहेत. आधी कसं होतं, मी सांगायचं आणि या देहानं ते निमूट ऐकायचं. आता त्यानं बंड पुकारलंय; त्याच्या छोट्या छोट्या असहकाराला दाद दिली नाही ना मी! आता मात्र कोंडीत सापडलेय. प्राणपाखरू उडून गेले, असे म्हटलेलं ऐकलेय; पण उडायला बळ कमी पडलं तर...! तर कसं होतं हे अनुभवतेय.

आपल्याच देहाच्या पिंजऱ्यात जखमी होऊन पडलेय! बाहेरच्या नळावरून पाण्याची कळशी घेऊन पायऱ्या चढत होते. एवढं जोरात गरगरलं. हातातली कळशी ठण् ठण् करत खाली पडली. आवाज ऐकून बाहेर आलेल्या बेबीला पाहिलं मी. स्वत:ला सावरायचा खूप प्रयत्न केला, पण नाहीच जमलं. 'काकू, काकू' म्हणत धावत येणाऱ्या बेबीला पाहिले अन् शुद्ध हरपली. इथे कशी आले माहीत नाही, पण बेबी आणि प्रशांतनंच आणलं भाड्याने राहायला आले. जितूची काळजी मिटली. नुकतंच लग्न झालेली बेबी संसाराच्या पडलेल्या जबाबदारीने जराशी भांबावलेली. तिची आई आली होती घर लावायला. जाताना म्हणाली, ''ताई आतापर्यंत पंखाखाली राहिलेली आहे पोरगी. अजून कशााचीच सवय नाही. तुमच्या छत्राखाली सोडून जातेय. सांभाळा आणि शिकवा तिला.'' बेबी मोठी लाघवी, तिनं मला प्रेमानी आपलंसं केलं. मीही अगदी कूकर लावण्यापासून पोळ्या लाटण्यापर्यंत सगळं तिला शिकवलं. आता अगदी सुगरण झाली होती. त्या दिवशी मला म्हणाली, ''काकू, कोथिंबीर आणली छान मिळाली म्हणून मी सारण करतेय आपण पुडाच्या वड्या करुया तुम्ही सांगाल तशा.'' मी तिला हो म्हटलं. तेवढ्यात अंगणातल्या नळाखाली लावलेल्या बादलीत पाण्याची धार पडल्याचा आवाज आला. आजकाल पाणी वर चढत नसे; मग पिण्यापुरतं एक बादली आणि कळशीभर पाणी खालून आणावं लागायचं. मला पायऱ्या उतरताना पाहून आतूनच बेबी ओरडली, ''काकू, मी आणून देते पाणी राहू द्या तुम्ही.'' मला वाटलं एवढीशी तर कळशी, ती घेऊन जाते. बादली आणेल बेबी म्हणून उतरले अन् हे भलतच त्रांगडं झालं आता. इथं या थंडगार वातावरणात केसावरून फिरणारा उबदार स्पर्श जाणवला. ''डॉक्टर काय म्हणतात आईचे रिपोर्ट...?'' हा जितूचा आवाज. आला असणार तातडीने बंगळुरुहून. ''त्यांच्या मेंदूत क्लॉट आला आहे. आम्ही औषधे देऊ. तो विरघळवण्याचा




असणार. रक्ताच्याही पलीकडच्या मायेच्या नात्यानं बांधल्या गेलोत आम्ही, आताही लांब असणारी मुलं तडकाफडकी येऊ शकली असतील की नाही कुणास टाऊक. बेबी मात्र नक्की असणार तिचा आश्वासक हात यांच्या पाठीवरून फिरत असणार. ''काका, तुम्ही काळजी करू नका'' म्हणत ती त्यांना नक्कीच धीर देत असणार. या पोरीचा माझा मागच्या जन्माचा ऋणानुबंध असणार. दोनच वर्षापूर्वी भाडेकरू म्हणून राहायला आलेली बेबी अगदी पोटच्या पोरीसारखी माया करू लागली होती. प्रशांत आणि बेबीमुळेच आम्हाला इथे गावी राहणं शक्य झालं होतं. नाहीतर जितूची सारखी भुणभुण चालू झाली होती. आता तुम्ही इथे एकटे राहू नका, चला माझ्या बरोबर बंगलोरला. पण खरं सांगते त्याच्या त्या प्रशस्त फ्लॅटमध्येही जीव घुसमटायचा माझा. इथे आमचं दार दिवसभर उघडं. येणार-जाणारा सहजच आत डोकावायचा. ''काय काकू बऱ्या आहात ना? चाललो होतो इकडून म्हटलं एकदा नाना-काकूंना भेटून घ्यावं!' अशी वर्दळ असायची; शिवाय मंदिरातील भजन, कीर्तन, भगिनी मंडळातील कार्यक्रम, कुणाकडल्या लग्न, मौंजी भरपूर करमणूक होती इथे. बंगळुरुमध्ये बाहेरच्या माणसांचं दर्शनही दुर्मिळ. आमचं हो-नाही चालू असतानाच जितूच्या साळ्याची इथे बदली झाली अन् मग प्रशांत आणि बेबी आमच्या घरात प्रयत्न करीत आहोत? बघूया, पण फारशी आशादायक परिस्थिती नाही.'' ''मग यावर उपाय काय?'' ''त्यांना नागपूरला नेऊन ऑपरेशन करावं लागेल.'' ''त्यानंतर आई पूर्णपणे बरी होईल ना?'' ''सांगता येत नाही. ऑपरेशन कठीण आहे. ते यशस्वी झाले तरीही शंभर टक्के बरी होण्याची शक्यता कमीच. त्यांचं वय पाहता अपंगत्व येण्याची शक्यता जास्त. बघा तुम्ही ठरवा आणि सांगा मला काय ठरवलंय.'' डॉक्टरांच्या पावलांचा आवाज बाहेर गेला. त्यानंतर जितूच्या हुंदक्याचा आवाज ऐकू येत होता. तो गदगदून रडत होता. ''दादा तूच असा धीर सोडून कसं चालेल. बाहेर नाना बसले आहेत. त्यांना समजवायला हवंय. चल बाहेर जाऊन बोलूया.'' ते बाहेर गेले. तिथे पुन्हा भीषण शांतता पसरली. 'अरे बाबांनो बोलून काय ठरवताय आता? झालंय सगळं आयुष्य सुखानं जगून. मुलं- नातवंड सगळी सुखात आहेत. आणखी काय हवं मला. तृप्त आहे मी. आता दिगंताकडे निघालेली पावलं तशीच पुढे पडू द्यात; त्यांना मागे वळवण्याचा प्रयत्न नका करू.' माझे हे विचार कसे कळतील त्यांना. हतबल आहे मी शरीराच्या या असहकाराने. जीव तडफडतोय नुस्ता. किती वेळ झाला कोणास ठाऊक माझ्या केसांवरून फिरणारा स्पर्श जाणवू लागला. पाठोपाठ बेबीचा आवाज आला. (पान ६ वर)

# चिनी नजरेतला भारत

वळणावरच्या नोंदी

स्वाती काळे

फाहिआन दररोज पायपीट करीत भारताच्या दिशेने सरकत होते. 'खोतान'नंतर 'यारकंद' नदीच्या तीरावरून 'कारगालिक' आणि नंतर 'काशगर' या चीनच्या पश्चिमेकडील डोंगराळ भागात ते पोचले. काशगरचा राजा दर पाच वर्षांनी बौद्ध भिक्षूंची परिषद बोलवायचा. रेशमी पताका आणि छत्र्यांनी सजवलेल्या परिसरात आकाशात मेघ दाटल्याप्रमाणे बौद्ध भिक्षू चारही बाजूंनी जमायचे. राजा दोन्ही हातांनी दानधर्म करायचा.

भारतात पोहोचण्याचा पुढचा प्रवास बर्फाळ पर्वतरांगांमधून होता. कधी प्रचंड बर्फवष्टी, कधी रेताड ओस जमीन तर कधी बोचऱ्या वाऱ्याबरोबर पडणारा तुफान पाऊस याचा सामना करीत फाहिआन काराकोरम पर्वतरांगा ओलांडून अफगाणिस्तानमधल्या 'तो ली' राज्यात आले. तेथे मैत्रेय बोधिसत्वाची भव्य- दिव्य अशी ८० फुटांची मूर्ती होती. भविष्यातील बोधिसत्वाची ही मूर्ती घडविणारा मूर्तिकार तीन वेळा मैत्रेयाला बघण्यासाठी 'तुषिता' या स्वर्गात जाऊन आला म्हणे. 'तुषिता' म्हणजे चौथा देवलोक; जेथे सर्व बोधिसत्व पृथ्वीवर येण्यापूर्वी जन्म घेतात. उत्सवाच्या दिवशी ही मूर्ती विलक्षण तेजाने झळाळून उठते, असे फाहिआनने म्हटले आहे. आता काराकोरम पर्वतरांगाच्या उतारावरून नैर्ऋत्य दिशेने १० हजार फूट उंचीच्या खडकांच्या कडेकडेने अतिशय खडतर वाटेवरून फाहिआनचा प्रवास सुरू झाला. भारत बघण्याची दुर्दम्य इच्छाशक्ती यामुळेच केवळ या प्रवासात तो जिवंत राहिला. खाली सिंधू नदीच्या प्रवाहाची करंगळीएवढी धार दिसत होती.



७०० पायऱ्या उतरून दोरखंडांनी बनवलेल्या झुलत्या पुलावरून फाहिआन भारतात पंजाबकडील उत्तरेच्या 'स्वात' टोकाकडे आले. फाहिआन म्हणतात, येथील लोक मध्यभारताची भाषा बोलतात. पेहरावही त्यांच्यासारखा आहे. गौतम बुद्धही येथे येऊन गेलेत. त्यांच्या पावलाचा ठसा या प्रदेशात उमटला आहे. त्यांनी आपले कपडे कोणत्या दगडावर वाळवण्यासाठी टाकले हे सुद्धा येथील लोक सांगतात. स्वात खोऱ्यातून प्रवास करीत गांधार देशात फाहिआन पोचले आणि गांधार देशातून सात दिवसांच्या अखंड प्रवासानंतर तक्षशिलेला आले. गांधार देशात म्हणजे आजच्या पेशावर खोऱ्यात अशोकाचा पुत्र धर्म विवरधनाचे राज्य होते. याच प्रदेशात बुद्धाने एका माणसाला स्वतःचे डोळे काढून दिले होते. तक्षशिलेचा अर्थ धडावेगळे शरीर. बोधिसत्व बुद्धाने येथेच आपले शीर काढून एकाला दिले म्हणून 'तक्षशिला' नाव पडले.


गांधार प्रदेशातून दक्षिणेकडे चार दिवस चालत फाहिआन 'पुरुषपूर' (आधुनिक पेशावर) येथे पोहोचले. येथे बुद्धाने सांगितले होते की, कनिष्क नावाचा राजा याच जागेवर स्तूप बांधेल आणि खरोखरीच, कनिष्काने अद्वितीय असे स्तूप या जागेवर बांधले. येथेच बुद्धाचे भिक्षापात्रही आहे, असे म्हणतात. ही जागा 'गोर-खत्री' नावाने ओळखली जाते. 'युह शे' राज्याच्या राजाने चार हत्ती जोडलेल्या गाडीने भिक्षापात्र हलविण्याचा प्रयत्न केला; पण ते तसूभरही हलले नाही. कनिष्क राजाने स्तूप तेथेच बांधला. फाहिआन ज्या प्रदेशातून पायी चालत गेले त्या प्रदेशातील जातककथा त्यांनी रसाळपणे सांगितल्या आहेत. त्यामुळे त्यांच्या पुस्तकात बुद्धाच्या जन्मांचे सर्वंकष दर्शन होते. सोळा योजने पश्चिमेला चालल्यावर सध्याच्या अफगाणिस्तानच्या 'नगरहार' नावाच्या राज्याच्या सीमेवर ते आले. त्यांना तेथे जवळ 'हड्डा' नावाच्या गावात बुद्धाच्या कवटीचे हाड संरक्षित केलेले दिसले. हाडावरूनच 'हड्डा' नाव पडले असावे गावाचे. तेथीलच एका विहारात दात जपून ठेवलेला आहे. त्याच्या अवयवांमधून आणि वस्तूंमधून दिव्य प्रकाश बाहेर पडतो असे म्हणतात. फाहिआन म्हणतात, या सर्व अवशेषांना तेथील राजे प्राणपणाने जपतात. एके ठिकाणी त्याचे वस्त्र विहारात जपून ठेवले आहेत. जर दुष्काळ पडला तर हे वस्त्र बाहेर काढण्यात येते आणि त्याची पूजा केल्यावर भरघोस पाऊस पडतो. एका गुहेत तर बुद्धाची जमिनीवर राहून गेलेली सावलीही दिसते. बुद्धाची सुवर्णकांती आणि इतर सर्व लक्षणे या सावलीत दिसतात. अफगाणिस्तान आणि सध्याच्या पाकिस्तानातून येत फाहिआनने खैबरखिंड ओलांडली. तेथे पर्वतरांगांवर प्रचंड बर्फ साचलेला आणि थंड बोचरे वारे अंगाला झोंबत होते.

फाहिआनबरोबरचा सहकारी हुवी किंग थरथर कापत म्हणाला, "मी आता जगू शकत नाही. तू येथून ताबडतोब निघ. नाहीतर आपण दोघेही मरू..." वाक्य पूर्ण होण्याच्या आतच त्याचा देह जड झाला होता. हुवी किंगच्या मरण्याने फाहिआन पूर्ण कोलमडले, पण दुःख करून उपयोग नव्हता. आता त्यांच्याबरोबर ताओ चिंग हा एकटाच चिनी भिक्षू होता. कसेबसे जीव वाचवित ते दोघे पंजाबात पोचले आणि तेथून पुढे मथुरेला आले. फाहिआन म्हणतात, मथुरेतील लोक आनंदी आहेत. येथे घरांचे नोंदणीकरण करावे लागत नाही. कोर्टकचेऱ्या कराव्या लागत नाहीत. फक्त राजघराण्याची जमीन मशागत करणाऱ्याला ठरावीक हिस्सा द्यावा लागतो. कोणतीही कठोर शिक्षा येथे दिली जात नाही.

गुन्हेगाराला त्याच्या गुन्ह्याप्रमाणे दंड आकारला जातो. राजाच्या सैनिकांना नियमित पगार मिळतो. भारताच्या येथपासूनच्या पुढच्या प्रदेशाला फाहिआनने 'मिडल किंग्डम' असे संबोधले आहे. या 'मिडल किंग्डम'मध्ये प्राणिहत्या करीत नाहीत. शेतकरी गायीवासरे विकत नाहीत. लोक दारू पीत नाहीत. खरेदी-विक्रीचे व्यवहार 'कवड्यांनी' केले जातात. समाजव्यवस्थेविषयी फारशी माहिती फाहिआन देत नाहीत. शिकार करणारे किंवा मांस विकणारे 'चांडाळ' जेव्हा गावी येतात तेव्हा काठी आपटीत येतात. इतर लोक त्यांच्यापासून दूर उभे राहतात. एवढा एक उल्लेख मात्र फाहिआन करतात.गौतम बुद्धाच्या महापरिनिर्वाणानंतर राजांनी, व्यापारी पेढ्यांनी भिक्षूंसाठी विहार बांधले. त्यांना शेतजमिनी दान दिल्या. दानपत्रे धातूच्या पट्ट्यांवर कोरून ठेवलेली आहेत आणि त्यांचा महसूल मठांना मिळतो, असे फाहिआनने सांगितले आहे.

मथुरेहून अठरा योजने दूर संकास्य नगरीतही फाहिआन गेला होता. अजूनही हे गाव 'संकास्सम्' या नावानेच ओळखले जाते. या गावाबद्दल फाहिआनने सांगितलेली गोष्ट अशी की, गौतम बुद्धाच्या जन्मानंतर सात दिवसांनी त्याची आई म यादेवी निवर्तली. त्यामुळे बुद्धाच्या शिकवणुकीपासून ती वंचित राहिली. बुद्धाचे हृदय त्याच्या आईकरिता कळवळले. आईला धर्माचे ज्ञान देण्यासाठी बुद्ध ३३व्या स्वर्गात गेला. या स्वर्गाला 'इंद्रलोक' असेही नाव आहे. हा स्वर्ग मेरू पर्वताच्या चार शिखरांवर वसलेला आहे. इंद्राची राजधानी 'बेल्लेवू' मध्यभागी आहे आणि देवांची ३२ गावे सभोवताली वसलेली आहेत. या इंद्रलोकी तो तीन महिने राहिला. पृथ्वीवरून नाहीसा झाल्यामुळे त्याचे अनुयायी चिंतेत पडले. परंतु २३ व्या दिवशी त्याचा पट्टशिष्य आनंद त्याला पाहू शकला. तिसऱ्या महिन्याच्या शेवटी गौतम बुद्ध स्वर्गातून जेथे उतरला ती जागा म्हणजे संकास्य. उत्तर प्रदेशचे सध्याचे संकिसा हे गाव. ही घटना आणि शिडीचे अवशेष आजही या गावी दाखवले जातात. संकास्यनंतर फाहिआन कन्नौज, अयोध्या आणि श्रवस्तीला गेले. बुद्धाच्या वेळी येथे प्रसेनजित राजा राज्य करायचा. जेतवन विहारमध्ये बुद्धाच्या आठवणीने फाहिआनला भरून आले. हे उद्यान प्रसेनजिताचा मुलगा जेताच्या मालकीचे होते. अनाथपिंडक हा प्रसेनचित राजाचा मंत्री होता. खरे तर जेताच्या मनात उद्यान विकण्याचे नव्हतेच. पण गंमत म्हणून त्याने अनाथपिंडकाला सांगितले की, जेतवनाच्या जमिनीवर जेवढी सोन्याची नाणी मावतील तेवढी त्याची किंमत असेल.

अनाथपिंडकाने गोणी भरून सोन्याची नाणी आणली आणि ती जमिनीवर पसरवली. जेता अनाथपिंडकाच्या भक्तीने प्रसन्न झाला आणि हे उद्यान त्याला देऊ केले. येथे अनाथपिंडकाने भिक्षूच्या सोयींसाठी विश्रामगृह, स्नानगृह बांधले. बुद्धांच्या कुटीचे नाव 'मूलगंध कुटी' असे होते. अनेक वर्षे बुद्धाचे वास्तव्य येथे होते म्हणून या जागेचे अतिशय महत्त्व आहे. फाहिआन तेथील प्रमुखाला भेटला आणि जेव्हा त्याने सांगितले की, 'हान' देशातून तो गौतम बुद्धाच्या देशात आलेला आहे तेव्हा आश्चर्याने थक्क होऊन सर्व भिक्षुक त्यांच्याभोवती गोळा झाले. अजूनपर्यंत एवढ्या दुरून येथपर्यंत कोणीच आले नव्हते आणि बुद्धभूमीवर पाय ठेवल्याने फाहिआनच्या डोळ्यातले अश्रू थांबत नव्हते.



# इतना सन्नाटा क्यों है भाई...!

आनंद स्पंदन

डॉ. अविनाश मोहरील

सकाळी ६ वाजता मला अलार्म वाजायच्या आतच जाग येते. पहाटेची घरातील सर्व कामे मला घाईघाईने आटपावी लागतात. नवरा झोपला असतो. आधीच्या रात्रीच्या पार्टीचा हँगओव्हर उतरायचा असतो त्याचा. मला मात्र कामे आटोपून लगोलग ऑफिसला पळायचे असते. नेमके ऑफिसमध्ये लवकर बोलाविले जाते. त्यांचेही बरोबर आहे, पुढच्या आठवड्यात हेड ऑफिसची टीम येणार आहे. त्यामुळे कामे तर करावीच लागणार. ८ वाजेपर्यंतही नवरा उठलेला नसतो त्यामुळे त्याला काही सूचना देऊन निघते. नास्ता ठेवलाय टेबलवर, दूध फ्रीजमध्येच आहे, चहा करून घे, काम वाल्या बाईसाठी समोरच्या घरी किल्ली ठेवीत जा म्हणून रोजच सांगावे लागते, विसरणे किती प्रमाणात राहू शकते याचे उत्तम उदाहरण म्हणजे माझा नवरा.

ऑफिसच्या गोष्टी बरोबर लक्षात राहतात. स्वयंपाकाला बाईच असल्याने मला लवकर निघता येते अन्यथा ज्या दिवशी बाई नसेल त्या दिवशी काहीतरी भराभर करून द्यावे लागते. पण त्या दिवशी ऑफिसमध्ये फोन करून



उफिरा येण्याची परवानगी घ्यावी लागते. मला ते अजिबात आवडत नाही. माझा नवरा झोपेतच मला गुड मॉर्निंग करतो आणि मी त्याचे ते शब्द ऐकण्याआधीच घराबाहेर पडलेली असते. मी काम चांगले केले तर म ला प्रमोशन मिळणार आहे. माझे पॅकेजदेखील वाढणार आहे. मी ठरवलंय, सध्या आहे त्याच्या दुप्पट पॅकेज झाल्याशिवाय मूल होऊ द्यायचे नाही. विनाकारण अडकून पडायला होतं त्यामुळे. माझे करीअर माझी प्रायॉरीटी आहे. नवरा म्हणत राहतो मधून मधून, पण मी त्याला स्पष्ट बजावले आहे, 'नो वे! मला सध्या शक्य नाही.' त्याची मला काही मदतच होत नाही. सध्या तर खरं सांगायचे तर माझा ऑफिसमध्ये वेळ छान जातो. माझी टीम मस्त आहे. आम्ही दोघी मैत्रिणी आणि आम चे तीन मित्र. आम्ही बढीया काम करतो. आमच्यात फारच छान ट्युनिंग आहे. सकाळी ९ पासून संध्याकाळी ६ पर्यंत वेळ कसा जातो कळतच नाही. ऑफिस संपल्यावर आम्ही काहीतरी प्लॅन करतो. घरी येण्याची घाई नसतेच; कारण माझा नवरा कधीही रात्री ९ च्या आत येत नाही, ते देखील पार्टी नसेल तर अन्यथा रात्री बाराच. मग एकटीला जेवणे फार बोअर होते. घरी पोहोचायचे आणि मस्त टीव्ही बघून मग ताणून द्यायची. नवरा लवकर घरी आला तरी त्याला इंटरनॅशनल कॉल असतो; तो कामातच असतो. घर उठणेच होत नाही. पार्टीला जाण्याचा खरे तर कंटाळा येतो, परंतु काय करणार. कंपनीचा व्हीपी म्हणल्यावर हे करावेच लागते. कंपनी इतके मोठे पॅकेज उगाच थोडेच देते. आमच्या स्वयंपाकवाल्या मावशी फारच मस्त जेवण बनवितात. त्यांनाच माझ्या जेवणाच्या आवडी जास्त माहीत आहेत. अर्थात माझ्या बायकोनेच त्या सांगितल्या आहेत, पण त्यांना सांगून ती स्वतः मात्र त्या सगळ्या गोष्टी विसरून गेली आहे.

मी ऑफिसमध्ये मात्र आरामात दहा-साडेदहा पर्यंत जातो. कारण माझ्या परतण्याचा वेळ निश्चित नाही. त्यातून महिन्याचे १० ते १५ दिवस परदेशातच असतो मी. पण येथे असलो की घरी राहावे वाटायचे दोन वर्षाआधी; पण आता नाही वाटत. माझ्या ऑफिसातील माझ्या सेक्रेटरीला माझ्या आवडी-निवडी जास्त माहीत आहेत माझ्या बायकोपेक्षा. मला माझ्या परिवारासाठी पैसा कमवायचा आहे.

भविष्य सुरक्षित करायचे आहे. त्यामुळे मला काम करावे लागते. एवढ्या मोठ्या कंपनीचा उपाध्यक्ष म्हणजे गंमत नाही. काम करून मी पैसा चांगलाच मिळवलाय. एकदम पॉश घर बनविले आहे. नाही म्हणायला बायकोनेही पैसा दिला, पण तो कमीच होता. मलाही वाटते की, आपला परिवार आता वाढायला हवा. मात्र आमचं पॉश आहे एकदम. सर्व सुविधा आहेत. आम्ही दोघेही छान कमावतो ना म्हणून सगळं करता आलं. पण इतक्यात मला या घरी यावे वाटत नाही. कारण मला हे घर माझं आणि माझ्या नवऱ्याचं वेगवेगळं वाटायला लागलं आहे. खरं म्हणजे मला आता वाटायला लागले आहे की त्याचे एक वेगळे विश्व आहे आणि माझे एक वेगळे आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे आमचे विश्व कुठेही एकमेकांना स्पर्श करीत नाहीत. सुरुवातीला आमची खूप भांडणे व्हायची, पण त्यानिमित्ताने का होईना आम्ही बोलायचो. आम्ही केवळ लोकांसाठी नवरा-बायको आहोत. एकमेकांसाठी आम्ही पुन्हा एकदा अनोळखी झालो आहोत. 'लेकीन अब हमारे बीच बस सन्नाटे है और सिर्फ वो सन्नाटे झगडते रहते है और पुझता है, इतना सन्नाटा क्यों है भाई...!' तो : मला सूचना देऊन माझी बायको निघून गेली. मला तिच्या हातचा चहा आवडतो हे तिला माहीत होते; बहुदा आता ती विसरली असणार. रात्री पार्टी असली की सकाळी माझ्याकडून

(पान ६ वर)

# पाणिनी, माहेश्वरी सूत्रे आणि संगणक

विवेचन

श्रीरंग श्री. हिर्लेकर

वेदाध्ययन करण्यापूर्वी त्याची षडांगे म्हणजे सहा अंगे समजून घ्यायला हवीत. त्यातील व्याकरण हे सर्वांत महत्त्वाचे अंग. इतके की, त्याला वेदपुरुषाचे मुखच मानले आहे. (मुखं व्याकरणस्मृतम्). व्याकरणाला पर्याय नाही. सुभाषितकार तर म्हणतात, '**अव्याकरणमधीतं भिन्नद्रोण्या तरंगिणीतरणम्। भेषजमपथ्यसहितं त्रयमिदमकृतम् वरं न कृतम्॥**' म्हणजे व्याकरणावाचून शिक्षण घेणे, फुटक्या नावेने नदी ओलांडणे आणि पथ्य न पाळता औषधोपचार करणे या तिन्ही गोष्टी करण्यापेक्षा न करणेच बरे. अशा या व्याकरणशास्त्राची सूत्रमय घट्ट बांधणी पाणिनींनी केली. ही इतकी अभेद्य आहे की, इतक्या दीर्घ कालखंडात विविध संस्कृती आणि भाषांत सातत्याने बदल होत असताना पाणिनींच्या अष्टाध्यायीतील एकही सूत्र-नियम बदलण्याची आवश्यकता भासली तर नाहीच; पण अत्याधुनिक संगणकासाठी आवश्यक अशी आज्ञावली संस्कृतातून केल्यास ती अधिक सूक्ष्म, नेमकी आणि परिणामकारक होईल, असे भाषातज्ज्ञ सांगतात. पाणिनींचे व्याकरण हे आठ अध्यायात विभागले असल्याने अष्टाध्यायी म्हणून ओळखले जाते. याव्यतिरिक्त व्याकरणशास्त्राच्या अजूनही काही परंपरा आहेत. आपल्याकडे कोणत्याच परंपरेला विरोध न होता सर्वांतून जे जे उत्तम, उदात्त, उन्नत ते घ्यावे, हे चार्वाकाच्या विचारांना 'चार्वाकदर्शन' म्हणून स्वीकारले गेले, यावरून लक्षात येते. विविध परंपरांची निर्मिती, अध्ययन आणि व्यवहारसुलभता याकरिता भिन्न दृष्टिकोन आणि उद्देश यातून झाली आहे. पाणिनीय व्याकरणाला त्यांचा अजिबात विरोध नाही.

**१) पाणिनींची अष्टाध्यायी:** हे अत्यंत सूत्रबद्ध असून यात ४००० सूत्रे आहेत. याची रचना संपूर्णपणे वैज्ञानिक असून अचूकता, संक्षिप्तता ही याची वैशिष्ट्ये आहेत. नवशिक्यांसाठी मात्र हे थोडे जड जात असले, तरी सर्वांत प्रभावी आणि म्हणूनच की काय, अधिक प्रचलित असल्याने बहुतेक सर्व संस्कृत वाङ्मय यामुळेच सुलभ व सुगम होते.

**२) शर्ववर्माचे कातंत्र व्याकरण:** पाणिनीय पद्धतीचेच हे संक्षिप्त आणि सोपे रूप असून नवीन शिकणाऱ्यांसाठी सोपे व उपयुक्त आहे. मात्र, याची व्यापकता तुलनेने कमी आहे.

**३) चंद्रगोमिन्चे चंद्र व्याकरण :** पाणिनीप्रमाणेच पण स्वतंत्र असून यावर बौद्ध परंपरेचा प्रभाव दिसतो. पूर्व आशियात याचा अधिक उपयोग केलेला दिसतो.


**४) शाकटायन व्याकरण:** प्रत्येक शब्द हा एखाद्या धातूपासूनच निर्मित असतो हा याचा दृष्टिकोन असल्यामुळे यात व्युत्पत्तीवर अधिक भर दिलेला आढळतो. प्रत्यक्षात सर्वच शब्द धातुजन्य असतातच असे नाही.

**५) जैनेंद्र व्याकरण :** हे देवनन्दि अर्थात जैन साहित्यात प्रचलित आहे. शिकायला तुलनेने सोपे आहे. याचा उपयोग मात्र मर्यादित आहे.

**६) सारस्वत व्याकरण :** नारायणभट्ट-अनिरुद्ध यांचे असून हे तुलनेने लहान व सोपे आहे. नवीन विद्यार्थ्यांना हे अतिशय उपयुक्त असले, तरी शास्त्रीयदृष्ट्या यात सखोलता नाही.

**७) हैम व्याकरण :** आचार्य हेमचंद्राने याची निर्मिती केली असून यात संस्कृतसोबतच प्राकृत व्याकरणाविषयी पण दिग्दर्शन केले आहे. याचा दोष म्हणजे हे विस्तृत असून मांडणी जटिल आहे.

**८) भोज व्याकरण:** राजा भोज किंवा त्याच्या नवरत्न दरबारातील एखाद्या विद्वानाची ही निर्मिती असून हे सुद्धा विस्तृत आहे. यात व्याकरणाविषयी तत्त्वचर्चा अधिक प्रमाणात आढळते. याचाही वापर कमी प्रमाणात आढळतो. थोर गणिती भास्कराचार्य अभिमानाने सांगतात की, त्यांनी अष्टव्याकरणांचा अभ्यास केला आहे. या लेखात आपण फक्त पाणिनी आणि संगणकशास्त्र यासंबंधीच विचार करू.



माहेश्वरी सूत्रे भगवान शंकराच्या डमरूच्या नादातून उत्पन्न झालेल्या काही ध्वनींना व्यवस्थित बांधून पाणिनीने त्यापासून १४ सूत्रांची मालिका वापरून आपले अष्टाध्यायी व्याकरण सिद्ध केले. शंकर म्हणजे महेश म्हणून या सूत्रांना माहेश्वरी सूत्रे म्हणतात. प्रत्येक सूत्रात काही विशिष्ट ध्वनिसूचक अक्षरे दिली आहेत. ही क्रमाने मांडून पाणिनीने व्याकरणाचे नियम तयार केले आणि यांचा उपयोग करून प्रत्याहार ही पद्धत विकसित केली. ती सूत्रे म्हणजे- १) अइउण्, २) ऋलृक्, ३) एओङ् ४) एऔच्... इत्यादी १४ सूत्रे. संगणकशास्त्रात हेच होते. प्रत्याहार म्हणजे डेटा काम्प्रेशन अर्थात मोठा अर्थ सांकेतिक पद्धतीने मांडणे. कोडिंग म्हणजे अक्षरांच्या समूहाकरिता संकेताक्षर सांगणे आणि अल्गोरिदम म्हणजे नियमबद्ध करणे. या पद्धतीमुळे पाणिनीचे व्याकरण सूक्ष्म, संक्षिप्त आणि वैज्ञानिक झाले. उदा. अच् म्हणजे अ पासून औपर्यंतचे सर्व ९ स्वर. हल् म्हणजे सर्व ३३ व्यंजने.

**पाणिनीय व्याकरण आणि संगणकशास्त्र:** अष्टाध्यायी आणि संगणक शास्त्रातील अल्गोरिदम यातील साम्य बघून आपल्या वैचारिक पद्धतीविषयी आदर वाटतो. पाणिनीय घटक म्हणजे सूत्र-प्रत्याहार-अनुवृत्तिपरिभाषा- प्रक्रिया- धातू-शब्द तर संगणकीय भाषेप्रमाणे हेच सर्व अनुक्रमे कोड लाईन-व्हेरियबल्स एनकोडिंगइनहेरिटन्स- कम्प्लायर रूल्स-अल्गोरिदम्- इनपुट-आऊटपुट. याप्रमाणे अष्टाध्यायीला मशिन लँग्वेज म्हणता येईल. उदा. धातू-प्रत्यय यापासून शब्द तयार होतो तर संगणक त्यालाच इनपुट-प्रोसेस- आऊटपुट म्हणतो. या सर्वांचा एकत्र विचार केला तर पाणिनी हे फक्त व्याकरणकार नसून भाषातंत्राचे शिल्पकार आहेत. आज आपण संगणकाला भाषेचा प्रवास (प्रोसेस) शिकवतो. पाणिनीने मानवी भाषेलाच संगणकीय पद्धतीप्रमाणे नियमबद्धरीतीने सूत्रात बांधले. आपण एखादे उदाहरण घेऊन पाणिनीय आणि संगणकीय अशा दोनही पद्धतीने वाक्य तयार करून बघू. येथे मला लेखाच्या शब्दमर्यादेमुळे तांत्रिक शब्द अधिक स्पष्ट करता येणार नाहीत.

**अभ्यासकांनी ते समजून घ्यावेत. प्रश्न:** अष्टाध्यायीला जर भाषेचे इंजीन म्हटले तर राम जातो म्हणजे 'रामः गच्छति' हे वाक्य कसे लिहिता येईल? संगणक - इनपुटः १) कर्ता कोण तर राम, २) क्रियाः जाणे. ३) काळः वर्तमान. ४) आऊटपुटः रामः गच्छति.

अष्टाध्यायी- १) कर्ता कोण तर राम. धातू (रुट) गम् म्हणजे जाणे. काळ-वर्तमानकाळ.

२) प्रक्रिया : धातूची निवड केली गम म्हणजे जाणे.

३) वर्तमानकाळ म्हणून लट् प्रत्यय लावून गमचे गच्छति झाले. रामचे रामः झाले.

४) तृतीय पुरुषी, एकवचनी, पुल्लिंगी वर्तमानकाळी म्हणून संपूर्ण जुळवणी होईल रामः गच्छति. दोघांची तुलना करायची तर धातू म्हणजे इनपुट, प्रत्यय कोणता तर फंक्शननुसार, विभक्तीतून फॉरमॅट ठरवला, संधीतून पोस्ट प्रोसेस मांडली, सूत्राच्या ठिकाणी नियम वापरले आणि एकूण परिभाषा म्हणजे नियंत्रक म्हणून तर्क वापरला. थोडक्यात सांगावयाचे तर पाणिनीने भाषा शिकवली नाही तर भाषा तयार करणारे यंत्र (जनरेटर) आपल्या हाती दिले.

**पाणिनीच्या कार्याची वैशिष्ट्ये :** थोडक्यात सांगावयाची तर १) लघु पण अर्थगर्भ शैली, २) ध्वनी, शब्द, प्रत्यय, संधी, समास सांचे नियमबद्ध विश्लेषण, गणितीय पद्धतीने मांडलेले व्याकरण नियम, असे म्हणता येईल. त्यांची इको यणचि, हलन्त्यम् आणि अदःगुणः ही सूत्रे मूलभूत मानली जातात.

**वैयक्तिक माहिती :** इसवीसन पूर्व ५ व्या शतकात गांधार देशात म्हणजे आजच्या अफगाण-पाकिस्तान सीमेवरील शलातुर येथे पाणिनींचा निवास होता. आजही तेथे यांचे स्मारक आहे. एकदा विद्यार्थ्यांना शिकवत असताना अचानक वाघ पुढ्यात आला. मात्र, आपल्या विषयातील तल्लीनतेमुळे वाघाचे पसरट- व्यापक नाक बघून व्या म्हणजे व्यापक, घ्र घ्राणेंद्रियाची म्हणजे नाकाची संवेदनशक्ती यावरून 'व्याघ्र' या शब्दाची व्युत्पत्ती 'व्या जिघ्रति इति व्याघ्रः' अशी सुचली आणि ती सांगण्याच्या नादात त्यांनी प्राण गमावला.



# असुरक्षित मन आणि ‘ग्रूमिंग’चे मायाजाल



**बालकांवर होणारे अत्याचार हे कोणत्याही समाजाला मान खाली घालायला लावणारेच... असे असतानाही आज या अत्याचारांची संख्या लक्षणीय प्रमाणात वाढली आहे. यावर उपाययोजना करताना, अत्याचार करणाऱ्यांच्या या कार्यपद्धतीचाही अभ्यास केला गेला. त्यातूनच ‘ग्रूमिंग’चे भयाण वास्तव समोर आले. अत्याचाऱ्यांच्या वर्तनाचा आढावा घेणारा हा लेख...**

समाजभान प्रो. डॉ. शुभांगी पारकर

बालकांवरील लैंगिक अत्याचार ही केवळ एक गुन्हेगारी घटना नसून, तो आपल्या मानवी व्यवस्थेचाच विदारक पराभव आहे. या विषयावरचे विविध अहवाल दर्शवतात की, बालकांवरील लैंगिक अत्याचार, त्यांच्या असुरक्षिततेचा गैरफायदा घेऊनच केले जातात. कोणत्याही विशिष्ट पार्श्वभूमीचे बालक या धोयापासून पूर्णपणे सुरक्षित नसले, तरीही गुन्हेगारांचे ‘सायकोलॉजिकल प्रोफाईलिंग’ आणि सामाजिक रचना काही बालकांना अधिक असुरक्षित करते. मुलांमधील भावनिक आणि सामाजिक असुरक्षिततेचाच गैरफायदा घेऊन, लैंगिक अत्याचार करणारे विकृत प्रवृत्तीचे लोक अत्यंत पद्धतशीरपणे हे काम करतात. गुन्हेगारी मानशास्त्रानुसार हे प्रेडेटर्स शारीरिक ताकदीपेक्षा, मुलांचा मानसिक कमकुवतपणा आणि असुरक्षिततेचाच ‘शस्त्र’ म्हणून वापर करतात. मुलांमधील असुरक्षितता लैंगिक शोषणासाठी कशी कारणीभूत ठरते, यामागील मुख्य मानसशास्त्रीय आणि सामाजिक कारणे खालीलप्रमाणे:

**१. गुन्हेगारांची मानसिकता आणि ‘ग्रूमिंग’**

संशोधनानुसार लैंगिक अत्याचाराचे बहुतांश गुन्हेगार हे अनोळखी नसून पीडितेच्या परिचयाचे, शेजारी किंवा कुटुंबाचे विश्वासूच असतात. हे ‘प्रेडेटर्स’ अत्यंत पद्धतशीरपणे जाळे निर्माण करतात. ज्या मुलांकडे कुटुंबाचे दुर्लक्ष होते, पालकांमध्ये सततचे वाद असतात किंवा ज्या मुलांना एकटेपणामुळे भावनिक असुरक्षितता असते, अशी मुले प्रेमासाठी आणि कौतुकासाठी भुकेलेली असतात. अशा मुलांच्या मानसिकतेचा गैरफायदा घेण्यासाठी, गुन्हेगार ‘ग्रूमिंग’ या अत्यंत छुप्या आणि पद्धतशीर मार्गाचा वापर करतात.

**ही संपूर्ण प्रक्रिया पुढील तीन टप्प्यांत चालते :**

**१. अति-काळजीचे नाटक :** गुन्हेगार सुरुवातीला कुटुंबात आणि बालकाच्या अवतीभोवती वावरताना, अशा असुरक्षित मुलांना हेरतो आणि पटवतो. त्यानंतर तो मुलांवर विशेष लक्ष देणे, त्यांचे अवाजवी कौतुक करणे, त्यांना चॉकलेट्स, खेळणी किंवा भेटवस्तू देण्यास सुरूवात करतो. यामुळे मुलांमध्ये त्या व्यक्तीबद्दल जवळीक आणि विश्वास निर्माण होते.

**२. कौटुंबिक घुसखोरी:** गुन्हेगार केवळ मुलाशीच नाही, तर अत्यंत चलाखीने त्याच्या संपूर्ण कुटुंबाशी हे विश्वासाचे नाते निर्माण करतो. तो घरात इतका बेमालूमपणे मिसळतो की, त्या कुटुंबाचाच एक महत्त्वाचा भाग वाटतो. यामुळेच पालकांना त्या व्यक्तीवर संशय येत नाही, आणि ते नकळत आपल्या मुलाला त्याच्यासोबत एकटे सोडण्याची चूक करतात.

**३. भावनिक अवलंबित्व:** हळूहळू मुलाना वाटू लागते की, ही व्यक्ती संपूर्ण जगात आपली सर्वांत मोठी हितचिंतक आणि उत्तम मित्र आहे. मूल भावनिकदृष्ट्या त्या व्यक्तीवर पूर्णपणे अवलंबून राहू लागते. एकदा का हे भावनिक जाळे घट्ट झाले की, गुन्हेगार त्या विश्वासाचा गैरफायदा घेऊन संवादाची पातळी बदलतो आणि हळूहळू अयोग्य स्पर्शाकडे वळतो. ही संपूर्ण प्रक्रिया इतकी संथ आणि छुपी असते की, स्वतः बालक किंवा पालकांना सुरुवातीला त्यात काही अयोग्य किंवा गैर घडते आहे, याचा पुसटसाही अंदाज येत नाही. जेव्हा संशय येतो, तोपर्यंत गुन्हेगाराने मुलाच्या मनावर पूर्ण ताबा मिळवलेला असतो.

**२. नाकारले जाण्याची भीती:** असुरक्षित मुलांना नेहमीच अशी भीती वाटते की, जर आपणे समोरच्या व्यक्तीचे ऐकले नाही, तर तो आपल्यावर रागवेल किंवा आपले कौतुक करणे, प्रेम करणे बंद करेल. गुन्हेगार याच भीतीचा पुरेपूर फायदा घेतात. ते मुलांना सांगतात, जर तू माझं ऐकलं नाहीस, तर मी तुझ्याशी कधीच बोलणार नाही किंवा तुझे लाड करणे सोडून देईन. आधीच एकटेपणा आणि असुरक्षिततेचा सामना करणारे मूल, हे प्रेम गमावण्याच्या भीतीने शांत राहते आणि अत्याचाराला विरोध करू शकत नाही.

**३. खास असण्याची मानसिकता:** गुन्हेगार अनेकदा असुरक्षित मुलांना असे भासवतात की, ते इतर मुलांपेक्षा खूप वेगळे, हुशार आणि प्रौढ आहेत. ते मुलांसोबत काही गुपितेही शेअर करतात आणि सांगतात, हे फक्त आपल्या दोघांमधलं गुपित आहे, कारण तू खूप समजूतदार आहेस. हे घरात कोणाला सांगू नको, नाहीतर ते तुला ओरडतील. असुरक्षित मुलाला या गुपितामुळे स्वतःबद्दल, आपण कोणीतरी महत्त्वाचे असल्याची भावना निर्माण होते. आपण कोणीतरी विशेष आहोत, या नादात ते अत्याचाराची माहिती पालकांपासून लपवून ठेवतात.

**४. कमी आत्मसन्मान:** असुरक्षित मुलांचा आत्मविश्वास खूपच कमी असतो. बरेचदा शोषणाची सुरुवात झाल्यावर, गुन्हेगार त्यांच्या मनात अपराधीपणाची भावना निर्माण करतो. गुन्हेगार मुलाला पटवून देतो की, यात तुझीही चूक आहे किंवा तूच माझ्या जवळ आला होतास. म्हणून हे घडलं. आत्मसन्मान कमी असल्यामुळे, मूल स्वतःलाच दोषी मानते. त्यांना वाटते की, जर त्यांनी हे कोणाला सांगितले, तर समाज किंवा पालक त्यांनाच बोल लावतील आणि त्यांनाच शिक्षा होईल.

**५. अधिकाराची/हुकूमशाहीची भीती:** लैंगिक अत्याचार करणारे बहुतांश लोक हे कुटुंबातील, शेजारील किंवा मुलाच्या ओळखीचेच असतात. असुरक्षित मुलांच्या मनात मोठ्या व्यक्तींबद्दल आणि अधिकारावर असलेल्या लोकांविषयी, उपजतच भीतीयुक्त आदरभाव असतो. गुन्हा उघडकीस येऊ नये म्हणून, ३५ टक्क्यांपेक्षा जास्त गुन्हेगार मुलांना आणि त्यांच्या कुटुंबाला हिंसेची किंवा सामाजिक बदनामीची धमकी देऊन गप्प ठेवतात. गुन्हेगार धमकी देतो की, मी मोठा आहे, माझं कोणीही ऐकेल, तुझं ऐकणार नाही. किंवा जर तू घरी सांगितलंस, तर मी तुझ्या आई-वडिलांना मारून टाकेन किंवा त्यांना नोकरीवरून काढून टाकेन. मुलांमधील आर्थिक किंवा कौटुंबिक असुरक्षितता उदा. गरीब पार्श्वभूमी किंवा पालकांचे आजारपणामुळे, मूल या धमयांना खरे मानते आणि भीतीखालीच जीवन जगते.

**असुरक्षिततेचे सर्वसामान्य घटक-** वय, लिंग आणि सामाजिक स्तरे

**वय आणि लिंग :** मुलींवर अत्याचार होण्याची शयता, मुलांपेक्षा पाचपटींनी जास्त असते. वयाच्या सात ते १३ वर्षांदरम्यान, मुले सर्वांत जास्त असुरक्षित असतात. तर, शोषणाचे सरासरी वय नऊ वर्षे असल्याचे समोर आले आहे.

**आर्थिक आणि सामाजिक स्थिती:** कमी उत्पन्न असलेल्या किंवा दारिद्य रेषेखालील कुटुंबांतील मुले, तीन पटींनी अधिक असुरक्षित असतात. पालकांकडे रोजगार नसणे, अमली पदार्थ, दारूचे व्यसन किंवा घरगुती हिंसाचारांमुळे मुलांवरचे लक्ष कमी झाल्याने गुन्हेगारांचे फावते.

**ग्रामीण भाग:** ग्रामीण भागात राहणारी मुले, शहरी भागातील मुलांपेक्षा जवळपास दोन पटींनी जास्त या विकृतीला बळी पडतात. कारण, तिथे सामाजिक पाळत आणि कायदेशीर मदत मिळण्यात अडचणी असतात. गुन्हेगार सहसा अशीच मुले निवडतात, जी शांत, एकलकोंडी, संकोची किंवा कौटुंबिक तणावाखाली जगत आहेत.

पान १ वरून

# हिंदूंचे प्रेरणास्थान शिवराज्याभिषेक दिन!

अशा भयावह परिस्थितीत शिवाजीराजांनी स्वातंत्र्याचा उद्घोष केला. सामान्य जनतेध्ये प्रचंड आत्मविश्वास जागवला. कलियुगामध्ये क्षत्रिय राहणार नाही, असा सर्वदूर झालेला गैरसमज आपल्या कर्तृत्वाने धुऊन काढला. ‘दिल्लीश्वरो वा जगदीश्वरो वा’चे नारे पुसून टाकण्यासाठी ‘हे राज्य व्हावे ही तो श्रींची इच्छा’ असा विचार सामान्य जनतेध्ये दृढमूल केला. एक वेळ उपाशी राहणाऱ्या जनतेला स्वतःच्या मेहनतीने भाकरतुकडा खाण्याची सवय लावली.

सारापद्धती, न्यायप्रक्रिया, स्त्रियांची सुरक्षा, शेतीला संरक्षण, व्यापाऱ्यांचा उद्धार, देवळांनो वर्षासन, दिवाबत्तीची सोय, अशा सर्व बाबतीते शिवाजीराजे अत्यंत सावध होते. यामुळे सामान्य जनतेची भराभरा प्रगती व्हायला लागली. सुलतानीमध्ये दुरापास्त झालेले सौख्य सामान्य जनता या छोट्याशा का होईना, पण स्वराज्यामधे अनुभवत होती. शिवाजीराजांनी आपल्या उदाहरणातून लोकांना लढण्याची प्रेरणा दिली सुरुवातीच्या काळामध्ये फत्तेखान, अफजलखान, शाहिस्तेखान, सूरतवर आक्रमण इत्यादी लढायांध्ये राजांनी स्वतः मोहिमांचे नेतृत्व केले. यातून प्रेरणा घेऊन सामान्य मावळा उठून उभा राहिला व पुढच्या काळामध्ये बुलंद कर्तृत्वाचे तानाजी, बाजीप्रभू, मुरारबाजी, बाळाजी आवजी, मोरोपंत पिंगळे पेशवा, अनाजीपंत सुरनीस, प्रतापराव गुजर, हंबीरराव मोहिते, रामाजी पांगेरो अशी राष्ट्रनिष्ठांची मांदियाळी उभी राहिली. सामान्य दिसणाऱ्या व सामान्य घरांमध्ये राहणाऱ्या मराठ्यांनी तुफान उठवून दिले. मराठी फौजा पार तमिळनाडूपर्यंत जाऊन थडकल्या. संघटनकौशल्याचा हा आविष्कार होता. यो लढायांद्वारे राजांनी भौगोलिक शतकानुशतके आर्थिक लूट काराणाऱ्या सुलतानांच्याच प्रांतांवर हल्ले करुन मराठे त्यांची आर्थिक लूट करू लागले. जुन्नर, नगर, भिंगार, बसरूर, सूरत, कारंजा अशी अनेक नगरे व पेठा राजांनी फस्त केल्या. मोगलांची सर्वात मोठी बाजारपेठ सूरत तर केवळ दोन लुटींमध्येच डबघाईला आली. नगरांसोबतच महाराजांनी बहादूरखाँ, अफझलखाँ, कार्तलबखाँ अशा मोठमोठ्या सरदारांचे गोट साफ लुटून काढले. जी नीती अर्थकारणात तीच धर्मकारणात. बजाजी नाईक निंबाळकर व नेतोजी पालकर यांना सुलतानांनी बळजबरीने मुसलमान केले. शिवाजीराजे जर सर्वधर्मसमभावी असते तर राहू दिले असते या दोघांना इस्लाममध्ये. शेवटी सर्व धर्म समानच, नाही का? पण, मग हे राजांना माहिती नव्हते का? आपल्याकडे तशी पद्धत नसताना राजांनी या दोघांची घरवापसी करून का त्यांना हिंदू करवून घेतले? राजे पुरोगामी नव्हते का? असो. बरं, पण मग गोव्याच्या जेस्युईट पाद्रींनी एक कायदा पारित केला होता की, हिंदू धर्म सोडा आणि आपली जमीन वाचवा. अन्यथा गोवा सोडून जा. राजांना हे कळले तेव्हा त्यांनी या पाद्रींना गिरफ्तार केले व आमचा धर्म स्वीकारा, असे आवाहन केले. पाद्रींनी नकार दिल्यावर त्यांचे मुंडके मारून गोव्याला पाठविले. लगेच तिथल्या पोर्तुगीज विजरई (व्हायसरॉय)ने तो अध्यादेश मागे घेतला. आपली उद्ध्वस्त होऊन अतिक्रमित झालेली कल्याण, भिवंडी, पेरुमाळ (तमिळनाडू) अशी अनेक मंदिरे राजांनी पुन्हा बांधून काढली. मग महाराजांच्या या नीतीला काय म्हणावे? आपल्याच देशात आपल्या देवस्थानांची दुर्दशा होऊ नये व देवाला देवळाबाहेर ताटकळत बसावे लागू नये, हा त्यांचा दृष्टिकोन होता. ही महाराजांची धर्मनिष्ठा होती, जी सुलतानांच्या धार्मिक आक्रमणाला सडेतोड उत्तर होती. गेल्या शेकडो वर्षांत सुलतानांनी असे ठसठशीत प्रत्युत्तर पाहिलेच नव्हते. याचे अनेक पुरावे शिवभारत, पोर्तुगीज कागदपत्रे, मोगलांचे पत्रव्यवहार यात सापडतात. राजनैतिकदृष्ट्या महाराजांनी केलेले कार्य शब्दातीत आहे. महाराजांचा अभ्यास, आकलन, निरीक्षण, गुप्तचर यंत्रणा या सर्वांुळे त्यांची मुत्सद्देगिरी विलक्षण परिणामकारक होती. इस्लामी सत्तांचे आपापसातील संबंध, शिया-सुन्नी मतभेद, दक्षिणी-तुर्क मुसलमानांचे झगडे, तुर्क-पठाण वाद इत्यादीचा सूक्ष्म अभ्यास. शिवाय प्रत्येक सुलतानीमधील अंतर्गत कलह, महत्त्वाकांक्षा, कच्चे दुवे यांची माहिती, यामुळे मोगलांचे आक्रमण आले की, आदिलशाहची मदत घेणे, आदिलशाह उलटला की कुतुबशाहला मधे आणणे, दक्षिणी शाह्या मिळून उत्तरेविरुद्ध मोट बांधणे, सिद्दीला उधळून लावण्यासाठी मोगलांचा पाठपुरावा करणे, असे अद्भुत राजकारण महाराज नेहमी खेळले व बव्हंशी यशस्वी झालेत. परराष्ट्रीय शत्रूला गोंजारायचे नसते, त्याच्याशी त्याच्याच भाषेत उत्तर द्यायची तयारी ठेवावी लागते. शेजारी आमच्यावर आक्रमण करेल व आम्ही निमूट निषेध करू, ही सुदैवाने महाराजांची नीती नव्हती. त्यांनी आपल्या मुत्सद्देगिरीने भल्याभल्यांना पाणी पाजले. विशेषतः पुरंदरचा तह हा वरकरणी पाहता महाराजांचा पराभव वाटत असला, तरी सर्व दृष्टीने तो त्यांच्या सर्वोत्तम कूटनीतीचा निःसंशय विजयच होता. मातृभाषेवरील आक्रमण मोडून काढताना रघुनाथपंतांकडून ‘राजव्यवहारकोश’निर्मिती हा तर मैलाचा दगड ठरला. किल्ला, तलवार, चिलखत अशा फार्सी, उर्दू शब्दांची जागा दुर्ग, खड्ग, कवच अशा संस्कृतप्रचुर शब्दांनी घेतली. आपला तोफखाना, आपले आरमार, आपली टांकसाळ उघडून स्वदेशी उत्पादन व्यवहारानुकूल केली. पोर्तुगीज व्यापारी मिठाचा व्यापार बळकवण्याचा प्रयत्न करत असताना त्यांच्यावर जबर कर बसवून स्वदेशी व्यवसायाचे संरक्षण केले. सुरुवातीला जरी आरमाराच्या बाबतीत पोर्तुगिजांवर अवलंबून राहावे लागले, तरी लवकरच मराठ्यांनी स्वत:ची जहाजे स्वत: बांधली. आत्मनिर्भर स्वराज्याचे हे फार मोठे उदाहरण होते. स्वतः राजा निगर्वी, नि:स्पृह, प्रसिद्धिपराङ्मुख, विनम्र, मेहनती, प्रजावत्सल होता. मदिरा, स्त्री, भ्रष्टाचार, पैसा याप्रती त्याला मुळातून द्वेष होता. त्याला स्वत:साठी काहीही नको होते. जे आहे ते सर्व समाजासाठी, अशी संन्यस्त वृत्ती होती. त्यामुळे जनतेला ते सदैव हवेहवेसे व विरोधकांना त्यांची धास्ती वाटे. अशा लोकोत्तर राजाने शतकानुशतकांची इस्लामी सुलतानांची मक्तेगिरी अवघ्या चव्वेचाळीस वर्षांत उधळून लावली. आकाराने लहान का असेना, पण एक सार्वभौ राज्य निर्माण केले. सरदारपुत्राचे बंड, धाडसी दरोडेखोर, नशिबाने यशस्वी झालेली टोळी, अशा विरोधी सत्तांनी केलेल्या शेरेबाजीकडे डोळेझाक करून एक समर्थ, सुसंस्कृत, भारतीय परंपरेला साजेसे, आर्थिक दृष्टीने अत्यंत बळकट, आत्मनिर्भर, विजिगीषू स्वराज्य शिवरायांनी उभे केले. दास्याचे स्तंभ फोडून स्वातंत्र्याचा पहिला पहिला हुंकार करणारे शिवराय कलियुगातले नरसिंह ठरले! स्त्रीच्या, देवतांच्या पुन:प्रतिस्थापनेसाठी यवनरूपी राक्षसांचा संहार करणारे मर्यादापुरुषोत्तम रामचंद्र ठरले. आपल्या करांगुलीवर स्वराज्यरूपी गोवर्धन उचलून सगळ्या गोकुळाला सुरक्षा व स्थैर्य देणारे बाळकृष्ण ठरले. शत्रूला कसे दगे द्यावे, रणांगणात चर्चा न करता कर्म करावे, शत्रूचा विश्वासघात कसा करावा, वेळप्रसंगी धर्मरक्षणासाठी आप्तस्वकीयांविरुद्ध तलवार कशी उचलावी, हे पुन्हा एकदा सांगणारे योगेश्वर श्रीकृष्ण ठरले. आणि सुलतानांच्या अत्याचारी गडद काळोखात हिंदूंना विजिगीषा, पराक्रम, नवचैतन्य, नवनवोन्मेषशालिनी स्फूर्ती देणारा शिवराज्याभिषेक दिन येणाऱ्या असंख्य पिढ्यांसाठी हिंदुसाम्राज्यदिन ठरला!

मुक्तचित्र डॉ. संतोष पाठारे

# शो मस्ट गो ऑन

Cinema can fill in the empty spaces of your life ando your loneliness - Pedro Almodovaro चित्रपट कलेचं आपल्या जीवनातलं महत्त्व काय आहे ते स्पॅनिशे दिग्दर्शक पेद्रो अल्मोदोवरच्या या वाक्यातून स्पष्ट होतं. चित्रपट आपलें मनोरंजन करतोच; पण आपल्या भोवतालाचं भान देण्याचं मोठं काम चित्रपटे करतो. गेले वर्षभर ‘मुक्तचित्र’च्या माध्यमातून हे भान तुमच्यापर्यंत पोहोचविण्याची संधी मला मिळाली. चित्रपट माध्यमाच्या क्षमता काय आहेत, याचा धांडोळा घेताना मराठी चित्रपटांच्या आजच्या स्थितीपासून प्रादेशिक, हिंदी आणि जागतिक स्तरावर सुरू असलेल्या चित्रपट निर्मितीचा वेध या सदरातून घेत आलो.

स्थानिक पातळीवर होणारे चित्रपट महोत्सव, आशियाई आणि इफ्फी तसेच कान आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या आयोजनामागील भूमिका तुमच्यापर्यंत पोहोचविता आली. लघुपट, माहितीपट, सध्या लोकप्रिय होत असलेल्या वेबमालिका यांच्या दर्जाची चर्चा या सदरातून करता आली. सत्यजित राय यांच्यासारख्या दिग्गजे दिग्दर्शकाच्या कार्यकर्तृत्वाचा आलेख मांडतो आला आणि नजीकच्या काळात येऊ घातलेल्या एआय तंत्रज्ञानामुळे चित्रपट क्षेत्राते होणाऱ्या बदलांचा अंदाजही लावता आलो. प्रसार माध्यमामुळे चित्रपट माध्यमाची व्याप्ती आणि स्वरूप यात आमूलाग्र बदल झाले आहेत.

१९७० च्या दशकापर्यंत चित्रपट पाहण्यासाठी चित्रपटगृहे हे एकमेव साधन होतं. त्यानंतर दूरदर्शनमुळे घरबसल्यो चित्रपट पाहता येऊ लागले. केबल टीव्ही, व्हिडिओ टेप्स, सीडी, डीव्हीडी, ब्लू रे यांनी चित्रपटे प्रदर्शनाच्या सीमारेषा बदलूने टाकल्या. चित्रपट पाहण्याची साधने बदलली. मोबाईल, लॅपटॉप, टॅब यांचा वापर सुरू झाला. हे सगळे बदल होत असताना एकच गोष्ट कायम राहिली आणि ती म्हणजे चित्रपट!

दिग्दर्शक, कलावंत यांना जी गोष्ट सांगायची आहे त्याचे एकमेव माध्यमे म्हणजे चित्रपट. २१ व्या शतकात आपल्या देशाची अर्थव्यवस्था खुली झाली. इंटरनेटमुळे जगातील सगळे व्यवहार गतिमान झाले. इतर सगळ्या क्षेत्रांपेक्षा मनोरंजनाच्या क्षेत्राने या तंत्रांचा पुरेपूर वापर करून घेतला. चित्रपटे निर्मितीच्या तंत्रामध्ये फार मोठे बदल घडून आले. चित्रीकरणासाठी वापराते येणाऱ्या चित्रफिती बाद झाल्या. डिजिटल तंत्राने कॅमेऱ्याचे आकार संकुचिते केले; पण त्यातून टिपली जाणारी दृश्य अधिक शार्प झाली. व्हीएफएक्समुळे चित्रीकरण स्थळ दाखविण्यासाठी खुलं झालेलं मोकळं क्षेत्र आणि ध्वनिमुद्रणात डबिंग ते सिंक साऊंड हा नावीन्यपूर्ण टप्पा यामुळे चित्रपटे निर्माण करण्याचे तंत्र सुलभ झाले.




कलात्मक आणि व्यावसायिक चित्रपटातील अंतर कमी व्हायला लागलं. जागतिक चित्रपटांचा प्रभाव असलेले आणि चित्रपट निर्मितीचं प्रशिक्षण घेतलेले दिग्दर्शक वेगवेगळ्या संकल्पनांवरे चित्रपट बनवू लागले. प्रोजेक्शनची यंत्रणा बदलून गेली. मल्टिप्लेक्स आल्यामुळे छोट्या बजेटच्या चित्रपटांना प्रदर्शनाचा मार्ग मोकळा झाला. जगभरातले चित्रपट जगत्या उपलब्ध झाल्याने प्रेक्षकांची अभिरुची बदलू लागली. केवळ आपल्या परिघातला चित्रपट पाहण्यापलीकडे जाऊन आपण प्रादेशिक आणि जागतिक चित्रपट पाहू लागला. गेल्या काही वर्षांमध्ये फेसबुक, इन्स्टाग्राममुळे वेगवेगळ्या प्रदेशात निर्माण होणाऱ्या चित्रपटांची माहिती एका क्लिकवर मिळू लागली. या चित्रपटात चित्रित केलेला आशय आपल्यापर्यंत पोहोचू लागला. त्यातीले पात्रांची जीवनशैली, मानसिकता, व्यथा वेदना, सुख- दुःख समजू लागली. व्यक्तिरेखांच्या वैयक्तिक जीवनातील गुंतागुंतीपासून सामाजिक, राजकीये स्थित्यंतरांचे व्यक्ती व समूहावर होणारे परिणाम याचं दर्शन चित्रपटातून केलं गेलं. पण त्या सगळ्याकडे सहानुभूतीने पाहण्याची जी नजर आवश्यके असते, जी संवेदनशीलता गरजेची असते ती आपल्याकडे राहिली आहे का? की, आभासी जगातील इतर माध्यमांच्या माऱ्यामुळे आपण ती संवेदनशीलतो गमावून बसलो आहोत? हा कळीचा प्रश्न निर्माण झाला. चित्रपट कला टिकवून ठेवण्यासाठी संवेदनशील प्रेक्षक तयार असणं गरजेचें आहे. सत्यजित राय यांनी कोलकातामध्ये स्थापन केलेली कलकत्ता फिल्मे सोसायटी हे या दृष्टीने टाकलेलं पहिलं पाऊल होतं. त्यानंतर त्यांनी १९५९ साली भारतातील वेगवेगळ्या शहरात सुरू झालेल्या फिल्म सोसायटींच्या कामामध्ये सुसूत्रता आणण्यासाठी फेडरेशन ऑफ फिल्म सोसायटीज् ऑफ इंडिया या देशव्यापी संघटनेची स्थापना केली. गेली ७५ वर्षे फिल्म सोसायटीज्, फिल्म फेस्टिव्हल्स् आणि राष्ट्रीय चित्रपट संग्रहालये यांच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय दर्जाच्या चित्रपटाचं प्रदर्शन तसंच चित्रपट रसास्वाद शिबिर अशा उपक्रमांमधून सुजाण, संवेदनशील प्रेक्षक आणि प्रयोगशील चित्रपट कमी निर्माण व्हावे यासाठी प्रयत्न करण्यात आलेत. दर्जेदार चित्रपटांच्या निर्मितीसाठी आणि त्यांच्या प्रोत्साहनासाठी राष्ट्रीय राज्य पुरस्कार देणे तसेच चित्रपट निर्मितीचे प्रशिक्षण देणाऱ्या फिल्म्स ॲण्ड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूटसारख्या संस्था, एनएफडीसी ही चित्रपट निर्मितीस सहाय्य करणारी संस्था सरकारकडूने स्थापन करण्यात आल्या.

वेगवेगळ्या पातळ्यांवर असे प्रयत्ने होऊनदेखील चित्रपट म्हणून आपली एक शैली वे दर्जेदार कला म्हणून भारतात विकसित झालेली नाही, हे कटू सत्य आहे. याचं कारण आपल्या देशाते चित्रपटाकडे गंभीरपणे पाहण्याची दृष्टी देण्यासाठी शिक्षण व सामाजिक क्षेत्रातील मंडळींकडून प्रयत्नात झालेली कमतरता, हेच द्यावं लागेल. शालेय पातळीवर आपल्याकडे कलाशिक्षणाचा अभाव आहे. चित्रपट हे कलामाध्यम आहे आणि त्यातून व्यक्तिविकास घडू शकतो, याची जाणीव शैक्षणिक धोरण ठरवणाऱ्या मंडळींना झालेली नाही.

(पान ६ वर)

कीर्तिरूपांच्या आठवकथा
डॉ. रमा गोळवलकर



# मांधाता

राजा मांधाता : उजवा हात आकाशाकडे आणि डावा हात हृदयाशी धरून आवाहन करताच सुवर्ण मुद्रांचा वर्षाव व्हायचा. अमरावती आंध्रप्रदेशचे प्राचीन स्तूप

भारताच्या राजकीय इतिहासात इक्ष्वाकु या सूर्यवंशी राजवंशात पृथ्वीवरचा पहिला चक्रवर्ती राजा होऊन गेला; त्याचं नाव मांधाता. याच्या जन्माची कथा काहीशी विचित्र आणि खूपशी अद्‌भुत अशी आहे. कृतयुगात अयोध्येचे राजे युवनोश निपुत्रिक होते. ते एकदा शिकारीसाठी वनात गेले असताना एका ऋषींच्या आश्रमात विसाव्यासाठी थांबले. तहान असह्य झाली म्हणून तिथे ठेवलेल्या कमंडलूतलं पाणी प्याले. ते पाणी त्या ऋषींनी केलेल्या यज्ञात म्हटलेल्या मंत्रांनी अभिमंत्रित झालेलं होतं. त्याचा परिणाम म्हणजे राजा युवनोश गरोदर राहिले. त्यांना ना गर्भाशय होतं ना योनिमार्ग! त्यामुळे पोटाच्या पोकळीत वाढणारा हा गर्भ जन्माला कसा येणार, हा प्रश्न सर्वांनाच भेडसावत होता. राजा युवनोशाच्या मदतीला अश्विनीकुमार धावून आले. त्यांनी त्यांच्या पोटाला चिरा देऊन त्या पूर्ण विकसित अर्भकाला बाहेर काढलं. ही बाळंत होण्यासाठी केलेली जगातली पहिली शस्त्रक्रिया. त्या पुढचा प्रश्न म्हणजे त्या नवजाताला दूध कोण पाजणार? त्यावर इंद्रदेवांनी त्याला आपलं बोट चोखायला दिलं. त्यातून काही थेंब अमृताचे त्याच्या पोटात गेलेत. ही क्रिया करताना इंद्रदेवानं म्हटलं 'मम व्यक्तित्वं धारयिष्यति' (माझं व्यक्तिमत्त्व धारण करणारा; माम्+धाता=मांधाता पण पुढे ध आल्यामुळे 'म्' चा 'न्' मांधाता)'. साक्षात इंद्रदेवांनी असा आशीर्वाद दिल्यानं त्याचं नाव मांधाता ठेवण्यात आलं. त्याचं व्यक्तिमत्त्व तेजस्वी, पराक्रमी आणि मेधावी होतं. त्यानं सगळ्या पृथ्वीवर आपली अधिसत्ता प्रस्थापित केली आणि जगातलं पहिलं साम्राज्य म्हणून इक्ष्वाकु वंशाच्या यशाची ध्वजा उभारली. भूमीवर रावणासारख्या बलाढ्य राक्षसराजाला पराभूत केलंच. तसाच स्वर्गातही आपला पराक्रम सिद्ध केला. इंद्रदेवानं त्याच्या कर्तृत्वाचा सन्मान करण्यासाठी त्याला एक वरही दिला होता. त्यानं उजवा हात आकाशाकडे पसरवून डावा हात छातीवर ठेवत आवाहन केलं की स्वर्गातून पृथ्वीवर सुवर्ण मुद्रांचा वर्षाव केला जाईल. त्यामुळे त्याच्या राज्यात अपरंपार सौख्य आणि संपदा नांदत होती. हा राजा एक सूक्तद्रष्टा म्हणूनही मान्यताप्राप्त होता. ऋग्वेदाच्या १० व्या मंडळातील १३४ वं सूक्त हे राजा मांधातानं इंद्रदेवांसाठी रचलेलं आहे. राजा मांधातानं नर्मदा नदीच्या किनारी एका टेकडीवर शिवशंकराची उपासना केली. त्याच्या तपश्चर्येनं प्रसन्न झालेल्या शंकरांनी त्याला साक्षात दर्शन दिलं आणि त्याच्या विनंतीस मान देत तिथेच वास केला.

मांधाता राजानं आपली दुसरी राजधानी तिथेच वसवली. आज ते क्षेत्र ॐकारेश्वर ज्योतिर्लिंग या नावानं प्रसिद्ध आहे. यादव नरेश शशबिंदूची कन्या बिंदु ती ही या सम्राटाची साम्राज्ञी होती. त्यांना मुचकुंद, अंबरीश आणि पुरुकुत्स नावाचे तीन पुत्र आणि ५० कन्या होत्या. या राजदंपतीनं १०० अश्वमेध आणि १०० राजसूय यज्ञ केल्याचं म्हटलेलं आहे. त्यामुळे ती दोघे यज्ञव्रती होते. या एकूण २०० यज्ञात त्यांनी भरपूर प्रमाणात दानधर्म केला. त्यात १०० योजनं अंतरात मावतील इतक्या बावन्नकशी सोन्याच्या रोहित माशाच्या भरीव मूर्तींसह १० हजार पद्म (१०० कोटी कोटी किंवा १ अब्ज कोटी) उत्तम प्रजातीच्या गायी दानात दिल्या. मांधाता राजाच्या तीन पुत्रांपैकी मुचकुंद, देव आणि दानवांच्या युद्धात देवांकडून लढले. त्यांच्या पराक्रमावर प्रसन्न होत इंद्रानं त्यांना वर मागण्यास सांगितलं. त्यावर ते म्हणाले, 'या युद्धात मी खूप थकून गेलो आहे. मला झोपेची नितांत आवश्यकता आहे. त्यामुळे मला झोपेचं वरदान हवं. जो कोणी मला झोपेतून जागं करेल, तो माझी दृष्टी पडताच भस्मसात होईल; आणि झोपेतून जागं झाल्याक्षणी मला श्री विष्णूंचं दर्शन व्हायला हवं.' देवराज इंद्र म्हणाले, 'तथास्तु!' त्याप्रमाणे कृतयुगात झोपी गेलेले मुचकुंद त्रेतायुगातही झोपलेच होते. द्वापरयुगात श्रीकृष्णाविरुद्धच्या युद्धात जरासंधानं मदतीसाठी कालयवन राक्षसाला बोलावलं. तो श्रीकृष्णावर चालून गेला असता, श्रीकृष्ण युद्धभूमी सोडून पळू लागले आणि मुचकुंद झोपलेल्या गुहेत शिरले. आपला शेला झोपलेल्या मुचकुंदांवर अलगद पांघरून दिला आणि ते एका कपारीत लपले. कालयवनानं गुहेत शिरताच तो शेला ओढला त्यामुळे त्यांची झोप मोडली. त्यांनी डोळे उघडताच कालयवन जळून भस्म झाला. त्यानंतर श्रीकृष्णानं त्यांना चतुर्भुज नारायणाच्या रूपात दर्शन दिलं. तर, दुसरा मुलगा राजा अंबरीश निस्सीम विष्णुभक्त म्हणून प्रसिद्ध होता. दर महिन्याच्या शुक्ल आणि कृष्ण पक्षात दशमीच्या संध्याकाळपासून द्वादशीच्या पूर्वान्हापर्यंत एकादशीचं व्रत स्वीकारलेला हा महाप्रतापी राजा. त्याच्या विष्णुनिष्ठेची परीक्षा पाहण्यासाठी मार्गशीर्ष शुद्ध द्वादशीला सकाळीच दुर्वास ऋषी त्याच्या राजप्रासादात पोहोचले आणि म्हणाले, 'हे राजा, मी माझी आन्हिकं आटोपून येतो. नंतर तू माझा अतिथी सत्कार कर. मग तू तुझं एकादशीचं व्रत सोड!' त्यानंतर माध्यान्ह होण्यासाठी काही पळच उरले तरी ऋषी दुर्वासांचं आन्हिक आटोपेच ना. त्यामुळे राजा अंबरीशानं विष्णु मूर्तीच्या डाव्या अंगठ्याचं तीर्थ आणि तुलसीपत्र ग्रहण करून व्रताची सांगता केली. त्याच क्षणी दुर्वास तिथे आले आणि त्यांची आज्ञा मोडली म्हणून शाप देते झाले. त्यानंतर दुर्वास ऋषींच्या मागे श्रीविष्णूंचे सुदर्शनचक्र लागले. अखेर राजा अंबरीशाला शरण गेल्यानंतरच त्यांचा पाठलाग थांबला. राजा अंबरीशाला महाविष्णूंच्या १२ निस्सीम भक्तांत स्थान मिळालं. महाभारतात आलेल्या एका संदर्भानुसार चक्रवर्ती मांधातांच्या तिसऱ्या पुत्राचा पुरुकुत्साचा विवाह नर्मदेशी झाला होता. बौद्ध साहित्यात येणारी चक्रवर्तीन् मांधाताची कथा काहीशी वेगळी आहे. मांधातृ किंवा मान्धातुजातक. बोधिसत्व त्यांच्या एका जन्मात चक्रवर्तीन् राजामांधातृ म्हणून जन्म घेते झाले. त्यांनी सर्व पृथ्वी जिंकून घेतली. पण त्यांना ऐहिक सुखांचा आणि विजयाचा कंटाळा आला. म्हणून त्यांनी स्वर्गासह ब्रह्मांडावर राज्य करण्याची महत्त्वाकांक्षा मनात धरली. देवराज इंद्रांनी आपलं अर्ध साम्राज्य त्यांना देऊ केलं. पण राजा मांधातृचा मोह काही केल्या कमी होईना. देवराजाची हत्या करून त्याचे सगळे राज्य हस्तगत करण्याची योजना ते आखू लागले. स्वर्गात अशा भावनांना स्थान नसतं. त्यामुळे राजा मांधातृ स्वर्गातून खाली पडले आणि त्यातच त्यांचा मृत्यू झाला. प्रथम चक्रवर्तीन् सम्राट मांधाता आजही भारतीय स्मृतीत नित्य आहेत. नर्मदा नदीकाठी ॐकारेश्वर ज्योतिर्लिंग स्थानाला 'ॐकार मांधाता' म्हणून ओळख आहे. तसंच तिबेटमधलं बुरंग परगण्यात ७६९४ मीटर उंच असलेल्या हिमालयाच्या शिखराला 'गुरला मांधाता' म्हणतात. प्राचीन काळी आंध्र प्रदेशातल्या गुंटूर जिल्ह्यात कृष्णा नदीच्या काठी 'धान्यकटक' या नावानं प्रसिद्ध असलेल्या शहरात इ.स.पूर्व तिसऱ्या शतकात एका भव्य स्तूपाची निर्मिती करण्यात आली. त्यावर या राजा मांधाताचं शिल्प आजही पाहायला मिळतं. अशा या अखंड कीर्तिवंताची ही आठवकथा. यावर चित्र तयार करा, नावे नकोत.

बोली आणि संस्कृती
प्रा. अजय देशपांडे




बोलीतील म्हणी सांस्कृतिक- सामाजिक आशयाने समृद्ध असतात. बोलणाऱ्याच्या ओठांवर सहज येणाऱ्या म्हणी बोलीचे सौंदर्य आणि सामर्थ्य असतात. महाराष्ट्रात मराठी, अहिराणी, कोहळी, खानदेशी, चंदगडी, वऱ्हाडी, झाडी तावडी पोवारी मालवणी, कोरकू, कातकरी, कोलामी गोंडी, माडिया, ठाकरी, निहाली, परधानी, पावरी, भिल्ली, हलबी, कोळी राठ्या-बारेला, कुंचीकोरवा कैकाडी, कोल्हाटी, गोरमाटी, गोसावी, घिसाडी, पारधी, डोंबारी, वडारी, चितोडिया या आणि आणखी कितीतरी बोली बोलल्या जातात. याशिवाय तेलुगू, सिंधी, पंजाबी, गुजराती, मारवाडी, उर्दू, हिंदी या भाषांच्या बोलीदेखील महाराष्ट्रात बोलल्या जातात. बोलींच्या दृष्टीने महाराष्ट्र समृद्ध आहे. प्रत्येक बोलीतील म्हणी आशयघन आहेत. 'धीर खाय तो खीर खाय' ही म्हण मावची बोलीत आहे. जो धीर धरतो म्हणजे जो संयमाने वागतो त्याचा फायदा होतो, असा अर्थ आहे. महाराष्ट्रातील नंदूरबार- धुळे परिसरातील या बोलीतील ही म्हण अनेक भागात बोलीत वापरली जाते. ही म्हण फक्त मावची कोळी बोलीतील लोककथा आणि म्हण महाराष्ट्रात विविध बोलींमध्ये सहज वापरली जाते. उगीर वाटाणा दातानं फुटेना उगीर वाटाणा दातानं फुटेना' किंवा 'उगीर दाणा दातान फुटेना' अशी म्हण आहे. पूर्वी मोड आलेले धान्य खाल्ले जात होते; आजही खाल्ले जाते. 'मोडत आली' ऐवजी आता मोड येतात. (भिजवलेल्या मोटेला मोड आले.) हरभऱ्याचे सोले अजूनही सोले आहेत (तुरीचे, वालाचे सोलेदेखील आहेत), 'उगीर' हा शब्द 'कुटण' सणाऱ्या म्हणजे न भिजणाऱ्या आणि दातांनी न फुटणाऱ्या दाण्यासाठी किंवा धान्यबीजासाठी वापरला जातो. रात्री पाण्यात भिजवून ठेवलेल्या हरबऱ्यांत, वाटाण्यात, मुगात, मोटेत (मटकी) काही दाणे कुटण असतात; ते भिजत नाही. त्यांना मोडही येत नाहीत. जो पाण्याने फुगून आला नाही, ज्यात अंकुरण्याची क्षमता नाही तो उगीर दाणा होय. हे दाणे दातांनी फुटत नाहीत; उलट दातच दुखतात. अशा दाण्यांना उगीर म्हणतात. 'उगीर वाटाणा दातानं फुटेना' ही लोकवाणी आहेच. त्रासदायी ठरलेल्या माणसाला लोकप्रतिभेने उगीर म्हटले आहेच. आता मोड आलेले कडधान्य पॅकिंग केलेल्या स्थितीत विकत मिळते. त्यात 'उगीर' दाणा नसतो, पण अवतीभवती उगीर माणसे असतातच. खानदेशी लेवा बोलीतील एक म्हण आहे. 'दया नही, मया नही, नहीं डोयाले पानी गोगलगायच्या दुधाचं काढावं लोनी' या म्हणीचा अर्थ प्रत्यक्षात दया- माया काहीच वाटत नसताना खोटी माया दाखवणे असा आहे. याच अर्थाची फुक्कटची 'माया अन् दाताले घामोया' ही म्हण वऱ्हाडीत आहे. संत तुकारामांचे 'मोले घातले रडाया नाही आसू नाही माया' या शब्दांचा अर्थ सांगण्यासाठी 'दया नही, मया नही, नहीं डोयाले पानी गोगलगायच्या दुधाचं काढावं लोनी' ही खानदेशी बोलीतील म्हण वापरता येते. आशयघन म्हणींचे सामर्थ्य संत तुकारामांच्या कितीतरी ओळी सुभाषितांचे, म्हणींचे सामर्थ्य घेऊन लोकभाषेत रुजले आहे. उदा. 'मोले घातले रडाया नाही आसू नाही माया', 'महापुरे झाडे जाती तेथे लव्हाळे वाचती', 'कन्या सासुऱ्याशी जाये मागे परतोनि पाहे', 'लहानपण दे गा देवा मुंगी साखरेचा रवा', 'जया अंगी मोठेपण तया यातना कठीण' संत तुकारामांच्या या आणि अशा कितीतरी ओळी सुभाषितांचे, म्हणींचे सामर्थ्य असल्यामुळे बोलींमध्ये रुजल्या आहेत. कवी विठ्ठल वाघ यांच्या एका कवितेत 'ढगा मुचूक आभाय कुंकू पुसलं कपाय' ही ओळ आहे.

पावसाळ्यात ढग नसलेले आभाळ अकाली कुंकू पुसल्या गेलेल्या स्त्रीच्या कपाळासारखे दिसते असा अर्थ आहे. कवी विठ्ठल वाघ यांच्या अनेक ओळींना सुभाषितांचे सामर्थ्य आहे. 'तळ्याचं पानी आटलं घळ्ळीचं तकदीर फुटलं', 'परकरातली पऱ्हाटी जशी लुगळ्यात आली', दययेची झाली रे राजरोस उलंगवाळी', 'येल काकडीचा होता बार कारल्याचा आला' या आणि कितीतरी ओळी लोकबोलीत ओठांवर सहज येणाऱ्या आहेत.

बोलीपुरती मर्यादित राहिलेली नाही, ती सर्वांची आहे. 'धड कावला पण नाय धड मोर पण नाय' ही म्हण मल्हार कोळी बोलीतील आहे.

या म्हणीचे उपयोजन असलेली गुलाब विलास जाधव यांनी सांगितलेली मल्हार कोळी बोलीतील 'कावला' ही एक लोककथा डॉ. अरुण जाखडे यांनी संपादित केलेल्या 'भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण : महाराष्ट्र' या ग्रंथात आहे. ती अशी 'एक होता कावला. कावला होता काला. एक दिस तो कावला मोठे डोंगरानं जातो. त्या डोंगरानं कावल्यान बरीच रंगाची पाखरां पाहली. कावला मंगा एक उचे झाडावर बसला. त्या झाडाचे खालत्तं यक मोर आलना नाचाय लागलं. नाचता नाचता त्या मोराची पिसां पडली. नाचून नुघल ना मंगा तथशी गेला. मोर गेला तसा कावला खालतं डेवला ना पिसा त्यानी त्याचे आंगाला टोचली ना. मंगा तो परत आपले मित्राजवळ आला ना मित्राना सांगाय लागला, 'मी पाहे कसाक दिसत.' मित्र हसाय लागला ना सांगाय लागला, 'तू धड कावला पण सोबस नाय ना धड मोर पण दिसस नीही.' मंगा वैतागून कावल्यान त्याचे आंगावरची पिसा काढून टाकली.'

या लोककथेनुसार 'धड कावला पण नाय, धड मोर पण नाय' या म्हणीचा अर्थ कोणाच्या बाह्यरूपाची नक्कल केली तर आपले मूळ रूप राहत नाही आणि ज्याचे रूप आपण घेऊ पाहतो ते खरे वाटत नाही. म्हणजे ना कावळा दिसत ना मोर दिसत अशी गत होते. ही मल्हार

(पान ६ वर)

भटकंती
विश्वास देशपांडे
भ्र. ९४०३७४९९३२

# उत्तराखंडमधील एक निसर्गरम्य प्रवास - भाग एक

**कधी कधी आपल्या ध्यानीमनी नसताना अचानक प्रवासाचा असा एखादा योग येतो की तो एका वेगळ्याच वातावरणात आपल्याला घेऊन जातो. असेच काहीसे आमचे नैनिताल सहलीबाबत घडले. एप्रिल महिन्याच्या सुटीत पुण्याला गेलो असताना माझ्या मुलाने आम्हां दोघांना नैनिताल, कौसानी वगैरे निसर्गरम्य ठिकाणी तुम्ही जाऊन या म्हणून आग्रह केला. एवढे करूनच तो थांबला नाही, तर आम्हाला स्वतः ट्रॅव्हल्स कंपनीच्या ऑफिसमध्ये घेऊन गेला. आणि १९ एप्रिल ते २५ एप्रिल २०२६ दरम्यान आमचे गिरिकंद हॉलिडेज तर्फे नैनिताल, कौसानी, रानीखेत, जिम कॉर्बेट या ठिकाणी जाण्याचे ठरले देखील!**




सहलीला जाण्याच्या दोन दिवस आधी पुन्हा एकदा आम्ही गिरिकंदच्या ऑफिसला भेट दिली. आम्हाला ज्या काही शंका होत्या, त्यांचे निराकरण करून घेतले. यावेळी माझी मुलगी सारिका आमच्यासोबत आली होती. दोन तीन दिवस आधीपासूनच प्रवासाची तयारी सुरु होती. आठवणीने प्रत्येक गोष्ट घ्यावी लागत होती. कुठेही जायचे तर हल्ली आधार कार्ड, फोटो इ. गोष्टी लागतातच. ते आठवणीने घेतले. तिथे थंडी असणार असे आम्हाला सांगितले गेले होते. त्यामुळे थंडीचे कपडे, बूट मोजे या सगळ्या गोष्टी आवर्जून घेणे भाग पडले.

विमानतळावर सामान चेक होते म्हणून लगेज बॅगमध्ये कोणत्या वस्तू ठेवायच्या, केबिन बॅगमध्ये कोणत्या वस्तू ठेवायच्या याचा विचार करून बॅगा भरल्या जात होत्या. १९ एप्रिलचा दिवस अक्षय तृतीयेचा होता. पण आमच्या प्रवासाची सुरुवातच त्या दिवशी होणार होती. मनात म्हटले ' प्रत्येक वेळी अक्षय तृतीया आपण घरीच साजरी करतो. यावेळी ती प्रवास करून साजरी करू या. १९ तारखेला पहाटे तीन वाजताच उठावे लागले. पुण्याहून सकाळी साडेसात वाजता इंडिगो विमानाने प्रवास ठरला होता. साडेचारला तयार होऊन कॅबने विमानतळावर पोहोचलो. चेकिंगच्या सर्व सोपस्कारातून यशस्वीपणे पार पडलो. आमचे विमान येणार त्या नियोजित गेटजवळ येऊन थांबलो. आमचा एकूण १८ जणांचा ग्रुप होता. त्यातील दोन व्यक्ती मुंबईहून परस्पर येणार होत्या. आमच्याजवळ असलेल्या कंपनीच्या ठराविक हॅन्डबॅग आणि कॅप यांच्या साहाय्याने विमानतळावरच आम्ही आमच्यासोबत सहलीला येणाऱ्या सहप्रवाशांना ओळखले. बरोबर पावणेसातच्या सुमारास आम्हाला विमानात प्रवेश देण्यात आला. आणि ठरलेल्या वेळेला म्हणजे सकाळी साडेसातला विमानाने हवेत झेप घेतली. ९.४५ ला आम्ही दिल्ली विमानतळावर होतो. तिथून सामान घेऊन बाहेर पडल्यानंतर आम्हा सर्वांना एका ठिकाणी थांबण्यास सांगितले होते. आमचा टूर मॅनेजर अक्षय गुप्ता बाहेर आमच्या स्वागतासाठी उभाच होता. त्याने आपल्या सहज संवाद साधण्याच्या पद्धतीने थोड्याच वेळात आम्हा सगळ्यांना आपलेसे केले. थोड्याच वेळाते गिरिकाली. आम्ही सगळे बसमध्ये बसलो आणि आमचा दिल्ली ते भीमताल असा प्रवास सुरु झाला. हा प्रवास साधारणपणे ७ ते ८ तासांचा आहे. दिल्ली ते भीमताल हे अंतर ३११ किमी आहे. आमची बस दिल्लीतील प्रमुख रस्त्यांवरून धावत होती.



अकबर रोड, इंडिया गेट, दिल्लीतील लोकांचे बंगले आमच्या दृष्टीस पडत होते. आमचा टूर मॅनेजर अक्षय आम्हाला अधूनमधून त्याबद्दल माहिती देत होता. एकदा मध्ये थांबून चहा नाश्ताला. परत एकदा जेवणासाठी बस एका ठिकाणी थांबली. त्याठिकाणी उत्तम गरमागरम जेवणाचा आनंद सर्वांनी घेतला.

उत्तर प्रदेश मधून उत्तराखंडकडे बस धावत होती. आम्ही जाणार होतो तो सगळा भाग कुमाऊं रिजनमध्ये येतो. हा सगळा भाग हिमालयाच्या पर्वतराजीने समृद्ध आणि नटलेला आहे. दिल्लीतून बाहेर पडताना मोठमोठे फ्लायओव्हर्स, अनेक पदरी रस्ते होते. त्यामुळे बस भराभर पुढे वाटचाल करीत होती. एकामागून एक गावे मागे पडत थंड प्रदेशाकडे होत होती. लवकरच हिमालयाच्या पर्वतराजीमध्ये बसने प्रवेश केला. मोठे भव्य रस्ते आता मागे पडून पहाडातील अरुंद रस्ते दृष्टीस पडत होते. साहजिकच बसचा वेगही कमी झाला होता. घाटातील रस्त्यांवर आमच्या बसचा ड्रायव्हर अतिशय कौशल्यपूर्वक बस चालवत होता. शहरी वर्दळ, इमारतींचे जंगल मागे पडले होते. खरेखुरे जंगल आणि हिरवीगार वृक्षराजी आमचे मन मोहून घेत होती. सूर्यप्रकाश मिळवण्यासाठी वृक्षांमध्ये जणू स्पर्धा लागली होती. त्यामुळे एकमेकाला न दुखवता ते आपली उंची वाढवत होते. दुसऱ्याच्या पुढे जायचे असेल तर त्याची रेघ लहान न करता आपली रेघ मोठी करावी हेच वृक्ष अप्रत्यक्षरीत्या तर सांगत नव्हते ? आता संध्याकाळ होत आली होती. नैनितालपासून साधारण बावीस किमी अलीकडे असणाऱ्या भीमताल या ठिकाणी आमचा आजचा मुक्काम होणार होता.

बसने आता भीमताल या ठिकाणी प्रवेश केला आणि तिथे ज्या ठिकाणी आमचा मुक्काम होणार होता, त्या हरशिखर हॉटेलच्या दिशेने आमची बस धावत होती. हॉटेल हरशिखर उंचावर आहे. शिखरच जणू! तिथे पोहोचले आणि तिथून जे काही दृश्य डोळ्यांना दिसले, त्यामुळे अक्षरशः डोळ्यांचे पारणे फिटले. जणू स्वर्गच धरतीवर अवतरला होता! हॉटेलच्या समोरच भीमताल लेक होते. त्याच्या पाठीमागे हिमालयीन पर्वतराजी. सरोवरातील पाणी, त्यात पडलेले मावळत्या सूर्याचे मनमोहक प्रतिबिंब या सगळ्यांवरून नजर हटत नव्हती. सगळ्यांचे कॅमेरे फोटो काढण्यात व्यस्त होते. कोणत्याही अँगलने कोठलाही फोटो घ्या. तो छानच येणार यात काही शंका नव्हती. हॉटेलच्या प्रवेशद्वारापर्यंत थोडेसे चालत जावे लागते. या रस्त्यात आणि हॉटेलमधील प्रत्येक ठिकाणी विविधरंगी फुले लक्ष आकर्षून घेत होती. निसर्गाने आपल्या सौंदर्याची मुक्तहस्ते उधळण केलेली होती. हा फोटो घेऊ की तो घेऊ असे प्रत्येकाला झाले होते. आता अंधार पडत आला होता. इथे संध्याकाळ इतकी छान दिसते तर सकाळ कशी असेल हा प्रश्न मला पडला होता. पण आम्ही भाग्यवान होतो. सकाळी हा सगळा नजारा आम्हाला मनसोक्त बघायला मिळणार होता. दोन दिवस आमचा इथे मुक्काम होणार होता. हॉटेलच्या स्टाफने आम्हा सर्वांचे हसतमुखाने आणि मनापासून स्वागत केले. वेगवेगळ्या फ्लेवरची सरबते आम्हाला दिली गेली. ज्याला जे आवडेल, ते त्याने घ्यायचे. हॉटेलच्या रुमदेखील अतिशय देखण्या आणि स्वच्छ. अत्यंत सुखद असे थंड वातावरण होते. रात्री विविध प्रकारच्या चविष्ट पदार्थांचा आस्वाद घेतला. उद्याचा दिवस कसा असेल असा विचार करीत झोपी गेलो. दिवसभरचा प्रवासाचा थकवा असल्याने केव्हा निद्रादेवीच्या अधीन झालो ते कळलेही नाही. (क्रमशः)



# ग्रहसंकेत

## (रविवार, ३१ मे ते शनिवार, ६ जून २०२६)

नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर, ज्येष्ठ पत्रकार

'शिवकृपा' फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो. कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र.९४२३७५८४०१)

✻ **रविवार, २४ मे-** रविवार, ३१ मे- अन्वाधान, मन्वादि, अहिल्यादेवी होळकर जयंती, तंबाखू सेवन विरोधी दिन, कुलधर्म ✻ **सोमवार, १ जून-** प्रतिपदा श्राध्द, गुरू कर्केत, जागतिक दुग्ध दिन, श्री गुरूकाका महाराज जयंती पिंगुळी (कुडाळ), जागतिक पालक दिन ✻ **मंगळवार, २ जून-** रेवाप्पा माळी महाराज पुण्यतिथी खुपसंगी (मंगळवेढा) ✻ **बुधवार, ३ जून-** संकष्ट चतुर्थी (चंद्रोदय- मंबई- २१: ५१, अहिल्यानगर- २१: ४३, कलबुर्गी-२१: ३१, कोल्हापूर-२१: ४०, जालना-२१: ४०, धाराशिव-२१: ३६, नांदेड-२१: ३२, पंढरपूर-२१: ३८, परभणी-२१: ३५, पुणे-२१: ४६, बीड-२१: ३९, लातूर-२१: ३४, विजापूर-२१: ३५, छत्रपती संभाजीनगर-२१: ४३, सातारा-२१: ४३, सोलापूर-२१: ३५) गुरूदेव रानडे पुण्यतिथी निंबाळ ✻ **गुरुवार, ४ जून-** शुभ दिवस ✻ **शुक्रवार, ५ जून-** जागतिक पर्यावरण दिन ✻ **शनिवार, ६ जून-** शिवराज्याभिषेक सोहळा किल्ले रायगड , रात्री ७: ०२ नंतर पंचक

**मुहूर्त:-** ✻ **साखरपुडा-** ३१ मे (१६ पर्यंत), २, ४, ५ जून ✻ **डोहाळ जेवण-** ३१ मे (१६ पर्यंत), २, ५ जून ✻ **बारसे-** ५ जून ✻ **जावळ-** ५ जून ✻ **गृहप्रवेश-** ३१ मे, ५, ६ जून (१० पर्यंत)

### मेष :- उत्साहवर्धक घटना

भाग्येश, व्ययेश गुरू सोमवारी रात्री रौप्य पादाने सुखस्थानी येत आहे. फल शुभ आहे. गुरू उच्च राशीत येत असल्याने त्याचे फल आपणास उच्च प्रतिचे राहिल. स्थावर, वाहन विषय शुभ फले मिळतील. राशी जवळच पापग्रह जमल्याने विचारपूर्वक रहावे. उपजत कला गुणांना चांगल्या संधी लाभतील. उत्साहवर्धक घटना. शुभ ता. २, ५

### वृषभ:- मनासारखी प्रगती

अष्टमेश, लाभेश गुरू सोमवारी लोहपादाने तृतीयात येत आहे. फल कष्ट आहे. बारावा मंगळ खर्चाचे प्रसंग वाढविणारा आहे. आर्थिक स्थितीही तशीच चांगली राहणार आहे. ज्ञानदान, बँक, माहिती तंत्रज्ञान, गृहसजावट अशा क्षेत्रात मनासारखी प्रगती होईल. उष्णतेपासून त्रास संभवतो. चिकाटीने रहावे. प्रगती होत जाईल. शुभ ता. ४, ५

### मिथुन:- सौख्यदायी घटना

सप्तमेश, दशमेश गुरू ताम्रपादाने धनस्थानी येत आहे. फल श्री प्राप्ती आहे. राशीतील शुभग्रह सौख्यदायी घटना घडविणार आहेत. आर्थिक प्रगतीचे मार्ग खुले होतील. वैद्यकिय, मेकॅनिकल अशा क्षेत्रात असणाऱ्यांना विशेष अनुकूलता राहिल. नव्या संधीचे लाभणार आहेत. लाभ घ्यावा. कौटुंबिक जीवनात सौख्याच्या घटना घडतील. शुभ ता. ४, ५

### कर्क:- फार चिंता करू नका

षष्ठेश, भाग्येश गुरू सोमवारी सुवर्ण पादाने राशीत येत आहे. फल चिंता आहे. कार्यक्षेत्रात उत्साहवर्धक घटना घडतील. कौटुंबिक सौख्य लाभेल. प्रशासन सेवेत अनुकूलता राहिल. महत्त्वाचे निर्णय पूर्ण विचाराने घ्यावेत. आत्मविश्वास वाढविणाऱ्या घटना घडतील. नव्या संधीचे लाभतील. अपेक्षीत कामे होतील. फार चिंता करू नका. शुभ ता. २, ५

### सिंह:- अपेक्षित घटना

पंचमेश, अष्टमेश गुरू रौप्य पादाने व्ययात येत आहे. फल शुभ आहे. प्राप्तीचे प्रमाण समाधानकारक राहिल. नव्या कामांना गती येईल. फार तिखट पदार्थ खाऊ नका. उष्णतेपासून त्रास होईल. प्रकृतीच्या तक्रारींची वेळीच दखल घ्यावी. छोटी साडेसाती आहे. विचाराने रहावे. अपेक्षित घटना घडतील. सुसंधीचा लाभ घ्यावा. शुभ ता. ४, ५

### कन्या:- मनासारखी प्रगती

सुखेश, सप्तमेश गुरू लोहपादाने लाभस्थानी येत आहे. फल कष्ट आहे. मंगळ आठवा असल्याने शारीरिक तक्रारींची दखल घ्यावी. कौटुंबिक सौख्य विलंबाने लाभेल. कार्यक्षेत्रात मनासारखी प्रगती घडेल. प्राप्तीचे प्रमाण समाधानकारक राहिल. नव्या विचारांना चालना मिळेल. अडचणीतून मार्ग निघत जाईल. अपेक्षित घटना घडतील. शुभ ता. २, ५

### तुला:- नव्या विचारांना चालना

तृतीयेश, षष्ठेश गुरू सोमवारी ताम्रपादने दशमात येत आहे. फल श्री प्राप्ती आहे. नोकरी, व्यवसायात सुसंधी लाभतील. राशी समोर मंगळ असल्याने विचारपूर्वक निर्णय घ्यावेत. मतभेदाचे प्रसंग टाळावेत. नव्या विचारांना चालना मिळेल. प्रकृतीच्या तक्रारी संभवतात. काळजी घ्यावी. धार्मिक सामाजिक कार्यात पुढाकार घ्याल. शुभ ता. २, ४

### वृश्चिक:- आर्थिक सुधारणा

धनेश, पंचमेश गुरू रौप्य पादाने भाग्यस्थानी येत आहे. फल शुभ आहे. अष्टमातील शुभ ग्रहांमुळे आर्थिक स्थितीत सुधारणा होईल. कार्यक्षेत्रात उत्साह, धडाडी वाढेल. नव्या विचारांना चालना मिळेल. अडचणीतून मार्ग निघाल्याने समाधान वाटेल. अपेक्षित संधी लाभतील. धार्मिक, सामाजिक कार्यात पुढाकार घ्याल. शुभ ता. ४, ५

### धनु:- चिंता करू नका

राशी स्वामी गुरू सुवर्णपादाने अष्टमात येत आहे. फल चिंता आहे. पंचमातील मंगळामुळे यांत्रिक क्षेत्रात प्रगती होईल. कौटुंबिक जीवनात सौख्याच्या घटना घडतील. कार्यक्षेत्रात कामाची जबाबदारी वाढेल. स्थावर प्रश्न विचाराने सोडवावेत. संततीशी मतभेदाचे प्रसंग टाळावेत. अचानक धनप्राप्तीचे योग आहेत. चिंता करू नका. शुभ ता. २, ५

### मकर:- कलेत प्रगती

तृतीयेश, व्ययेश, गुरू सोमवारी लोहपादाने सप्तमात येत आहे. फल कष्ट आहे. सुखस्थानी मंगळ असल्याने विनाकारण फार दगदग करू नका. उपजत कलेत प्रगती होईल. समस्यातून मार्ग निघत जाईल. कष्ट साध्य यश मिळेल. अपेक्षित घटना घडतील. नव्या विचारांना विचाराने स्वीकारावे. सुसंधी लाभतील. शुभ ता. ४, ५

### कुंभ:- प्रगतीच्या घटना

धनेश, लाभेश, गुरू सुवर्णपादाने षष्ठात येत आहे. फल चिंता आहे. पंचमातील शुभ ग्रहांमुळे आर्थिक प्रगतीच्या घटना घडतील. नवीन गुंतवणूक विचाराने करावी. शिक्षण, अनुभवातून चांगल्या घटना घडतील. नव्या कामांना गती मिळेल. अपेक्षित संधी लाभतील. फार दगदग करू नका. स्थावर प्रश्न संभवतात. शुभ ता. २, ५

### मीन:- शुभ घटना

राशी स्वामी गुरू सोमवारी ताम्रपादाने पंचमात येत आहे. फल श्री प्राप्ती आहे. खर्चाचे प्रसंग वाढले तरी प्राप्तीचे प्रमाणही तसेच चांगले राहिल. विलंबाने पण चांगलेच घडेल. स्थावर सौख्य लाभेल. नव्या योजना विचाराने स्वीकाराव्यात वादाचे प्रसंग टाळावेत. संतती संबंधात शुभ घटना घडतील. शुभ ता. २, ५

!! शुभ भवतु !!

पान १ वरून

## 'बिचारा देश' ते 'आत्मनिर्भर भारत'

पाकिस्तानला सर्व प्रकारची मदत ही चीनकडून होत होती. भारतात निर्मिती करण्यात आलेले ड्रोन्स, मिसाईल्स आणि शस्त्रास्त्रांची ताकद यावेळी दाखवून दिली. पाकिस्तानकडून आलेले ड्रोन्स, मिसाईल्स आपल्या 'एअर डिफेन्स सिस्टम'ने हाणून पाडले. 'आत्मनिर्भरता' म्हणजे जो भारत शस्त्रास्त्रं आयात करत होता, तोच भारत आज ५० हजार कोटींच्या शस्त्रास्त्रांची निर्यात करतो आहे. देशाला ३६५ दिवस लागेल इतका दारुगोळा तिथून निर्माण होणार आहे. पाच वर्षं त्यांच्याकडून इस्रायल खरेदी करणार आहे. 'मेक इन इंडिया' आणि 'मेड फॉर वर्ल्ड' हे आता पूर्ण होताना दिसते आहे. एकूणच, एक नवीन भारत ज्यात गरिबांचा, शेतकऱ्यांचा आणि महिलांचा विचार होतो; असा भारत निर्माण होतो आहे. युवांचं स्वप्न निर्माण करणारा, 'स्टार्टअप' रुजवणारा भारत निर्माण होतो आहे.

पान २ वरून

## निर्णय

''काकू, आम्ही पुन्हा एकदा डॉक्टरांशी चर्चा केली. या दुखण्यातून तुम्ही खडखडीत बऱ्या व्हाल अशी आशा नाही. अपंगत्व येऊन खितपत पडणं तुम्हाला कधीच आवडायचं नाही, याची खात्री आहे मला. म्हणूनच एक कठोर निर्णय मी दादा आणि नानांच्या गळी उतरवून आले आहे. काकू, तुम्ही मलाही खूप हव्या आहात, पण पांगळ्या होऊन नव्हे.'' ''पोरी अगं किती मनकवडी आहेस तू. जे सांगायला माझा जीव तडफडत होता; ते तू नेमकं ओळखलंस. लुळंपांगळं होऊन जगणं खरंच मान्य नसतचं झालं मला. तुझ्या निर्णयामुळे सुटका होईल माझी यातून. पोरी पुनर्जन्म असेलच ना तर तुझ्या पोटी यायला आवडेल मला...!''

पान २ वरून


## सिग्नलवर हरवलेलं बालपण...

पण त्या मुलाचं पुढे काय होतं, तो रात्री कुठे झोपतो, त्याला अन्न मिळतं का, त्याच्यावर अत्याचार होतात का हे प्रश्न आपण विचारत नाही. दया आणि संवेदना यामध्ये मूलभूत फरक असतो. दया तात्पुरती असते; संवेदना व्यवस्था बदलण्याची मागणी करते. याच ठिकाणी राज्यव्यवस्थेचं अपयशही स्पष्ट दिसतं. भारतात बालकामगारविरोधी कायदे आहेत. बालहक्क संरक्षणासाठी संस्था आहेत. किशोर न्याय कायदा, शिक्षणाचा हक्क कायदा आणि बाल संरक्षणाच्या विविध योजना अस्तित्वात आहेत. तरीही हजारो मुलं अजूनही सिग्नलवर भीक मागताना दिसतात. कारण समस्या केवळ कायद्यांची नाही; ती अंमलबजावणी, समन्वय आणि सामाजिक इच्छाशक्तीची आहे. अनेक शहरांमध्ये बचाव मोहिमा राबविल्या जातात. आज गरज आहे ती बहुआयामी हस्तक्षेपाची. सिग्नलवर भीक मागणाऱ्या मुलांना फक्त हटवणं हा उपाय होऊ शकत नाही. त्यांच्यासाठी शिक्षण, निवारा, समुपदेशन, पोषण, आरोग्यसेवा आणि कुटुंब पुनर्वसनाची मजबूत यंत्रणा आवश्यक आहे. शहरी स्थानिक स्वराज्य संस्था, पोलिस, बालकल्याण समित्या, स्वयंसेवी संस्था आणि समुदाय यांच्यात प्रभावी समन्वय निर्माण होणं गरजेचं आहे. त्याहून महत्त्वाचं म्हणजे समाजाने या मुलांकडे 'समस्या' म्हणून नव्हे, तर अधिकार असलेल्या नागरिकांप्रमाणे पाहण्याची गरज आहे. आज शहरांमध्ये उंच इमारती वाढत आहेत, फ्लायओव्हर उभे राहत आहेत, अर्थव्यवस्था विस्तारत आहे. पण त्याच शहराच्या सिग्नलवर जर एखादं मूल अजूनही काच ठोठावत उभं असेल, तर आपल्या विकासाच्या दाव्यांना पूर्ण म्हणता येणार नाही. कारण कोणत्याही समाजाची खरी ओळख त्याच्या श्रीमंतीत नसते; ती त्याने आपल्या सर्वात असुरक्षित मुलांसाठी निर्माण केलेल्या सुरक्षित भविष्यामध्ये असते. जोपर्यंत सिग्नलवर मुलांचं बालपण हरवत राहील, तोपर्यंत आपल्या विकासाच्या प्रवासात एक खोल नैतिक अपूर्णता कायम राहील.

तत्त्वदर्शन

डॉ. राजेंद्र डोळके

# ऋग्वेदातील देवता



स्थूलमानाने वैदिक देवतांचे तीन वर्ग होतात. (१) भूलोकीय देवता- उदा. अग्नी. (२) अंतराळातील देवता- उदा. वायू, सूर्य, वरुण. (३) स्वर्गीय देवता- उदा. इंद्र, विष्णू वगैरे. निसर्गशक्ती संख्येने अनेक असल्यामुळे देवतांची संख्याही साहजिक अनेक झाली. ही संख्या निश्चित स्वरूपाची नाही. साधारणतः ३५ च्या आगेमागे ही संख्या सांगितली जाते. या सर्वच देवतांना ऋग्वेदात सारखे महत्त्व देण्यात आले नाही; चार-पाचच देवतांना त्यात फार महत्त्व देण्यात आले आहे आणि त्या देवतांची प्रार्थना करण्यावरच अनेक ऋचा खर्च झाल्या आहेत. त्यात सूक्तांच्या संख्येच्या दृष्टीने इंद्र हा श्रेष्ठ ठरतो. याच्या एकट्यावर २५० सूक्ते रचलेली आढळतात. इंद्र ही पर्जन्याची देवता असल्यामुळे आणि पर्जन्य म्हणजे जवळजवळ सर्व अंतरिक्षाचा प्रमुख, अशी परिस्थिती असल्यामुळे सर्व ज्याच्या हाती तो देव इंद्र, त्याला भारतीयांचा सर्वश्रेष्ठ देव; एवढेच नव्हे, तर देवांचा राजा म्हणून स्थान मिळाले. साहजिकच याची प्रार्थना करण्याची परिसीमा ऋषींनी गाठलेली ऋग्वेदात दिसून येते.

इंद्र हा सर्व देवात बलिष्ठ व तेजस्वी आहे. तो शरीराने बळकट, वज्रबाहू व वज्रहस्त आहे. इंद्राने वृत्रासुराशी घनघोर युद्ध करून त्यास ठार केले म्हणून त्यास 'वृत्रहम' हे नाव मिळाले. विद्युत हे त्याचे वज्र आहे. ते फेकून तो पर्वतांचा भेद करतो. इंद्र शूर आहे. तो आपल्या भजकांच्या शत्रूंचा नाश करून त्यांना संपत्ती मिळवून देतो. वैदिक आर्यांच्या दृष्टीने तर इंद्र हा विशेष महत्त्वाचा आहे. कारण ऋग्वेदकाळी भारतीयांना निरंतर संग्राम करावे लागत असत. इंद्र भारतीयांच्या बाजूने युद्ध करून त्यांना विजयी करी. म्हणून आपण इंद्राची आराधना केली तर इंद्र आपल्या शत्रूंचा पूर्ण नायनाट करील, अशी त्यांची समजूत होती. आर्यांचे शत्रू असलेल्या दानवांची दगडांची व धातूंची सुमारे १०० पुरे त्याने फोडून टाकली म्हणून त्यास 'पूरभिद्' म्हणतात. मात्र, इंद्राच्या एकंदर वर्णनावरून इंद्र जसा पराक्रमी व न्यायी वाटतो तसाच काहीसा अभिमानी, कोपिष्ट, सूडाची भावना असलेला व सोमरसाची आसक्ती असलेला दिसून येतो.

इंद्राचा कोप झाल्यास तो प्रचंड वादळे, विजांचे उत्पात, मेघांचा गडगडाट आदींच्या साहाय्याने अपराध करणाऱ्यांवर सूड घेतो, अशी भीती वैदिक आर्यांना वाटत असे.

वेदकाळात इंद्राला मिळालेले सर्वश्रेष्ठत्व हे नंतरच्या काळात मात्र ओसरलेले दिसून येते. ऋग्वेदामध्ये इंद्राच्या खालोखाल अग्नीला प्राधान्य असलेले दिसून येते. अग्नीची एकूण २०० सूक्ते ऋग्वेदात आढळतात. ऋग्वेदातील पहिल्या मंडलातील पहिले सूक्त हे अग्नीलाच वाहिलेले आहे. या सूक्ताची सुरुवातच मुळी 'अग्नीमिळे पुरोहितं यज्ञस्य देवमृत्विजम्। होतारं रत्नधातम्' या ऋचेने झाली आहे. 'अग्नी हा यज्ञाचा अग्रणी आहे. यज्ञाचा प्रमुख देव तोच. यज्ञाचा हविर्भाग त्या त्या देवतेप्रत पोहोचविणारा सन्माननीय आचार्यही तोच. असंख्य रत्नांचा अनुपम निधी त्याच्याजवळ आहे' असे या ऋचेत सांगितले आहे.

अग्नीतील ज्वाळा वरवर जात असलेल्या पाहून वर आकाशात राहणाऱ्या देवतांकडे स्तुतिस्तोत्रे पाठवावयाची ती अग्नीच्या ज्वालांतून पाठवावी, अशा विचाराने यज्ञाच्या कल्पनेने मूळ धरलेले असावे. अग्नीच्या ज्वालांत तूप ओतल्यावर तो रौद्र रूप धारण करीत वरवर उफाळत जातो, हे आपण बघतोच. अशा यज्ञयागांनी सर्व कामना तृप्त होतात, अशी सामान्यांची भावना असते. पर्जन्य पडतो तो यज्ञामुळेच. या पर्जन्यामुळे गोड पाण्याच्या नद्या खळखळून वाहतात आणि भरपूर पाण्यामुळे धनधान्य भरपूर प्रमाणात उत्पन्न होऊन जनजीवन सुखमय व समृद्ध होते. अशारीतीने अग्नी हा सुखमय जीवनाचा महत्त्वाचा आधार असल्यामुळे जगातील निरनिराळ्या खंडांतील अनेक संस्कृती या अग्निपूजक आहेत. पंचभूततत्त्वांपैकी 'तेज' हे तिसरे भूततत्त्व म्हणून अग्नीला समजले जाते. तो देव व माणसे यांच्यातील मध्यस्थ म्हणजे देवदूत आहे. अग्नी देवतांना यज्ञात बोलावून आणतो. भारतीय आर्यांच्या विवाह, उपनयन, अंत्येष्टी वगैरे अनेक संस्कारांत अग्निपूजेलाच प्राधान्य असते. अग्नीची पूजा म्हणजे मंत्रपूर्वक अग्निस्थापना करून विविध अन्नात्मक द्रव्यांचे अग्नीला वा अन्य देवतांना उद्देशून हवन करणे व अखेरीस अग्निदेवाचे विसर्जन करणे. वैदिक धर्मात अग्निहोत्र हे नित्य व पवित्र कर्तव्य मानले आहे.

इंद्र व अग्नी यानंतर 'वरुण' या देवतेचा विचार करू. ही देवता इंद्रानंतरची इंडो-इराणी काळातली आहे, असे लक्ष्मणशास्त्री जोशी लिहितात. (लेखसंग्रह, पृ. १९६) ही देवता अत्यंत पवित्र व मांगल्यपूर्ण समजली जाते. या देवतेवर ऋग्वेदामध्ये जरी फारच कमी मंत्र आढळतात तरी ते मंत्र संपूर्ण वैदिक वाङ्मयात फार उच्च व उदात्त मानले गेलेले आहेत.

वरुण ही सामान्यतः जलदेवता किंवा पर्जन्यदेवता समजली जाते. वरुणाला जलमय सागरांचा राजा असे म्हटले जाते. वैदिककाली दूरवर प्रदेश व्यापित जाण्याची इच्छा धरणारे शूरवीर भटकत होते. ते काही ठिकाणच्या जलप्राशनाने जलोदराच्या विकाराने पछाडले जात असावेत. तेव्हा 'या जलोदरापासून आमचे संरक्षण कर' अशी प्रार्थना ते जलदेव जो वरुण त्याला करीत असत. वरुणाला सर्वश्रेष्ठ नैतिक नियमांचा पालन करणारा म्हणूनही समजले जाते. नीतीविषयक सद्गुणांचा विकास करणारी, त्यांचे रक्षण करणारी अशी ही देवता आहे, असे वरुणाला केलेल्या प्रार्थनेवरून स्पष्ट दिसते. वरुणसूक्ते ही काव्यगुण व विश्वचिंतन या दृष्टीने फार मोलाची आहेत.

ऋग्वेदात असलेली यानंतरची आणखी एक महत्त्वाची देवता म्हणजे उषा होय. उषा ही नित्यतरुण व अमर अशी स्वर्गकन्या. सूर्य हा तिचा पती तर रात्र ही तिची बहीण होय. ऋग्वेदात २४ उषासूक्ते आहेत. ही इतकी सुंदर आहेत की तत्कालीन सौंदर्याभिरुची किती उच्च दर्जाची होती, याची कल्पना येते. उषासूक्तांतील काही वर्णने उत्तर ध्रुवाकडील उषःकालाला लागू पडतात, त्यावरून लोकमान्य टिळकांनी उत्तरध्रुव हे आर्यांचे मूलस्थान ठरविले आहे. ऋग्वेदातील काही प्रमुख देवतांचे स्वरूप याप्रमाणे आहे. सृष्टीतील चमत्कार म्हणजेच या देवता अशी काहीशी समजूत त्याकाळच्या मानवाची झालेली दिसते.

या चमत्कारांपासून भयभीत आणि स्तिमित होऊन त्यांची अवकृपा न होवो म्हणून त्यांच्या कृपेची आणि संरक्षणाची याचना करण्याकरिता ही देवता- सूक्ते निर्माण झालेली दिसतात. निसर्गातील घडामोडी या देवतांच्याच क्रिया होत. या देवता- शक्तींचे हे नियमितपणे चाललेले व्यापार पाहून ऋग्वेदातील कवींनी या नियमितपणाला 'ऋत' ही संज्ञा दिली आहे. ऋत म्हणजे नियमित मार्गक्रमणा. त्याचाच दुसरा अर्थ नियमितपणे पार पाडावयाचे यज्ञ, त्याचा तिसरा अर्थ योग्य किंवा सत्यकर्म अथवा नीतिनियम.

पान ३ वरून

## इतना सन्नाटा क्यों है भाई...

घरी मुलेबाळे असावी. बायको सपशेल नकार देते. करीअरला प्राधान्य. मी कमावतोय. अजून जास्त कमाविन, अजून जास्त वेळ काम करीन. ती समजूनच घेत नाही; त्याला काय करावे? माझ्या नोकरीमध्ये माझा वेळ माझा नाही. मी माझा वेळ कंपनीला विकलाय. पण त्या बदल्यात मला बरेच काही पर्क्स मिळतात. त्यामधूनच आमचे भविष्य सुरक्षित होते. मी घरी परत येतो तर बायको थकून झोपलेली असते. आजकाल तर मी पार्टी नसेल तर तिने काहीतरी बनविलेले असते; ते गरम करणेही सोडून दिले आहे.

ऑफिसमधून निघतानाच मी काहीतरी खाऊन निघतो. घरी दोन घास पोटाखाली ढकलायचे आणि झोपायचे. बायको काही विचारत नाही. मीदेखील काही सांगत नाही. सुरुवातीला त्रास झाला, पण आता तिच्या न विचारण्याचेही काही वाटत नाही. बरेच वेळा माझे इंटरनॅशनल कॉल्स असतात; ते अटेंड करावे लागतात. अमेरिकन लोक ते. त्यांच्याशी ऑफिशियल वेळातच बोलावे लागते. ऑफिसच्या वेळेनंतरचा त्यांचा वेळ खाजगी कामांसाठी असतो.

माझा वेळ चांगला जातो. कारण आता आम्हा नवरा-बायकोत एक प्रकारची शांतता निर्माण झाली आहे. आम्ही आजकाल भांडणांसाठीही बोलत नाही. एक विचित्र प्रकारचे अनोळखीपण आले आहे आमच्यात. 'हमारे बीच मे जो सन्नाटे है ना वो ही शायद झगडते रहते है और पुझता है, इतना सन्नाटा क्यों है भाई...!'

या दोघांचे घर : अरे वेड्यांनो, मला सजविता सजविता तुम्ही माझ्या अस्तित्वाचे खरे मर्म विसरलात. पॅकेजच्या नादात भविष्याची चिंता करता करता वर्तमानकाळात जगायला विसरलात. एकमेकांचे अस्तित्व टिकविण्याच्या हौसेपोटी मला हवी असलेले लहानग्यांच्या बोबड्या बोलांचे महत्त्व तुम्हाला पटेनासे झाले.

दोघांच्या भविष्यासाठी काम करताना एकमेकांना वेळ द्यायचा असतो, हे तुमच्या लक्षातच राहिले नाही. आपापल्या कार्यालयातील सहकारी मंडळींशी जेवढे बोलता त्यापेक्षा १० टक्केदेखील एकमेकांशी तुम्ही बोलत नाही, याची खंतही तुम्हाला वाटेनाशी झालीय. अरे, येथील शांतता मला खायला उठते. कारण ती एकाकीपणाची शांतता नाही तर दोन व्यक्तींच्या संवादहीन आयुष्यातील भयाण शांतता आहे.

घर हे सिमेंट-विटांचे बनलेले असले तरीही त्याला माणसांच्या आनंद संवादांनी घरपण मिळवून द्यावे लागते. मला तुम्ही निर्माण तर मोठ्या आवडीने केले, पण घरपण न मिळालेली मी एक देखणी परंतु भकास इमारत बनून राहिलेय..

बघा तुमचे एकमेकांचे अनोळखी पण जर घालविता आले तर मला माझी खरी खुरी ओळख मिळेल. आपण: हे सारे ऐकून केवळ सुन्न आणि आपल्यासोबत असे होऊ नये याची काळजी...

पान ४ वरून

## शो मस्ट गो ऑन

आजच्या काळातील लहान मुले वाचनापेक्षा दृकश्राव्ये माध्यमाकडे अधिक आकर्षित होतात हे वास्तव आहे. त्या माध्यमातील चित्रपट ही कला सर्वात प्रभावी आहे. हा चित्रपट कसा पाहावा, त्याचे तांत्रिक आणि कलात्मक घटक कोणते याचे शिक्षण जर शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट केले तर लहानपणापासूनच मुलांना चित्रपट कलेचं भान येईल. चित्रपट बघणं म्हणजे वाईट संस्कार मनावर करून घेणं, या जुन्या समजुतीला मूठमाती देण्याची गरज आता निर्माण झाली आहे. निर्माता दिग्दर्शक प्रेक्षकांसाठी चित्रपट निर्माण करतात. त्यातून मनोरंजन होतेच; त्याबरोबरीने आयुष्याकडे पाहण्याचा एक व्यापक दृष्टिकोनही नकळत तयार होत असतो. चित्रपट ही समूहाने आस्वाद घेण्याची कला आहे. या कलेला प्रेक्षक म्हणून आपण भरभरून दाद द्यायला हवी. चित्रपट पाहून त्यावर आपले मत मांडायला हवे. एखादा चित्रपट आवडला तर का आवडला आणि नाही आवडला तर का नाही, याची आस्वादक पद्धतीने चर्चा करायला हवी. आपल्या प्रतिसादातून कलावंतांना नवीन कलाकृती निर्माण करण्याची प्रेरणा मिळायला हवी. चित्रपट कलेचा प्रवाह जिवंत राहायला हवा.

पान ५ वरून

## बोलीतील म्हणींचे सौंदर्य आणि सामर्थ्य

कवितेतली ओळ जेव्हा मन मेंदूत भिनते, लोकप्रतिभा दाद देते तेव्हाच ती लोकांच्या ओठांवर सहज मिरवते; मग ती ओळ बोलीत सुभाषित होते, म्हण होते. 'गोळीचा एक पाय तुटला तर गाळे लंगडी होत नाही' अशी एक म्हण वऱ्हाडीत आहे. अनेक पाय असणारी गो एक पाय तुटला म्हणून लंगडी होत नसते तसेच अनेक कामे करणाऱ्याचे एखादे काम कोणी केले नाही म्हणून त्याचे काही अडत नसते, असा आशय या म्हणीत आहे.

झाडीबोलीत 'उबा तवरिक सोबा' ही एक म्हण आहे. तिचा अर्थ 'सर सलामत तो पगडी पचास' असा आहे. हिंदीतली ही म्हण महाराष्ट्रातील बोलींमध्ये रुजली आहे. तावडी बोलीतील 'आयजीच्या जिवावर बायजी उदार' या म्हणीचा अर्थ दुसऱ्याच्या पैशांवर किंवा वस्तूवर स्वतःचा मोठेपणा मिरवणे असा आहे. ही म्हणदेखील महाराष्ट्रात सर्वत्र प्रसंगोपात म्हटली जाते. पोवारी बोलीत 'बुडतोला तिनको को साहारा' ही म्हण आहे. 'बुडत्याला काठीचा आधार' ही म्हण सर्वत्र आहेच. मालवणी बोलीतील 'सांदाण कित्या वाकडा पिड्याची लाकडा' या म्हणीचा अर्थ 'नाचता येईना अंगण वाकडे' असा आहे. महाराष्ट्रासह भारतातील विविध बोलींमध्ये अर्थसघन म्हणींचा खजिना आहे. हे ऐश्वर्य टिकवून ठेवणे आपले कर्तव्य आहे.

राजकारण डॉ. सुकृत खांडेकर

# नवी पहाट पण आव्हानांचा डोंगर

**पश्चिम बंगालमध्ये झालेला सत्तापालट म्हणजे बंगालच्या अस्मितेची, संस्कृतीची आणि विकासाची पुनर्रचना करण्याची सुवर्णसंधी आहे. शुभेंदू अधिकारी यांच्याकडे संघटनात्मक कौशल्य आणि प्रशासनाचा दांडगा अनुभव आहे. केंद्र सरकारच्या 'डबल इंजिन' ताकदीचा वापर करून बंगालला हिंसाचारमुक्त आणि उद्योगस्नेही बनवण्यावरच त्यांच्या सरकारचे यश अवलंबून असेल.**




पहिली आघाडी म्हणजे भारत-पाकिस्तान सीमा, दुसरी आघाडी म्हणजे अफगाणिस्तान सीमेजवळील खैबर पख्तूनख्वाचा भाग आणि तिसरी आघाडी म्हणजे बलुचिस्तानमधील स्वातंत्र्यवादी व दहशतवादी चळवळी. या तिन्ही आघाड्यांवर एकाच वेळी संघर्ष करणे हे कोणत्याही देशासाठी अत्यंत कठीण असते. त्यातच जनतेचा सैन्यावरचा विश्वाससुद्धा कमी होत चालला आहे. सौदी अरबमध्ये पाकिस्तानी सैन्याची तैनाती सौदी अरबच्या सुरक्षेसाठी पाकिस्तानी सैन्याची मोठ्या प्रमाणावर तैनाती करण्यात आलेली आहे. विशेषतः इराणकडून होणाऱ्या संभाव्य क्षेपणास्त्र किंवा ड्रोन हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर पाकिस्तानने ४० ते ५० हजार पाकिस्तानी सैनिक सौदी अरबमध्ये पाठवले आहेत.

पाकिस्तानला स्वतःच्या सीमांवर आणि अंतर्गत भागात मोठ्या प्रमाणावर सैन्याची आवश्यकता असताना त्यांचे अनुभवी सैनिक परदेशात गुंतलेले आहेत. त्यामुळे पाकिस्तानच्या लष्करी क्षमतेचे विभाजन झाले आहे. बलुचिस्तानमधील वाढती बंडखोरी आज पाकिस्तानसमोरील सर्वात मोठे अंतर्गत आव्हान म्हणजे बलुचिस्तानमधील बंडखोरी. बलुच लोकांचा आरोप आहे की, पाकिस्तान सरकार त्यांच्या नैसर्गिक संपत्तीची लूट करते. पण, विकासमात्र पंजाब प्रांतात होतो. 'चीन-पाकिस्तान आर्थिक कॉरिडोर' प्रकल्पानंतर बलुच असंतोष आणखी तीव्र झाला आहे. 'बलुचिस्तान लिबरेशन आर्मी' (बीएलए) आणि इतर सशस्त्र संघटना आता पूर्वीपेक्षा अधिक संघटित आणि आक्रमक झाल्या आहेत. त्यांनी पाकिस्तानी सैन्य, पोलीस, गुप्तचर यंत्रणा आणि चिनी नागरिकांवर अनेक हल्ले केले आहेत. ग्वादर बंदर, रेल्वेमार्ग, लष्करीतळ आणि सरकारी इमारती सतत लक्ष्य बनत आहेत. विशेष म्हणजे, पाकिस्तानी सैन्याला जमिनीवर उतरून मोठ्या प्रमाणावर कारवाई करण्यास अनेकदा भीती वाटते. त्यामुळे पाकिस्तान प्रामुख्याने हेलिकॉप्टर, गनशिप, ड्रोन, फायटर जेट्स आणि क्षेपणास्त्रांच्या मदतीने हवाई हल्ले करत आहे. परंतु, अशा कारवायांमध्ये अनेकदा सामान्य नागरिक मारले जातात. परिणामी, बंडखोरी संपण्याऐवजी मजबूत होत आहे. खैबर पख्तूनख्वामध्ये 'टीटीपी'चे पुनरुज्जीवन पाकिस्तानसमोरील दुसरे मोठे संकट म्हणजे 'तहरीक-ए-तालिबान पाकिस्तान' ('टीटीपी') या संघटनेचा वाढता प्रभाव. अमेरिकेने अफगाणिस्तानमधून माघार घेतल्यानंतर आणि अफगाण तालिबानने काबुलवर सत्ता मिळवल्यानंतर 'टीटीपी' अधिक आक्रमक झाली आहे. आज खैबर पख्तूनख्वा आणि आदिवासी भागांमध्ये पाकिस्तानी सैन्यावर जवळजवळ रोज हल्ले होत आहेत.

लष्करीतळ, पोलीस स्टेशन, चेकपोस्ट आणि सैन्याचे ताफे सतत लक्ष्य बनत आहेत. पाकिस्तानला सर्वात मोठा धक्का म्हणजे अफगाण तालिबान आता पाकिस्तानच्या बाजूने पूर्णपणे उभे राहत नाहीत. उलट, 'टीटीपी'ला अफगाण भूमीवर आश्रय मिळत असल्याचा आरोप पाकिस्तान करतो. त्यामुळे पाकिस्तान-अफगाणिस्तान संबंध गंभीर तणावात आले आहेत. पाकिस्तानी सैन्याची समस्या अशी आहे की, त्यांनीच अनेक दशकांपूर्वी जिहादी धोरण राबवले होते. भारताविरोधात आणि अफगाणिस्तानमध्ये प्रभाव वाढवण्यासाठी ज्या अतिरेकी गटांना वाढवले, तेच आता पाकिस्तानविरोधात शस्त्रे उचलत आहेत. त्यामुळे पाकिस्तान आज स्वतःच्या निर्माण केलेल्या दहशतवादाच्या जाळ्यात अडकला आहे. भारताविरोधातील सततची शत्रुत्वाची भूमिका पाकिस्तानी सैन्याची पारंपरिक आणि सर्वात महत्त्वाची आघाडी म्हणजे भारत. काश्मीरमध्ये हिंसाचार वाढवण्यासाठी घुसखोरी, दहशतवादी संघटनांना मदत आणि सीमावर्ती भागात संघर्षविराम उल्लंघन ही त्यांची जुनी नीती राहिली आहे. जम्मू- काश्मीरमध्ये भारतीय सुरक्षा दलांनी दहशतवादाचे कंबरडे मोडले आहे. सीमावर्ती भागात अत्याधुनिक तंत्रज्ञान, ड्रोन सर्व्हेलन्स, स्मार्ट फेन्सिंग आणि जलद प्रतिसाद प्रणालीमुळे घुसखोरीचे प्रमाण कमी झाले आहे. सर्जिकल स्ट्राईक, बालाकोट हल्ला आणि त्यानंतरची भारतीय भूमिका पाहता, पाकिस्तानला आता भारताविरोधात मोठा लष्करी संघर्ष उभा करण्याची हिंमत होत नाही. आर्थिक संकटामुळे वाढलेले आव्हान कोणतेही युद्ध किंवा सुरक्षा मोहीम चालवण्यासाठी मजबूत अर्थव्यवस्था आवश्यक असते. पण, पाकिस्तानची अर्थव्यवस्था आज अत्यंत कमजोर झाली आहे.

प्रचंड महागाई, परकीय कर्ज, चलनाचे अवमूल्यन आणि बेरोजगारीमुळे देश संकटात आहे. आर्थिक संकटामुळे सैन्याच्या आधुनिकीकरणावर परिणाम झाला आहे. इंधन, दारुगोळा, सुटे भाग आणि तांत्रिक उपकरणांची कमतरता निर्माण होत आहे. चीनकडून मिळणाऱ्या मदतीवर पाकिस्तान मोठ्या प्रमाणावर अवलंबून झाला आहे. दुसरीकडे बलुचिस्तान, खैबर पख्तूनख्वा आणि भारत सीमा या तिन्ही भागांमध्ये एकाच वेळी मोठ्या प्रमाणावर सैन्य तैनात ठेवणे पाकिस्तानसाठी अत्यंत खर्चिक ठरत आहे. पाकिस्तानी सैन्याची मानसिक आणि रणनीतिक अवस्था आज पाकिस्तानी सैन्याची सर्वात मोठी समस्या म्हणजे 'ओव्हर स्ट्रेच' म्हणजेच क्षमतेपेक्षा जास्त ताण. एकाच वेळी अनेक संघर्षांमध्ये अडकलेल्या सैन्याचे मनोबल खालावू लागते. सततचे दहशतवादी हल्ले, आत्मघाती कारवाया आणि सैनिकांचे वाढते मृत्यू यामुळे मानसिक दबाव वाढत आहे. पाकिस्तानच्या इतिहासात प्रथमच मोठ्या प्रमाणावर सामान्य लोकांनी लष्करावर थेट टीका केली. त्यामुळे सैन्याची अस्पर्शनीय प्रतिमा हादरली आहे. पाकिस्तानला यश कितपत मिळत आहे? जर तिन्ही आघाड्यांचा विचार केला, तर पाकिस्तानला कुठेही निर्णायक यश मिळताना दिसत नाही. बलुचिस्तानमध्ये बंडखोरी संपलेली नाही. उलट, अधिक संघटित होत आहे. खैबर पख्तूनख्वामध्ये 'टीटीपी' अधिक आक्रमक झाली आहे. भारताविरोधात घुसखोरी आणि दहशतवाद वाढवण्याचे प्रयत्न मोठ्या प्रमाणात अपयशी ठरत आहेत. अफगाणिस्तानसोबतचे संबंध तणावपूर्ण आहेत. आर्थिक परिस्थिती दिवसेंदिवस खराब होत आहे.

पाकिस्तानी सैन्यदलाची बदलती प्राथमिकता आणि सुरक्षा आव्हाने देशाच्या सीमांवरील वाढते धोके आणि अंतर्गत बंडाळी मोडून काढण्याऐवजी, जनरल असीम मुनीर यांचे लक्ष सध्या मुत्सद्देगिरी आणि आर्थिक फायद्यांवर अधिक केंद्रित असल्याचे चित्र आहे. पाकिस्तानी लष्करप्रमुखांचे मुख्य कार्य देशाचे संरक्षण करणे हे असते. मात्र, जनरल मुनीर सध्या इराण आणि अमेरिका यांच्यातील तणावात मध्यस्थ म्हणून भूमिका बजावण्याचा प्रयत्न करत आहेत. यामागे दोन मुख्य हेतू दिसतात: जागतिक स्तरावर एक 'शांतिदूत' म्हणून प्रतिमा निर्माण झाल्यास पाकिस्तानला पश्चिमी देशांकडून आणि इस्लामिक जगाकडून विशेष महत्त्व मिळेल, असे त्यांना वाटते. त्यातच पाकिस्तानची अर्थव्यवस्था सध्या 'व्हेंटिलेटर'वर आहे. 'आयएमएफ'कडून नवीन कर्ज मिळवण्यासाठी अमेरिकेची मर्जी राखणे मुनीर यांच्यासाठी अनिवार्य झाले आहे. मात्र, या 'डिप्लोमसी'च्या नादात लष्कराचे मुख्य कर्तव्य असलेल्या 'राष्ट्रीय सुरक्षा' या विषयाकडे दुर्लक्ष होत आहे. पाकिस्तानी सैन्याची पारंपरिक ओळख 'आक्रमकता' ही राहिली आहे. मात्र, सध्याच्या काळात लष्करी नेतृत्वाने 'जगा आणि जगू द्या' असे बचावात्मक धोरण स्वीकारल्याचे दिसते. याचे परिणाम सैनिकांच्या मानसिकतेवर होत आहेत. जेव्हा नेतृत्व सीमेपेक्षा परकीय कर्जावर अधिक चर्चा करते, तेव्हा सामान्य सैनिकाचे लढण्याचे मनोबल खचते. लष्करी अधिकारी जेव्हा व्यावसायिक करारांमध्ये आणि राजकीय तडजोडीत गुंततात, तेव्हा प्रत्यक्ष युद्धभूमीवरील सराव आणि शिस्त यावर त्याचा नकारात्मक परिणाम होतो. दहशतवादी गटांविरुद्ध कठोर कारवाई करण्याऐवजी अनेक ठिकाणी 'तडजोड' करण्याची वृत्ती बळावत आहे, ज्यामुळे शत्रू गटांचे धाडस वाढत आहे. जर पाकिस्तानने आपले धोरण बदलले नाही, तर भविष्यात परिस्थिती आणखी गंभीर होऊ शकते. आज पाकिस्तानी सैन्य अत्यंत कठीण आणि अभूतपूर्व परिस्थितीतून जात आहे. भारत सीमा, अफगाण सीमा आणि अंतर्गत दहशतवाद या तिन्ही आघाड्यांवर ते एकाच वेळी संघर्ष करत आहे. परंतु, या संघर्षांमध्ये त्यांना निर्णायक यश मिळत नाही. यामागील सर्वात मोठे कारण म्हणजे पाकिस्तानने चुकीची सुरक्षानीती स्वीकारली. दहशतवादाला परराष्ट्र धोरणाचे साधन म्हणून वापरण्याचा प्रयत्न पाकिस्तानलाच महागात पडला आहे. आज पाकिस्तानसमोर केवळ लष्करी नव्हे; तर राजकीय, आर्थिक आणि सामाजिक अस्तित्वाचे संकट आहे. जर पाकिस्तानने अतिरेकी धोरण सोडून आर्थिक विकास, लोकशाही स्थैर्य आणि शेजाऱ्यांशी शांततापूर्ण संबंध यावर भर दिला नाही; तर भविष्यात त्यांच्यासमोरील सुरक्षा आव्हाने आणखी गंभीर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

आकलन विजय कुलकर्णी

# झुरळांच्या झुंडीशी झुंज...




**देशाच्या सरन्यायाधीशांनी बेरोजगार तरुणांना चक्क 'झुरळा'ची उपमा दिल्यानंतर, लगोलग 'कॉकरोच जनता पार्टी' हे पक्षनाम धारण करणार्या मोहिमेने डिजिटलविश्वात सध्या धुमाकूळ घातला आहे. पण, ही केवळ डिजिटल मोहीम नसून, देशातील 'जेन-झी'ला सरकारविरोधात भडकावण्याच्या षड्यंत्राचाच कुटील डाव म्हणावा लागेल. तो नेमका कसा, याचे आकलन करणारा लेख...**

आपल्या देशातील बेरोजगार तरुण हे झुरळांप्रमाणे आहेत. मग ते माध्यमे, समाजमाध्यमे आणि माहिती अधिकार कार्यकर्ते बनून देशातील यंत्रणेवरच हल्ला चढवतात, असे धक्कादायक विधान सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी गेल्या आठवड्यात केले. नंतर माझ्या म्हणण्याचा अर्थ तसा नव्हता, म्हणून सूर्यकांत यांनी सारवासारव करण्याचा फुटकळ प्रयत्नही केला. पण, समाजमाध्यमांवरून सरन्यायाधीशांविरोधात देशातील तरुणाईचा पराकोटीचा रोष उफाळून आला. इतका की, त्याची परिणती थेट एका डिजिटल मोहिमेत झाली. या मोहिमेचे नावच 'कॉकरोच जनता पार्टी' अर्थात, 'सीजेपी.'

'आळशी बेरोजगार तरुणांचा आवाज' अशा ब्रीदवाक्यासह सरन्यायाधीशांनी संबोधलेल्या 'कॉकरोच' या अवमानकारक टिप्पणीचाच वापर या डिजिटल राजकीय पक्षाने खुबीने केला आणि 'कॉकरोच' हेच पक्षचिन्ह म्हणून घोषित केले! एवढेच नाही, तर अवघ्या काही तासांत २० हजारांहून अधिक फॉलोअर्स आणि ५० हजारांपेक्षा जास्त लोकांनी 'सीजेपी'ला ऑनलाईन जाहीर समर्थनही दर्शविले. म्हणा, अजून हा राजकीय पक्ष नोंदणीकृत वगैरे नसला, तरी आगामी काळात नेटिझन्सचा मिळणारा प्रतिसाद बघून, या मोहिमेचे रूपांतर प्रत्यक्ष राजकीय पक्षात होण्याची चिन्हे कदापि नाकारता येत नाहीत. म्हणूनच, अशा या डिजिटल मोहिमेला कदापि कमी लेखून चालणार नाही.

आता या 'सीजेपी'चा नेमका अजेंडा आणि या मोहिमेमागील चेहरा आहे तरी कोण, हे थोडक्यात जाणून घेऊया...

'सीजेपी'ने त्यांचा जाहीरनामाही सादर केला. त्यानुसार

१) सरन्यायाधीश सत्तेवर आल्यास, कोणत्याही सरन्यायाधीशांना सेवानिवृत्तीनंतरचे बक्षीस म्हणून राज्यसभेची जागा दिली जाणार नाही.

२) सरन्यायाधीशांच्या किंवा विरोधी पक्षांच्या राज्यात कोणतेही वैध मत रद्द केल्यास, मुख्य निवडणूक आयुक्तांना 'यूएपीए'अंतर्गत अटक केली जाईल.

३) संसदेची सदस्यसंख्या न वाढवता महिलांना ३३ टक्क्यांऐवजी ५० टक्के आरक्षण मिळेल. याव्यतिरिक्त सर्व कॅबिनेट पदांपैकी ५० टक्के पदे महिलांसाठी राखीव असतील.

४) खऱ्या अर्थाने स्वतंत्र माध्यमांना मार्ग मोकळा करून देण्यासाठी अंबानी आणि अदानी यांच्या मालकीच्या सर्व माध्यम संस्थांचे परवाने रद्द केले जातील. 'गोदी मीडिया'च्या अँकर्सच्या बँक खात्यांची चौकशी केली जाईल.

५) एका पक्षातून दुसऱ्या पक्षात जाणाऱ्या कोणत्याही आमदार किंवा खासदारावर २० वर्षांच्या कालावधीसाठी निवडणूक लढवण्यास आणि कोणतेही सार्वजनिक पद धारण करण्यास बंदी घातली जाईल. आता या काहीशा अतिरंजित घोषणा 'जेन-झी'ला भुरळ घालणाऱ्या नक्कीच वाटू शकतात.

मोदींची सत्ता नको, राहुल गांधींचा फसलेला पर्यायही नको, अन्य कोणताही राजकीय पक्ष लायकच नाही, आता फक्त 'सीजेपी'च 'आम आदमी'ला न्याय देऊ शकते, असे भासवून 'जनक्रांती' वगैरे घडविण्याचा हा सगळा खटाटोप! आता 'आम आदमी' म्हटल्यावर काही वर्षांपूर्वी 'आप'नेही अशीच जनतेला आदर्शवादी वाटतील, अशी आश्वासने देऊन दिल्लीकरांची आणि नंतर पंजाबवासीयांची कशी दिशाभूल केली होती आणि नंतर काय काय घडले, ते वेगळे सांगायला नको. पण, जरा योगायोग बघा, या 'सीजेपी'च्या मागचा चेहरा असलेला, तिशीच्या आसपासचा मूळचा पुण्याचा अभिजित दीपके हा 'आप'साठीच काम करायचा. दीपके हा स्वत:ला पेशाने 'पॉलिटिकल कॉमेन्टेटर', 'स्ट्रॅटिजिक कम्युनिकेशन प्रोफेशनल' वगैरे संबोधतो. त्याने यापूर्वी 'आप'चा 'डायरेक्टर ऑफ कम्युनिकेशन्स' आणि दिल्लीतील 'आप' सरकारच्या शिक्षण खात्याचा सल्लागार म्हणूनही काम पाहिले. जरा आठवून बघा, दिल्लीतील सरकारी शाळांचे म
ॅडेल आम्ही कसे विकसित केले, याचे केजरीवालांच्या 'आप'ने जितके प्रचारकी ढोल बडवले होते, नंतर त्याच सगळ्या कामांत कोट्यवधींचा भ्रष्टाचार उघडकीस आला होता. म्हणजे, केजरीवालांची 'दिल्लीचा विकासपुरुष' म्हणून डिजिटलविश्वात प्रतिमा चमकवणारा दुसरा- तिसरा कुणी नसून, हाच अभिजित दीपके होता आणि तोच आता 'सीजेपी'चा संस्थापक-अध्यक्षही आहे. त्यामुळे 'सीजेपी' हे 'आप'चेच अपत्य, असे म्हटले तरी वावगे ठरु नये.

मोदी सरकारच्या ध्येय-धोरणांवर समाजमाध्यमांतून परखड टीका करणारा, केजरीवाल-सिसोदियांचा उदोउदो करणारा हा दीपके बोस्टनमधून 'जनसंपर्क' विषयातील 'एमएस'चे शिक्षण घेत असल्याचे त्याच्या 'लिंक्डइन' प्रोफाईलवरुन समजते. त्याचे 'ट्विटर' अकाऊंटही अमेरिकास्थित. म्हणजेच, ध्रुव राठी आणि अशाच अन्य भारतविरोधी 'डिजिटल आम'प्रमाणे, सातासमुद्रापार बसून देशात राजकीय अस्थिरता निर्माण करण्याचेच हे एकप्रकारे षड्यंत्र म्हणावे लागेल.

आणखीन एक 'क्रोनोलॉजी' बघूया. 'नीट' पेपरफुटी प्रकरणानंतर केजरीवालांनी देशातील तरुणाईला रस्त्यावर उतरून सरकारविरोधी तीव्र आंदोलन छेडण्याचे आवाहन केले. त्यानंतर अवघ्या काहीच दिवसांत, त्यांच्याच पक्षाच्या ऑनलाईन प्रचाराची पूर्वी धुरा वाहणारा हाच अभिजित दीपके 'सीजेपी' मोहीम सुरू करून, 'जेन-झी'ला सरकारविरोधात लढण्यासाठी संघटित करतो, हा निव्वळ योगायोग नक्कीच नाही.

त्यातच ही सगळी मोहीम सुरू होण्याची तारीखही १६ मे! याच तारखेला २०१४ साली नरेंद्र मोदी यांनी देशाचे १५वे पंतप्रधान म्हणून शपथ घेतली होती. त्यामुळे '२०१४ साली मोदींच्या नेतृत्वात भारतात झालेली क्रांती, आता आम्ही उलथवू शकतो,' हाच सांकेतिक संदेश १६ मे या तारखेच्या निवडीतून देण्याचा हा प्रयत्न म्हणावा लागेल. तेव्हा, 'सीजेपी' मोहीम ही वाटते तशी ऑनलाईन चळवळीची झुळूक नाही, तर ती भविष्यात अशा 'झुरळां'च्या झुंडीची देशविरोधी झुंजही ठरू शकते, हे ध्यानात घ्यावे लागेल.

भारतच नाही, तर जगभरात असे 'ऑनलाईन' मार्गे 'ऑफलाईन' यशस्वी झालेले राजकीय पक्षही अस्तित्वात आहेत. यामध्ये प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल तो इटलीच्या 'एम५एस', स्पेनच्या 'पोडेमोस', आईसलॅण्डच्या 'पायरेट पार्टी' अथवा फ्रान्सच्या 'एलएफआय'चा. डिजिटलविश्वात लोकपसंतीस उतरून, या पक्षांनी प्रत्यक्ष राजकारणातही यशस्वी शिरकाव केला. नुकतेच तामिळनाडूचे माजी मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी केलेले एक विधानही चर्चेचा विषय ठरले. स्टॅलिन म्हणाले की, टीव्हीके नेते विजय यांनी 'बूथ एजंट'ची योग्य नियुक्ती न करताच, 'इन्स्टाग्राम'च्या माध्यमातून तरुणांवर प्रभाव टाकून मुख्यमंत्रिपद मिळवले. त्यामुळे पारंपरिक राजकारणाबरोबर साहजिकच डिजिटल राजकारण, प्रचार मोहिमांनाही अगणित महत्त्व प्राप्त झालेले दिसते. परंतु, 'जेन-झी'ला त्यांच्याच भाषेत साद घालणाऱ्या 'सीजेपी'सारख्या मोहिमेचे रूपांतर भविष्यात 'आप'सारख्याच एखाद्या अराजकवादी राजकीय पक्षात होईल का, याकडे मात्र लक्ष ठेवावेच लागेल!

# इंधन बचत आजच्या परिस्थितीत महत्वाचे नागरी कर्तव्य

**आखाती युद्धाच्या गंभीर परिणामांचा विचार करता, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना इंधन बचतीचे आवाहन केले आणि त्यांच्या आवाहनाला आज सर्वच स्तरातून उत्स्फूर्त प्रतिसाददेखील मिळताना दिसतो. तेव्हा, भारताचे एक जबाबदार, कर्तव्यदक्ष नागरिक म्हणून आपणही पंतप्रधानांच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद द्यायला हवा. त्याचबरोबर या आवाहनामागची पार्श्वभूमी आणि त्याचे गांभीर्यही लक्षात घेण्यासाठीचा हा लेखप्रपंच...**



राष्ट्रभान **महेश नाईके**

आजच्या आधुनिक जगात वाहतूक व्यवस्था ही अर्थव्यवस्थेची जीवनवाहिनी मानली जाते. वस्तूंचे उत्पादन ज्या ठिकाणी होते, तेथून त्या वस्तू बाजारपेठांपर्यंत पोहोचविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वाहतुकीची आवश्यकता असते. ही वाहतूक व्यवस्था मुख्यतः पेट्रोल, डिझेल आणि इतर इंधनांवर अवलंबून आहे. त्यामुळे इंधनाचा पुरवठा कमी झाला किंवा त्यात अडचणी निर्माण झाल्या, तर त्याचा थेट परिणाम संपूर्ण अर्थव्यवस्थेवर होतो. वाहतूक कमी झाली, तर वस्तूंचा पुरवठा बाजारात कमी होतो. त्यामुळे प्रामुख्याने या व्यवस्थांना इंधनाचा पुरवठा करण्याची गरज आहे.

विशेषतः फळे, भाजीपाला, दूध यांसारख्या नाशवंत वस्तू वेळेवर बाजारात पोहोचल्या नाहीत, तर त्या खराब होण्याची शक्यता वाढते. भारतासारख्या मोठ्या देशाला दररोज सुमारे साडेचार ते पाच दशलक्ष बॅरल इतया मोठ्या प्रमाणात इंधनाची गरज भासते. मात्र, भारताकडे स्वतःचे इंधनसाठे मर्यादित असल्यामुळे देशाला सुमारे ८० ते ८५ टक्के इंधन परदेशातून आयात करावे लागते. इंधन ही अशी गोष्ट आहे की, जी कारखान्यात तयार करता येत नाही. ती पृथ्वीच्या पोटात नैसर्गिकरित्या तयार झालेली संपत्ती आहे आणि तिचे साठे जगातील काही मोजया देशांमध्येच आढळतात. त्यामुळे या देशांतून जगातील इतर देशांना इंधन पुरवठा केला जातो. जगातील अनेक राजकीय आणि आर्थिक संघर्षांमागे इंधनसाठे हेही एक महत्त्वाचे कारण.

ज्या देशांकडे मोठ्या प्रमाणावर तेलसाठे आहेत, ते देश इंधनाची निर्यात करून जगातील इतर देशांच्या अर्थव्यवस्थांवर अप्रत्यक्षपणे प्रभाव टाकतात. तेलाचा पुरवठा प्रामुख्याने समुद्री मार्गाने मोठ्या जहाजांद्वारे केला जातो. मध्य- पूर्वेतील होर्मुझ सामुद्रधुनी हा जगातील सर्वांत महत्त्वाचा तेलवाहतूक मार्ग मानला जातो. या मार्गातून मोठ्या प्रमाणावर कच्चे तेल जगभरातील देशांकडे व प्रामुख्याने भारताकडे पाठवले जाते.

सध्या आखाती प्रदेशात निर्माण झालेल्या तणावपूर्ण परिस्थितीमुळे होर्मुझ प्रदेशातून होणाऱ्या तेलवाहतुकीवर परिणाम होऊ लागला आहे. जागतिक अर्थव्यवस्था आज परस्परांवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून असल्यामुळे जगाच्या कोणत्याही भागात संघर्ष किंवा युद्ध सुरू झाले, तर त्याचे परिणाम इतर देशांवरही दिसून येतात. अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यातील तणावामुळे जगभरातील अर्थव्यवस्थांवर परिणाम होताना दिसतो. भारतातही या परिस्थितीचे काही परिणाम जाणवू लागले आहेत. काही ठिकाणी 'एलपीजी' गॅसच्या पुरवठ्यावर मर्यादा आली आहे. भारतीय शासन या परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे.

नागरिकांवर कोणताही गंभीर परिणाम होऊ नये, यासाठी विविध पातळ्यांवर उपाययोजनादेखील केल्या जात आहेत. परंतु, युद्ध हे इतर देशांमधील असल्यामुळे ते थांबविणे भारताच्या हातात नाही. जेव्हा देशांमधील संवाद आणि सामंजस्य संपते, तेव्हा युद्धाची परिस्थिती निर्माण होते. अशा वेळी कोणताही देश सहजपणे माघार घेत नाही आणि संघर्ष वाढत जातो. अशा परिस्थितीत नागरिकांनी अधिक जबाबदारीने वागायला हवे व त्यासाठी पंतप्रधानांनी केलेले आवाहन अगदी योग्य असेच आहे. प्रत्यक्षात इंधनटंचाईची स्थिती अनेक देशांमध्ये या आधीच निर्माण झाली आहे. परंतु, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या काळात अनेक देशांचे दौरे करून भारताचे मित्रराष्ट्र वाढविले आहेत. भारतात इंधनटंचाई जाणवू नये, यासाठी शासनाने विविध योजना आखल्या व जगातील विविध मित्रराष्ट्रांची मदत घेऊन अद्यापपर्यंत भारतातील नागरिकांना या आंतरराष्ट्रीय परिस्थितीचा प्रतिकूल परिणाम जाणवू दिला नाही. परंतु, आंतरराष्ट्रीय परिस्थिती अडचणीची झालेली असताना त्यासंदर्भात निर्माण झालेल्या अडचणीची जबाबदारी केवळ शासनावर टाकणे योग्य ठरणार नाही. देशाच्या अडचणीच्या काळात नागरिकांनीही आपली जबाबदारी ओळखून वागणे आवश्यक आहे.

देशाच्या व्यवस्थेवर ताण येऊ नये, यासाठी नागरिकांनीही शासनाच्या प्रयत्नांना साथ देणे गरजेचे आहे. भारतासारख्या विशाल देशाची अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणावर इंधनावर अवलंबून आहे. जर आंतरराष्ट्रीय संघर्ष यापुढेही दीर्घ काळ चालू राहिला आणि तणाव कायम राहिला, तर इंधनाचा पुरवठा कमी होण्याची किंवा त्याची टंचाई निर्माण होण्याची शयता नाकारता येत नाही. त्यामुळे संकट निर्माण झाल्यानंतर उपाय शोधण्यापेक्षा आधीपासूनच इंधन बचतीची सवय लावणे अधिक योग्य ठरेल. आणि त्यामुळेच देशाच्या पंतप्रधानांनी योग्य असे आवाहन भारतीय नागरिकांना केले आहे.

आज रस्त्यावर आपण पाहतो की, अनेकजण आपल्या वैयक्तिक कारचा वापर करत असतात. परंतु, त्या कारमध्ये बहुतेक वेळा फक्त एकच व्यक्ती प्रवास करत असते. एका व्यक्तीसाठी संपूर्ण कार वापरणे म्हणजे इंधनाचा मोठ्या प्रमाणावर अपव्यय होय. कारचे क्षेत्रफळ आणि त्यामध्ये बसणारी एक व्यक्ती याची तुलना बसच्या क्षेत्रफळाशी आणि बसमध्ये बसणाऱ्या अनेक प्रवाशांशी केली, तर वाहतुककोंडी आणि इंधनाचा अपव्यय का होतो, याचे उत्तर सहज मिळते, इंधन बचतीसाठी सर्वांत प्रभावी उपाय म्हणजे सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा अधिकाधिक वापर करणे.

बस, रेल्वे, मेट्रो यांसारख्या साधनांचा वापर केल्यास एकाचवेळी अनेक लोक प्रवास करू शकतात. त्यामुळे तुलनेने कमी इंधन वापरून अधिक लोकांची वाहतूक करता येते आणि परिणामी इंधनाची मोठ्या प्रमाणावर बचत होते. जर वैयक्तिक वाहन वापरणे अत्यावश्यक असेल, तर 'कारपूल' पद्धतीचा अवलंब करता येतो. म्हणजेच एकाच दिशेने जाणाऱ्या सहकार्यांना किंवा शेजाऱ्याना सोबत घेऊन प्रवास करणे. यामुळे इंधनाची बचत होतेच; शिवाय रस्त्यांवरील वाहनांची गर्दीही कमी होते. सार्वजनिक वाहतूक वापरण्याचे आरोग्यदायी फायदेही आहेत. घरापासून बसस्टॉप किंवा रेल्वे स्टेशनपर्यंत चालत जावे लागल्यामुळे थोडासा व्यायाम होतो. तसेच प्रवासादरम्यान स्वतः वाहन चालवण्याचा ताण नसल्यामुळे वाचन, विश्रांती किंवा इतर उपयुक्त कामे करता येतात.

प्रशिक्षित चालकांमुळे प्रवास अधिक सुरक्षितही ठरतो. इंधनाचा प्रश्न केवळ आर्थिक नाही, तर तो पर्यावरणाशीही संबंधित आहे. पेट्रोल आणि डिझेलच्या वाढत्या वापरामुळे वायुप्रदूषण वाढते आणि त्याचा मानवी आरोग्यावर, तसेच पर्यावरणावर गंभीर परिणाम होतो. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर वाढविल्यास प्रदूषण कमी होण्यासही मदत होते.

सध्याच्या तणावपूर्ण परिस्थितीत केवळ शासनावर अवलंबून राहणे योग्य नाही. प्रत्येक नागरिकाने जबाबदारीने वागून इंधनाचा वापर कमी करण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. तसेच भीतीपोटी इंधन किंवा गॅसची साठेबाजी करणे किंवा काळाबाजाराला प्रोत्साहन देणे टाळले पाहिजे. अशा कृतींमुळे परिस्थिती गंभीर होऊ शकते. देशप्रेम म्हणजे नेहमीच युद्धभूमीवर जाऊन लढणे नव्हे.

देश अडचणीत असताना आपल्या वागणुकीत आवश्यक बदल करणे आणि देशाच्या हितासाठी छोटे प्रयत्न करणे, हेही देशसेवेचेच एक रूप आहे. त्यामुळे आजच्या परिस्थितीत इंधन, गॅस आणि विजेचा वापर जपून करणे आणि काटकसरीने वापरणे, हे प्रत्येक भारतीय नागरिकाचे महत्त्वाचे नागरी कर्तव्य आहे.

---

# प्रश्न पर्यावरणाचा, प्रश्न अस्तित्वाचा

५ जून जागतिक पर्यावरण दिन त्यानिमित्ताने...

**येत्या ५ जूनला जागतिक पर्यावरण दिन साजरा केला जाईल. हे औचित्य असले, तरी या प्रश्नाची चर्चा उपलब्ध असणाऱ्या सगळ्या व्यासपीठांवरून दररोज होणे आणि आवश्यक ती कृती करणे गरजेचे आहे. मात्र, कृतिहीन बडबडीखेरीज काहीही होत नसल्यामुळे प्रत्यक्षात काहीच सकारात्मक घडताना दिसत नाही. आता पर्यावरणविषयक प्रश्नांचे भयावह रूप अनुभवास येऊ लागले आहे. त्यामुळेच यापुढे तरी व्यक्तिगत पातळीवर कृतिशील होण्याखेरीज पर्याय उरलेला नाही.**



प्रासंगिक **डॉ. मधुकर बाचुलकर**

दरवर्षी जागतिक पर्यावरण दिन साजरा होतो. या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. मात्र, साजरीकरण संपल्यानंतर परिस्थिती पूर्ववत होते. नित्याचे उपक्रम पूर्वीच्याच टेचात सुरू होतात आणि प्रश्नाची तड न निघता दिवस पुढे सरत राहतात. खरे पाहता हा एक दिवस साजरा करावा असा विषयच आता राहिलेला नाही. पर्यावरण असंतुलनाचे घातक परिणाम तुमच्या-आमच्या उंबऱ्यापर्यंत आले आहेत. त्याचे चटके आपल्याला भाजून काढू लागले आहेत. हा अतिशय व्यापक आणि जटिल प्रश्न ठरतो आहे. आता तरी त्याची गांभीर्याने दखल घ्यायला हवी. इथे लक्षात घेण्याजोगी पहिली बाब म्हणजे पर्यावरणामध्ये प्रामुख्याने दोन घटक आहेत. पहिला निर्जीव तर दुसरा सजीव.

सजीवांध्ये वनस्पती, प्राणी आणि सूक्ष्म जीव असे तीन घटक आहेत. माणूस हा प्राण्यांधीलच एक घटक आहे. दुसरा म्हणजेच निर्जीव घटकांबद्दल बोलायचे तर त्यात प्रामुख्याने हवा, पाणी, जमीन, प्रकाश, ऊर्जा वा अग्नी यांचा समावेश होतो. आपण याच घटकांना पंचमहाभूते म्हणतो. सगळ्यात महत्त्वाची बाब म्हणजे सजीवांना जिवंत ठेवण्याचे काम हे निर्जीव घटक करीत असतात. म्हणजेच सजीवांना सजीवांची गरज आहेच; पण त्यांना निर्जीव घटकांची जास्त गरज आहे. हवा, पाणी, जमीन, ऊर्जा याशिवाय कोणताही सजीव जगू शकत नाही. असे असूनही माणसाने या सगळ्या निर्जीव घटकांचे प्रदूषण केले आहे. आज पर्यावरणामध्ये माणसाने निर्माण केलेली सर्वात मोठी समस्या याच प्रदूषणाची आहे. मग त्यात हवा, पाणी, जमिनीचे प्रदूषण अंतर्भूत आहेच; अलिकडे त्यात प्रकाशाचे प्रदूषणही मिसळले गेले आहे. अशा सर्व प्रकारच्या प्रदूषणाला फक्त आणि फक्त माणूसच कारणीभूत आहे. प्रदूषणामागील कारणांचा ढोबळमानाने विचार करायचा तर सर्वात मोठी समस्या वाढती लोकसंख्या हीच आहे. मात्र कोणीही याचा गांभीर्याने विचार करत नाही.

लोकसंख्या वाढली की शहरीकरण वाढते आणि शहरीकरण वाढले की गरजा वाढतात. पुढे हीच बाब वाढते औद्योगिकीकरण, वाढती वाहनसंख्या आणि वाढते विकास प्रकल्प यांना चालना देते. आपल्याला विकास हवा आहे. तोदेखील अत्यंत वेगाने हवा आहे. या हट्टापायीच आपण कमालीच्या वेगाने प्रदूषण वाढवले आहे. भारताबाबत बोलायचे तर लोकसंख्या अमर्याद वाढत आहे. आज जगाची लोकसंख्या ८११ कोटींच्या घरात पोहोचली असून त्यात दरवर्षी नऊ ते दहा कोटींची वाढ होत आहे. भारताची लोकसंख्या १४२ कोटींच्या पलीकडे गेली असून आपण जगात सर्वाधिक लोकसंख्या असणारा देश बनलो आहोत. मात्र, नको त्या गोष्टीत आपण फार पुढे आहोत, याचा विचार कोणताही राजकीय पक्ष वा व्यक्ती करीत नाही, ही दुःखाची बाब आहे. आधी उल्लेख केल्याप्रमाणे लोकसंख्या वाढली की गरजा वाढू लागतात; पण गरजा वाढतात त्या प्रमाणात नैसर्गिक स्त्रोत वाढत नाहीत. त्याने दिलेली प्रत्येक गोष्ट मर्यादित आहे.

पूर्वी माणसाचे राहणीमान साधे होते. त्यातही खेड्यांध्ये राहणाऱ्यांची संख्या जास्त होती. आता त्याच्या बरोबर उलटे सुरू आहे. शहरीकरणाचा वेग वाढल्यामुळे शहरांची संख्या वाढली नसली, तरी व्याप्ती वाढली आहे. परिणामस्वरूप शहरांची अमर्यादित वाढ होत आहे. आज कोणतेही शहर बघा, हेच चित्र दिसते. याचा परिणाम म्हणून शहरा-शहरांध्ये अनेक मूलभूत आणि गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. कोणत्याही शहराला हवे तेवढे पाणी मिळत नाही.

साहजिकच त्यामुळे येणारा बकालपणा पर्यावरणाला अनेक प्रकारचे धोके निर्माण करताना दिसतो आहे. वाढते औद्योगिकीकरण ही पर्यावरण धोक्यात आणणारी आणखी एक महत्त्वाची बाब आहे. औद्योगिक क्रांती झाल्यानंतर औद्योगिकीकरणाचा वेग वाढलाच; पण जागतिकीकरणानंतर तो अधिक किंबहुना प्रचंड प्रमाणात वाढला. सुखसोयी वाढवण्याकडे लोकांचा कल वाढला. वाहनांची संख्या वाढली. आज जगभरातील वाहनांची संख्या १४७ कोटींच्या घरात पोहोचली आहे. म्हणजेच एवढ्या मोठ्या प्रमाणात वाहने निर्माण झाली आहेत. देशाचा विचार केला तर भारतात ३३ कोटींपेक्षा जास्त वाहने रस्त्यांवर धावत आहेत. यावरूनच आपण वाहनांची संख्याही किती वाढवली, हे समजते.

या सगळ्याबरोबर विकास प्रकल्पही वाढत आहेत.



खरे तर गरजा मर्यादित ठेवणे गरजेचे आहे. मात्र ते होत नसल्याने अमर्यादित गरजा भागवण्यासाठी विकास प्रकल्प राबविणे गरजेचे झाले आहे. वाढत्या वाहनांना जागा करून देण्यासाठी आपण रस्ते विकास प्रकल्प राबवत आहोत. वेगवेगळे धातू मिळविण्यासाठी खाणकाम प्रकल्प राबवत आहोत. ऊर्जा निर्माण करण्यासाठी अणुऊर्जा प्रकल्प सुरू झाले. पण हे सगळे मिळविण्यासाठी आपण सभोवतालच्या जंगलाचा प्रचंड मोठ्या प्रमाणावर विनाश सुरू केला. वृक्षतोड तर मोठ्या प्रमाणात आहे. संपूर्ण भारतात रस्ते विकास प्रकल्प राबवताना आजअखेरपर्यंत कोट्यवधी झाडे तोडली गेली आहेत आणि अजूनही हे प्रकल्प सुरूच आहेत. असे सगळे इतक्या वेगाने होत असेल तर निसर्ग आणि पर्यावरणाचा ऱ्हास होणे अटळ आहे.

अर्थातच या ऱ्हासाचा वेग प्रचंड आहे आणि हाच आज समस्त मानवजातीपुढचा यक्षप्रश्न आहे. आपल्या देशातच नव्हे, तर जगभरात आत्तापर्यंत झालेल्या विकासाकडे बघता लक्षात येते की, तो अशाश्वत आहे. म्हणजेच मानवनिर्मित विकास हा अक्षय नाही. खरे तर आपल्याला पर्यावरणपूरक विकासाची आवश्यकता आहे. इंग्रजीत 'इको फ्रेंडली' म्हणतो तसा विकास होण्याची गरज आहे. दुर्दैवाने आजअखेरपर्यंत तरी तसा तो झाला नसल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळेच विकासाला योग्य दिशा देण्याची गरज आता तरी ओळखायला हवी. हवेच्या प्रदूषणाबद्दल बोलायचे तर यामुळे पर्यावरणाचे आत्यंतिक नुकसान झाले आहे, हे सर्वप्रथम लक्षात घ्यायला हवे. त्याला कारणीभूत असणाऱ्या घटकांची आधी चर्चा केलेलीच आहे. त्याच्या जोडीने अनेक चुकांळे हवेचे प्रदूषण वाढत आहे. जसे की, आपण वणवे लावतो. आगी लावतो. कचरा पेटवून देतो. पण यामुळेही हवेचे प्रदूषण होते, हे लक्षात घ्यायला हवे. अशा आगी वा वणवे अनेक दिवस धुसत राहिल्याने त्यातून मोठ्या प्रमाणात कार्बन डाय ऑक्साईड बाहेर पडतो आणि मोठ्या प्रमाणात हवेचे प्रदूषण होते. ते कमी करण्यासाठी शासनाने बरेच प्रयत्न केले. पण अद्याप त्याला हवे तेवढे यश आलेले नाही. कारण एकटे सरकार काहीही करू शकणार नाही. प्रत्येकाने व्यक्तिगत पातळीवर प्रदूषणकारक कृत्ये थांबवण्याखेरीज अपेक्षित निकाल मिळणे अशक्य आहे. आज शहरांध्ये सगळा कचरा पेटवला जातो. त्यामुळे हवेचे प्रदूषण वाढते. डिझेल- पेट्रोलच्या ज्वलनातून हवा प्रदूषित होते. कारखान्यांध्ये मोठ्या प्रमाणावर दगडी कोळसा, लाकूड जाळल्यामुळे हवा प्रदूषित होते. कारण त्याच्या ज्वलनातून कार्बन डाय ऑक्साईड प्रचंड प्रमाणात हवेत मिसळतो. ही परिस्थिती केवळ भारतातच नाही तर सगळ्या विकसित आणि विकसनशील देशांध्ये आहे. हवेच्या दृष्टीने बघता जगभरात ८६० ते ९०० शहरे अतिप्रदूषित मानली गेली असून या यादीत भारतातील तब्बल ४० शहरांचा समावेश आहे.

महाराष्ट्राचा विचार केला तर त्यात मुंबई, चंद्रपूर, नागपूर, नवी मुंबई, कोल्हापूर आदी शहरांचा समावेश आहे. ही आकडेवारी परिस्थितीचे गांभीर्य दर्शवण्यास पुरेशी आहे, असे म्हणता येईल. केवळ भारताचा विचार केला तर हवेच्या प्रदूषणामुळे दरवर्षी १ लाख २० हजारांपेक्षा अधिक लोक श्वसनाच्या विकारामुळे मृत्युखी पडतात. हे सगळे माहीत असूनही आपण प्रदूषण थांबवलेले नाही, ही वस्तुस्थिती आहे. हा झाला प्रदूषणाचा आपल्या जीवनावर होणारा परिणाम. पर्यावरणावर होणारा परिणाम तर त्यापेक्षाही भयावह आहे. हवेच्या वाढत्या प्रदूषणामुळे माणसाने निर्माण केलेली सर्वात मोठी समस्या जागतिक तापमानवाढ आणि बदलत्या हवामानाची आहे. यामुळे अत्यंत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. ते सोडविण्यासाठी जागतिक पातळीवर अनेक राष्ट्रांचे प्रमुख एकत्र येतात, पण कोणीही कार्बन डाय ऑक्साईडचे उत्सर्जन कमी करण्याचा मुद्दा समोर मांडत नाही वा त्या दृष्टीने प्रयत्नही करताना दिसत नाही. म्हणूनच यंदाचा पर्यावरण दिन साजरा करताना तरी गांभीर्य ओळखून हा प्रश्न धसास लावण्यासाठी प्रयास केले जावे. ते झाले नाही, तर येणारा काळ अत्यंत त्रासदायक असेल, हे नक्की.